सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, २३ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २१० | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पिता कमळावर तर पुत्र तुतारी घेऊन निवडणूक रिंगणात

## नवी मुंबईतील भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक पवार गटात

तभा वृत्तसेवा/जमीर काझी

मुंबई, दि.२२: राजकारणात काहीच शाश्वत नसते ,याचा पुन्हा एकदा प्रत्यय राज्यातील जनतेला निवडणुकीच्या रणधुमाळीत पहावयास मिळत आहे . नवी मुंबईतील भाजपाचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री गणेश नाईक यांना भाजपाने उमेदवारांच्या पहिल्या यादीत स्थान दिले असलेतरी त्यांचे पुत्र संदीप नाईक हे तिकीट न मिळाल्याने नाराज होऊन थेट शरद पवार गटात प्रवेश केला. नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देत त्यांनी मंगळवारी शक्तीप्रदर्शन करीत तुतारी हाती घेतली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांची बेलापूर मतदारसंघातून उमेदवारी घोषित केली.

नाईक यांच्या समवेत त्यांचे समर्थक २५ माजी नगरसेवकांनीही प्रवेश केल्याने भाजपाला मोठे खिंडार पडले असून भाजपाच्या विद्यमान आमदार मंदा म्हात्रे यांच्यासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

नाईक पिता- पुत्रांच्या राजकीय खेळीमुळे वडील ऐरोली मतदारसंघातून कमळ चिन्हावर तर त्यांचे पुत्र शेजारच्याच बेलापूर मतदारसंघातून तुतारी चिन्हावर रिंगणात उतरल्याचे पहावयास मिळणार आहे.

नवी मुंबईतील राजकारणात मोठा दबदबा असलेल्या

गणेश नाईक यांनी दोन्हीं मुलांसमवेत २०१९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस सोडून भाजपात प्रवेश केला होता. त्यावेळी पक्षाने सुरुवातीला ऐरोलीचे तत्कालीन आमदार संदीप नाईक यांनाच पुन्हा तिकीट दिले होते. मात्र संदीप यांनी ते नाकारित वडील गणेश नाईक यांना उभे राहण्याचा आग्रह केला व ते निवडून आले त्यानंतर गेल्या काही वर्षापासून संदीप नाईके बेलापूर मतदारसंघ वर लक्ष केंद्रित करून होते त्यांच्या पारंपारिक प्रतिस्पर्धी व भाजपाच्या विद्यमान आमदार मंदा म्हात्रे यांना तिकीट नाकारून ते संदीप नाईक यांना दिले जावे, यासाठी गणेश नाईक शर्तीचे प्रयत्न करीत होते मात्र भाजप श्रेष्ठींनी विद्यमान आमदार म्हात्रे यांनाच पुन्हा संधी दिली तर नाही त्यांना ऐरोलीतून उमेदवारी घोषित केली मात्र त्यामुळे नाराज असलेल्या संदीप नाईक यांनी आपल्या समर्थकांसह शरद पवार गटात प्रवेश करत निवडणूक लढण्याचा निर्धार जाहीर केला . वाशी येथे निर्धार मेळावा घेत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत त्यांनी तुतारी हाती घेतली यावेळी त्यांनी आपली लढाई ही नवी मुंबईकरांच्या विकासासाठी आहे .आपण गेल्यावेळी पक्ष सोडण्याचा निर्णय यासाठी घेतला होता त्याची फलपूर्ती झाली नाही. त्यामुळे आपण पुन्हा शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करण्याचा निश्चय केला आहे. असे सांगितले.

### गणेश नाईक यांच्या भुमिकेकडे लक्ष

ऐरोली विधानसभा मतदार संघातून भाजपाची उमेदवारी जाहीर होण्याच्या एक दिवस आधी गणेश नाईक यांनी शरद पवार यांची भेट घेतली होती. त्यामुळे तेही तुतारी हाती घेणार अशी चर्चा होती मात्र त्यांना तिकीट जाहीर झाल्यामुळे आता ते संदीपने स्वतंत्रपणे निर्णय घेतला असून माझा त्याच्याशी काही संबंध नाही .आपण मुलाचा प्रचार करणार नसल्याचे सांगितले आहे मात्र येत्या काही दिवसात तेही तुतारी हाती घेतील अशी राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

## निवडणूक निरीक्षक ग्यानचंद जैन यांची माध्यम कक्षास भेट



अ.नगर दि. २२- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या माध्यम कक्षास निवडणूक खर्च निरीक्षक ग्यानचंद जैन यांनी भेट देऊन माहिती घेतली. श्री.जैन यांनी माध्यम कक्षाच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी राजू लाकुडजोडे, जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्षाचे समन्वयक अधिकारी अधिकारी डॉ. किरण मोघे, माहिती अधिकारी अमोल महाजन आदी उपस्थित होते.

जैन यांनी माध्यम संनियंत्रण, जाहिरात प्रमाणिकरण, समाजमाध्यमावरील जाहिरातींचे प्रमाणिकरण, खर्च समित्यांशी साधला जाणारा समन्वय, माध्यम केंद्राचे दैनंदीन कामकाज आदीविषयी माहिती घेतली. दूरचित्रवाणी आणि समाजमाध्यमांवरील जाहिरातींच्या संनियंत्रणासाठी माध्यम कक्षातर्फे करण्यात येणाऱ्या कामकाजाविषयी त्यांनी समाधान व्यक्त केले. माध्यम कक्षात दररोज येणाऱ्या विविध वृत्तपत्रांतील बातम्यांची नोंद घेण्याची आणि जाहिरातींचे अवलोकन करण्याची पद्धत याविषयीदेखील त्यांनी जाणून घेतले.

जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मोघे यांनी माध्यम कक्षाच्या कामकाजाबाबत निवडणूक निरीक्षकांना माहिती दिली.

## निवडणूक प्रक्रिया मुक्त, निर्भय वातावरणात पार पाडावी -निवडणूक खर्च निरीक्षक ग्यानचंद जैन



अ. नगर, दि. २२- निवडणूक प्रक्रिया निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रियेतील सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या अत्यंत संवेदनशीलपणे पार पाडत समन्वयाने काम करण्याच्या सूचना निवडणूक खर्च निरीक्षक ग्यानचंद जैन यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात खर्च पथकातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसोबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी राजू लाकुडजोडे उपस्थित होते.

जैन म्हणाले, भारतीय लोकशाहीला जगात महत्व आहे. देशामध्ये आतापर्यंत झालेल्या निवडणुका मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडल्या गेल्या. भारतीय लोकशाहीला अधिक मजबूत करण्यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी एकसंघपणे तसेच जबाबदारीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

विधानसभा निवडणुकीमध्ये उमेदवाराला ४० लक्ष रुपयांपर्यंत खर्च करण्याची मुभा आहे. उमेदवाराच्या प्रत्येक खर्चावर बारकाईने नजर ठेवावी. ईएसएमएस प्रणालीचा प्रभावीपणे वापर करत अवैध मद्य, रोकड वाहतुकीवर स्थापन करण्यात आलेल्या विविध पथकांनी करडी नजर ठेवावी. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचा प्रत्येक खर्च नोंद होईल, यादृष्टीने सर्व पथकांनी काम करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीस निवडणुक खर्च निरीक्षणासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## भाजप माजी मंत्री राजकुमार बडोले यांचा अजित पवाराच्या काँग्रेसमध्ये प्रवेश; कुस्तीगीर संघटनेच्या पैलवानांनीही बांधले घड्याळ

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई दि. २२ ऑक्टोबर : विधानसभा निवडणुकी च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील अनेक विद्यमान आमदार व नेते शरद पवार यांच्या तंबूत 'घर वापसी' करत असताना अजित पवार गटाने मंगळवारी महायुतीतील घटक पक्ष असलेल्या भाजप गोंदिया जिल्ह्यातील नेते आणि माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश केला.

राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत पक्ष कार्यालयात हा



प्रवेश सोहळा झाला.

बडोले हे अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. महायुतीत ही जागा पवार गटाच्या वाटेला आल्याने त्यांनी प्रवेश केला असल्याचे समजते.

दरम्यान, कुस्तीगीर संघटनेतील विविध आजी-माजी मल्लांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामध्ये हिंद केसरी दीनानाथ सिंह, हिंद केसरी अमोल बराटे, हिंद केसरी अक्षय हिरगुडे, महाराष्ट्र केसरी अक्षय गरुड, उप-महाराष्ट्र केसरी युवराज वहाग, उप-महाराष्ट्र केसरी सागर गरुड, महाराष्ट्र चॅम्पियन ऋषिकेश भांडे, मुंबई केसरी आबा काळे, पुणे महापौर केसरी सोनबा काळे आदींनीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

तसेच सांगली - मिरज - कुपवाड महानगरपालिकेतील विविध पक्षातील नगरसेवक, नगरसेविका आणि पदाधिकाऱ्यांनी पक्ष प्रवेश केला. यामध्ये सांगली विधानसभा क्षेत्र अध्यक्षा ॲड. वसुधा कुंभार, सांगली विधानसभा क्षेत्र शहराध्यक्षा रुकसाना कादरी, मिरजच्या नगरसेविका स्वातीताई पारधी, नगरसेविका राणी मोरे, सां.मि.कु. महानगरपालिकेचे माजी सभापती पुष्पा सोनवणे, माजी नगरसेवक संतोष देवळेकर, माजी नगरसेविका सुरेखा कांबळे, कुपवाड विधानसभा क्षेत्र शहराध्यक्ष प्रवीण बाबर, सांगली शहर युवक उपाध्यक्ष दयानंद टोवळे, संघटक विधानसभा क्षेत्र प्रसाद पाटील आदींचा समावेश आहे. यावेळी राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, पक्षाचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे, आमदार इद्रीस नायकवडी, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे आदी उपस्थित होते.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी निवडणूक खर्च निरीक्षकांच्या नियुक्त्या

अ. नगर, दि.२२- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील १२ मतदार संघासाठी निवडणूक खर्च निरीक्षकांच्या नियुक्त्या केल्या आहेत.

देबशीष बिस्वास (आय.आर.एस.) यांची २१६ अकोले, २१७ संगमनेर, २१८ शिर्डी व २१९ कोपरगाव विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्री.बिस्वास यांच्याशी ८९०२१९९९०० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह संगमनेर येथे असणार आहे. निवडणूक खर्च निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून अपर प्रवरा सब डिव्हीजनचे सहायक अभियंता प्रमोद माने यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ८६५७५७७७७७,८९७५२२४८१९ असा आहे.

अरुण चौधरी (आय.आर.एस. सी अँड सीई) यांची २२० श्रीरामपूर, २२१ नेवासा, २२२ शेवगाव व २२३ राहुरी विधानसभा मतदार संघासाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्री.चौधरी यांच्याशी ७०४५६५१५१३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचा मुक्काम महात्मा फुले कृषी विद्यापीठ विश्रामगृह राहुरी येथे असणार आहे. निवडणूक खर्च निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे सहाय्यक प्राध्यापक रोहित निरगुडे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ७५८८६०४१५१ असा आहे.

ग्यानचंद जैन (आय.आर.एस. सी अँड सीई) यांची २२४ पारनेर, २२५ अहमदनगर, २२६ श्रीगोंदा व २२७ कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आहे. श्री.जैन यांच्याशी ८२६२९८६५१८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. त्यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह अहिल्यानगर येथे असणार आहे. निवडणूक खर्च निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून पाणी पुरवठा विभागाचे सहायक शिवम दापकर यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ७२७६२४९९८२ असा असल्याचे निवडणूक शाखेमार्फत कळविण्यात आले आहे.

## अर्जुनराव खोतकर यांच्या उपस्थितीत काँग्रेससह अन्य सहाशेहून अधिक जणांचा शिवसेनेत प्रवेश

जालना/प्रतिनिधी

शिवसेनेचे नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वाखाली आज काँग्रेसह अन्य सहाशेहून अधिक जणांनी शिवसेनेत प्रवेश केला. प्रवेश कर्त्यांना उद्देशून श्री. खोतकर यांनी त्यांचे सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी दिले.

यावेळी बोलतांना शिवसेना नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर म्हणाले की, आज एवढ्या संख्येने हा प्रवेश सोहळा पार पडत आहे, त्याचे आपण कौतूक करतो. शिवसेनेत ज्यांनी- ज्यांनी प्रवेश घेतला, त्यांचे म्हणणे आपण निश्चितच खाली जाऊ देणार नाहीत. याची जाणीव प्रत्येकाने ठेवावी. मग तो वीजेचा प्रश्न, नाल्यांचा प्रश्न असो की, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असो. हे सर्व प्रश्न मार्गी लावणार असल्याचे श्री. खोतकर यांनी सांगितले.

प्रवेश करणार्यांमध्ये अजय कुरिलिये, निलेश काकडे, लखन नागरे, सागर तुरे, रिषभ मंडलेकर, कुलदिप बोरे, अमोल पायगव्हाणे, नागेश शिंदे, धरमेश प्रसाद, निखील काकडे, अनिकेत पायगव्हाणे, करण लिधोरिये, सागर मंडोले, गणेश गोरे, दिपक अंबिलढगे,प्रतिक निकम, सुरज सातपुरिये, किशन डोकठे, पियुष मंडोले, श्री. वाघमारे, कृष्णा जेठे, राहुल कुरलिये, सुमित सतपुरिये, प्रविण कुरलिये, योगेश पररुकर, करण परुळकर, लंकेश पाटील, तसेच शाम अवसरमोलल राजीक शेख, अमन अवसरमोल, गोपाल खरात, दिनेश दाभाडे, जमोल भाई, सलीम भाई, अभिषेक उबाळे, शफिक शेख, इंद्रजीत खंदारे, राजूभाऊ भंडारे, विनोद जगधने, पोहकर, प्रकाश जगधने, भरत खंदारे, धोंडीराम ढोरपे, आकाश जगधने, गयाबाई अवसरमोल, जिजाबाई लोंढे, संगिताबाई जगधने, अल्काबाई लहाने, दादाराव लहाने, रंजनाबाई खंदारे, विनोद लहाने, विशाल लहाने, लिलाबाई जोगदंड, रवि पोहेकर, शहबाद बी, साबेत बी, कृष्णा ढोरपे, शांताबाई भंडारे, लक्ष्मण खंदारे, नवीन मोंढ्याया पाठीमागे आनंदनगर व संताजी नगर या मध्ये अद्यापही लाईटची सुविधा नाही, आदी अनेक समस्या असून त्याचा विचार करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच यावेळी शाकीर खान व असलम मदनी यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत पक्ष प्रवेश केला. या सर्वांचा पुष्पहार देऊन श्री. खोतकर यांनी सत्कार केला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या पदाधिकार्यांनीही यावेळी शिवसेनेत प्रवेश केला. या सर्व कार्यकर्त्यांचे माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी सत्कार केला.

याप्रसंगी शहर प्रमुख विष्णू पाचफुले, जफर खान, अशपाक पठाण, शेख नजीर भाई, ताहेर खान, बडे खान, मुसा परसुवाले, परवेज खान, खालील के पी, एजाज भाई,सय्यद इकराम, अज्जू भाई, तसेच शेकडो शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

## राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून १७ जणांना एबी फॉर्म

तभा वृत्तसेवा

मुंबई, दि.२१ ऑक्टोबर: सत्तारूढ महायुतीच्या सर्वात मोठा घटक पक्ष असलेल्या भाजपाचे ९९ उमेदवार जाहीर झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने १७ उमेदवारांना एबी फॉर्म दिले आहेत. त्यामध्ये ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ दिलीप वळसे पाटील संजय बनसोडे यांच्या अनेक विद्यमान आमदारांचा समावेश आहे. विधानसभेसाठी इच्छूक असणाऱ्या राष्ट्रवादीच्या नेत्यांनी देवगिरी बंगल्यावर अजित पवार यांची भेट घेतली. यावेळी अजित पवार यांच्याकडून १६ जणांना एबी फॉर्म देण्यात आले आहेत. त्यांची नावे अशी : संजय बनसोडे, चेतन तुपे, सुनील टिंगरे, दिलीप वळसे पाटील, दौलत दरोडा,राजेश पाटील, दत्तात्रय भरणे, आशुतोष काळे हिरामण खोसकर, नरहरी झिरवाळ ,ऋछगन भुजबळ, भरत गावित ,बाबासाहेब पाटील, अतुल बेनके, नितीन पवार, इंद्रनील नाईक व बाळासाहेब आजबे.

## पहिल्या यादीत नाव नसलेल्या आमदार, इच्छुक व नाराजांची सागर बंगल्यावर गर्दी!

### देवेंद्र फडणवीस यांना साकडे

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई दि.२१ ऑक्टोबर : आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने ९९ उमेदवारांची पहिली यादी प्रसिद्ध करीत निवडणूक प्रक्रियेत आघाडी घेतली आहे . त्यामुळे तिकीट मिळालेल्यानी सुटकेचा नि:श्वास सोडत निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. तर

तर यादीत नाव नसलेल्या नेत्यांची धाकधूक वाढली असून त्यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर भेट घेतली. त्यामुळे आज सकाळपासून रात्री उशिरापर्यंत बंगल्यावर इच्छुक उमेदवार व त्यांच्या समर्थकांची वर्दळ कायम होती. त्यामध्ये तिकीट न मिळाल्याने नाराज असलेल्यांचाही समावेश होता.

यामध्ये पुण्यातील खडकवासला मतदारसंघाचे विद्यमान आमदार भीमराव तापकीर यांचा समावेश आहे. ते सकाळीच देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला पोहोचले होते. मावळचे आमदार सुनील शेळके यांच्याविरोधातील भाजपचे इच्छुक बाळा भेगडे हेदेखील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला पोहोचले आहेत. त्यामुळे मावळच्या उमेदवारीवरुन जोरदार रस्सीखेच सुरु असल्याचे चित्र आहे.

अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत शेवटच्या क्षणी पक्षादेशामुळे माघार घ्यायला लागले मुरजी पटेल हेदेखील फडणवीसांना भेटले. डपटेल हे अंधेरी पूर्वमधून निवडणूक लढण्यास इच्छूक आहेत. मात्र, भाजपच्या रविवारी जाहीर झालेल्या मुंबईतील उमेदवारांच्या यादीत त्यांचा समावेश नव्हता. त्यामुळे पटेल यांच्या समर्थकांच्या गोटात अस्वस्थतेचे वातावरण आहे.

तसेच वर्सोवा विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार भारती लव्हेकर यांचेही भाजपच्या पहिल्या उमेदवारी यादीत नाव नव्हते. खराब कामगिरीमुळे त्यांचा पत्ता कट होणार, असल्याची चर्चा आहे. त्यांच्याऐवजी संजय पाण्डेय यांना संधी मिळेल, असा अंदाज आहे. मुंबईतील भाजपच्या १४ जागा जाहीर झाल्या आहेत. मात्र वर्सो वा मतदारसंघ 'वेट ंड वॉच 'वर ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे लव्हेकर देवेंद्र फडणवीस यांच्या भेट घेतली.

### हे विद्यमान आमदार अद्याप वेटिंग वर

रविंद्र पाटील (पेण मतदारसंघ), भीमराव तापकीर (खडकवासला, पुणे), सुनील कांबळे (कंटोंटमेंट), समाधान आवताडे (पंढरपुर), राम सातपुते (माळशिरस), प्रकाश भारसाकळे (अकोट), हरिष पिंपळे (मुर्तिजापुर), लखन मलिक (वाशीम), दादाराव केचे (आर्वी) इथे सुमीत वानखेडे फडणवीसांचे पीए यांनी तयारी केलीय. देवराम होळी (गडचिरोली), डॉ संदीप धुर्वे (आर्णी), नामदेव ससाणे (उमरखेड), कुमार आयलानी (उल्हासनगर),

### पाचपुते मुलासाठी आग्रही

श्रीगोंद्यातून भाजपाने आमदार बबनराव पाचपुते यांच्या ऐवजी त्यांच्या पत्नी प्रतीक्षा पाचपुते यांना तिकीट दिले आहे .मात्र ते आपला मुलाला उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्नशील आहेत त्यामुळे ते आज सकाळी पत्नी व मुलासह सागर बंगला गाठत फडणवीस यांच्याशी त्याबाबत चर्चा केल्याचे समजते.

## लोकसभेनंतर राज्यातील मतदारांच्या संख्येत ३६.३१ लाखांनी वाढ : मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची माहिती

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. २२ ऑक्टोबर : लोकसभा निवडणुकीनंतर गेल्या ५ महिन्यात राज्यातील २८८ मतदार संघामध्ये एकूण ३६ लाख ३१ हजार २७९ मतदार वाढले आहेत. मतदारयादी अद्ययावत करण्याच्या विहित नियमांनुसार प्रक्रिया होऊन ही वाढ झाली आहे, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सुमारे १० हजार मतदारांची नोंदणी झाल्याचा आरोप महाविकास आघाडीतील घटक पक्षांकडून करण्यात आला आहे. याबाबत राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने वस्तुस्थिती कळवलेली असून ती पुढीलप्रमाणे आहे

लोकसभा निवडणुकीच्यावेळी राज्यातील एकूण मतदार ९ कोटी २९ लाख ४३ हजार ८९० होते. २० ऑक्टोबरपर्यंत ३६ लाख ३१ हजार २७९ मतदारांची निव्वळ वाढ झाली आहे आणि २० ऑक्टोबर रोजी एकूण ९ कोटी ६५ लाख ५ हजार ९५८ मतदार आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर, मसुदा मतदार यादी ६ ऑगस्ट २०२४ रोजी दुसऱ्या संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रकाशित करण्यात आली. त्यानंतर, वेळापत्रकानुसार दावे आणि हरकती सादर करण्यासाठी १४ दिवसांचा कालावधी उपलब्ध होता आणि या दावे आणि हरकतींचा योग्य विचार केल्यानंतर अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाली. मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी नियमानुसार योग्य प्रक्रिया अवलंबली आहे. लोकप्रतिनिधी कायदा, १९५०, मतदार नोंदणी नियम, १९६० आणि भारत निवडणूक आयोगाच्या ११ ऑगस्ट २०२३ च्या पत्रातही मतदार यादीबाबत तरतुदी नमूद केल्या आहेत. या तरतुदींनुसार, फॉर्म क्रमांक ६ सादर करून मतदार यादीतील नाव नोंदले जाऊ शकते आणि फॉर्म क्रमांक ७ सादर करून वगळले जाऊ शकते. फॉर्म क्रमांक ८ सादर करून मतदाराच्या नोंदीमध्ये कोणताही बदल (नाव, पत्ता, बदलणे इ.) करता येईल आणि हे सर्व फॉर्म ऑनलाईन देखील उपलब्ध आहेत. दावे आणि हरकतींसाठी सात दिवसांची नोटीस देण्याची तरतूद आहे. आक्षेपांचा योग्य विचार केल्यानंतर, मतदार नोंदणी आधिकारी योग्य ते निर्णय घेतले जाते, असे त्यांनी स्पष्ट केलं आहे.

## राष्ट्रवादीच्या २७ स्टार प्रचारकांची यादी जाहीर

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई दि. २१ ऑक्टोबर - विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच अजित पवार गटाच्या २७ स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये पवार यांच्यासह पक्षाच्या सर्व प्रमुख नेत्यांचा समावेश आहे

राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खा. प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे, मंत्री छगन भुजबळ, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, कृषीमंत्री धनंजय मुंडे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, महिला व बालविकासमंत्री अदिती तटकरे, खा. नितीन पाटील, सयाजी शिंदे, आमदार अमोल मिटकरी, जल्लाउद्दीन सैय्यद, युवकचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा, महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार इद्रीस नायकवडी, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, सामाजिक सेलचे प्रदेशाध्यक्ष सुनिल मगरे, महेश शिंदे, राजलक्ष्मी भोसले, सुरेखा ठाकरे, उदयकुमार आहेर, शशिकांत तरंगे, वासिम बुर्हाण, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, युवती प्रदेशाध्यक्षा संध्या सोनवणे आदींचा समावेश आहे.

## ॲमेझॉन इंडिया ची स्टार्टअप इंडिया, डीपीआयआयटी सोबत भागीदारी

छत्रपती संभाजीनगर : ई-कॉमर्सद्वारे स्टार्टअप्सना त्यांचा व्यवसाय उभारण्यासाठी आणि विस्तारण्यासाठी सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठेऊन विविध उपक्रम राबविण्यासाठी उद्योग आणि अंतर्गत व्यापार संवर्धन विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली स्टार्टअप इंडिया सोबत काम करणार असल्याचे ॲमेझॉन इंडिया ने जाहीर केले आहे. ॲमेझॉन पात्र स्टार्टअप्सना ई-कॉमर्समधील संधींचा लाभ घेण्यासाठी स्टार्टअप इंडिया पोर्टलवरील डेडीकेटेड पृष्ठाच्या माध्यमातून ॲमेझॉन इंडिया मार्केटप्लेसवर नोंदणी करून स्टार्टअप इंडिया सोबत सहकार्य करेल. ॲमेझॉन या स्टार्टअप्सना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळवून देणार आहे. देशांतर्गत बाजारपेठेत प्रवेश मिळवण्यासाठी मदत करेल तसेच त्यांना ॲमेझॉन च्या अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन, बाजारात प्रवेश करण्यासाठी पाठबळ आणि लॉजिस्टिक्स मार्गदर्शन मिळेल. याशिवाय, ॲमेझॉन आपल्या सहेली कार्यक्रमाच्या माध्यमातून ई-कॉमर्समध्ये महिलांना सक्षम करण्यासाठी स्टार्टअप इंडिया सोबत सहयोग करेल.

## टोयोटा रुमियनची लिमिटेड फेस्टिव्हल एडिशन सादर केली

छत्रपती संभाजीनगर : हा सणासुदीचा हंगाम खास बनवत, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने कार खरेदीदारांसाठी आज टोयोटा रुमियनची फेस्टिव्ह एडिशन सादर केली आहे. रुमियनचे सौंदर्य आणि आराम वाढवण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेली आणि खास टोयोटा जेन्युइन ॲक्सेसरी (टीजीए) पॅकेजचे वैशिष्ट्य असलेली ही लिमिटेड-एडिशन, हा सणासुदीचा हंगाम उत्साहाने आणि स्टाईलमध्ये साजरा करण्यासाठी योग्य पर्याय आहे. सर्व ग्रेडमध्ये उपलब्ध रुमियनची ही फेस्टिव्ह एडिशन डीलरद्वारे फिट केलेल्या २०,६०८ रुपये किमतीच्या टीजीए पॅकेजसह येते, जे ग्राहकांना प्रीमियम अनुभव मिळेल याची खात्री देते.

## 'मेट्रो - फेस्टिव्ह गिफ्टिंग' विशेष

नाशिक : मेट्रो कॅश अँड कॅरी, भारतातील आघाडीच्या संघटित घाऊक विक्रेते आणि खाद्य विशेषज्ञ, भारतातील यशस्वी ऑपरेशन्सच्या २१ व्या वर्षाचे स्मरण करताना, २१ व्या सणाच्या भेटवस्तू ऑफरची 'मेट्रो - फेस्टिव्ह गिफ्टिंग' लहान आणि स्वतंत्र व्यवसायांसाठी मेट्रो भारतातील घाऊक दुकाने सुरुवात केली आहे-मेट्रो इंडियाचे ३ दशलक्षाहून अधिक लहान आणि स्वतंत्र व्यावसायिक ग्राहक १ ऑक्टोबरपासून अधिकृतपणे सुरू झालेल्या आणि ३ नोव्हेंबर २०२४ पर्यंत चालणाऱ्या ३५ दिवसांच्या उत्सवात विशेष सणाच्या भेटवस्तू ऑफरचा लाभ घेऊ शकतात. मेट्रो घाऊक दुकानांव्यतिरिक्त, विशेष भेटवस्तू ऑफर आणि डील मेट्रोच्या वेबसाइट वर ॲक्सेस केले जाऊ शकतात आणि मेट्रो घाऊक पवर देखील उपलब्ध केले गेले आहेत आहे.

## ग्रामपंचायत कर्मचा-यांची दिवाळी गोड किमान वेतन फरक थकबाकी रक्कम मिळणार

सेलू : तालूक्यातील ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या किमान वेतन फरक थकबाकी रक्कम(एरीएस)दिवाळी पूर्वी मिळणार असल्याने कर्मचा-यांची दिवाळी गोड होणार आहे. तालूक्यात ८२ ग्रामपंचायतमध्ये १२९ ग्रामपंचायत कर्मचारी आहेत यामध्ये शिपाई,पाणीपूरवठा,लिपीक,सफाई व वसूली कारकून असे कर्मचारी लोकसंख्येनूसार आहेत. सदरील कर्मचा-यांचे मागील सप्टेंबर २०२० ते मे २०२१ असे एकूण १९ महिन्यांची थकबाकी होती.त्यानूसार ९ महिन्याची एकूण ६९ लाख ३९ हजार ३३३ रूपये रक्कम प्राप्त झाली असून कर्मचा-यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात येत आहे.१ते १हजार ते २ हजार लोकसंख्या असणा-या ३३ ग्रामपंचायती,२हजार १ ते ३ हजार लोकसंख्या असणा-या ३५ ग्रामपंचायती,३ हजार१ ते ६ हजाराच्यावर १४ ग्रामपंचायती आहेत.यामध्ये १ ते १ हजार लोकसंख्येसाठी १ कर्मचारी,१हजार १ ते ३ हजार लोकसंख्येसाठी २ कर्मचारी,३ हजार १ ते ६ हजार लोकसंख्येसाठी ३ कर्मचारी तर ६ हजार १ ते १० हजार लोकसंख्येकरीता ६ कर्मचारी नियूक्त आहेत.शिपाई ११ हजार ६२५ रूपये तर पाणी पूरवठा कर्मचारी ११ हजार ९२५ रूपये मानधन देण्यात येते.या कर्मचा-यांना किमान वेतन फरक रक्कम १०० टक्केच्या ४७ टक्के रक्कम शासनाकडून देण्यात येत आहे.

**दोन दिवसात कर्मचा-यांच्या खात्यात वेतन थकबाकी**

मागील सप्टेंबर 2020 व मे 2021 अशा १९ महिन्यांची किमान वेतन फरक रक्कम थकबाकी राहिलेली होती त्यापैकी ९ महिन्यांची वेतन फरक थकबाकी रक्कम ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या बँक खात्यात वर्ग करण्याची प्रक्रिया दोन दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे.

-अमितकूमार मूंढे
गटविकास अधिकारी सेलू.

## खूप वाचले तर जगणे सुंदर होते : माधव गव्हाणे



सेलू(प्रतिनिधी) : माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम हे प्रेरणादायी व्यक्तिमत्व आहे. आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वतःमध्ये काही बदल करणे आवश्यक असते. ते परिवर्तन पुस्तकांच्या वाचनातून होते. खूप वाचले तर जगणे सुंदर होते. असे प्रतिपादन कवी माधव गव्हाणे यांनी केले. शहरातील नूतन विद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन शुक्रवार ( दि. १८) रोजी प्रशालेचा मराठी विभाग, ग्रंथालय व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपक्रमशील शिक्षक माधव गव्हाणे यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक संतोष पाटील हे होते. तर व्यासपीठावर उपमुख्याध्यापक किरण देशपांडे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना माधव गव्हाणे म्हणाले की, ' विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिरेकी वापर टाळावा. आपले निश्चित ध्येय ठरवून वाटचाल करावी. जीवनात संयम, जिद्द, विश्वास, श्रध्दा असावी. ' असेही ते म्हणाले. कार्यक्रमाची भुमिका मराठी विभाग प्रमुख डॉ. सुरेश हिवाळे यांनी विषद केली. प्रास्ताविक ग्रंथपाल अंजली देशपांडे यांनी केले. सुत्रसंचलन डॉ. काशिनाथ पल्लेवाड यांनी केले. तर आभार प्रदर्शन गोपाळ आम्ले यांनी केले. वर्षा कदम, रामेश्वर पवार, अरूण रामपुरकर यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला.

## गंगापूर न्यायालयात एक पेड मा के नाम उपक्रमात वृक्षारोपण



तभा वृत्तसेवा
गंगापूर दि.२२ ऑक्टोबर

तालुका विधी सेवा समिती गंगापूर व वकील संघ गंगापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक २२ ऑक्टोबर रोजी एक पेड मा के नाम या उपक्रमात वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

येथील न्यायालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी गंगापूर न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एस एस अग्रवाल मॅडम, सह दिवाणी न्यायाधीश पाटील मॅडम, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश ए.बी. इंगोले, तिसरे सह दिवाणी न्यायाधीश एस. वाय. वाघचौरे वकील संघाचे अध्यक्ष के. आर. क-हाळे, उपाध्यक्ष ए.पी.ठाकूर सचिव विठ्ठल काळे वकील संघाचे सदस्य सुशील कुमार शिराळे बि.आर. राजपूत वाय.एन.जाधव, व्ही. एस. मनोरकर, एस. के. नरोडे,ए.बी. कुलकर्णी ,जी.बी. चव्हाण, बी. एस. शिंदे, ए. एस. करडे,पी. डी. देशपांडे, ए.एस. इंगळे,डि. ई. पानकडे, डि.के. तारू,.आर. जी. बोठे एस.बी. शेख, महेश गुडदे, एस. पी. लबडे एम. पी. दारुंटे, आर.बी.दारुंटे पि.आर. बरडे, ए. आर.बरडे ,अविनाश चव्हाण, आकाश सिरसाठ ,रोहण भालेराव, असिफ शहा सचिन आंबेकर टी.व्ही.कोल्हे एकनाथ कानडे डीव्ही साबणे सहाय्यक अधीक्षक विजय बिरुटे, वरिष्ठ लिपिक सचिन घोडके एल आर गोखले व इतर चतुर्थ श्रेणी कर्मचारी उपस्थित होते.

### जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मथाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-५०४ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १६/०८/२०२८

अर्जदार : मुनाजीर मोहम्मद यासीन शेख रा. करीमनगर ता. कन्नड जि छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- नगर परिषद कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड एन. एम. शेख यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांना

त्यांच्या मुलाचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म

दिनांक १०/०९/२०१० रोजी करितनगर ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक १०/०९/२०१० रोजी करितनगर ता. कन्नड कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक १०/०९/२०१० रोजी करितनगर ता. कन्नड येथे आल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १०/०९/२०१० रोजी करितनगर ता. कन्नड येथे जन्म आल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १६/०८/२०२४ रोजी मदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या निश्स्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

### जाहीर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात,**

दि.कि. अर्ज क्र१८८/२०२८

अर्जदार १) अंबादास पि. शंकर सोमासे वय ६० वर्षे, भंदा शेती, रा. नागापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद ह.मु. विष्णु नगर, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद २) गणेश पि. शंकर सोमासे यय- ४९ वर्षे, धंदा शेती, रा. नागापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) इंदुबाई भ्र. शांताराम गवळी यय- ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. नागापूर, ता. कन्नड जि. औरंगाबाद ४) कमलबाई भ्र. कैलास साबळे वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. घाटनांद्रा ता. सिल्लोड जि. औरंगाबाद ५) नंदा भ्र. साहेबराव गवळी, यय- ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. रामनगर, हुजूर भोपाल, मध्यप्रदेश ६) मथुराबाई भ्र. शंकर सोमासे वय ८० वर्षे, धंदा घरकाम, रा. नागापूर, ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्याचे विधीज्ञ डी. डी. जोशी यांच्या मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाटी अनं दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील टिकाणचे कायमचे राहणारे असून अर्जदार क्र. १ ते ६. हे सख्खे वहीन-भाऊ असुन अर्जदार क्र. ६ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ६ यांचे वडील व अर्जदार क्र. ६ यांचे पती नामें शंकर मनाजी सोमासे हे होते ते दिनांक २७/०९/१९९८ रोजी मांजे नागापुर ता. कन्नड येथे मयत झालेले असून त्यांचा अंत्यविधी नागापुर येथेच झालेला आहे, तसेच मयत शंकर मनाजी सोमासे यांचे वडील नाये मनाजी सोमासे व आई उमाबाई मनाजी सोमासे हे फार वर्षापूर्वी मयत झालेले आहे. सोबत शंकर मनाजी सोमासे यांचे मृत्यु प्रमाणपत्र जोडत आहे. अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच महसुल दप्तरी वारसाचे नॉद करण्यासाठी तसेच विविध ठिकाणी मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार यांच्या वडीलांच्या नावे असलेली मौजे नागापुर शिवारातील जमीन ही धरणात संपादीत झालेली असल्याने धरणग्रस्त प्रमाणपत्र मिळण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे.

त्याअर्थी सदरील जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणाचाहो काही उजर, अक्षेप अथवा वारस प्रमाणपत्र अर्जदाराला देण्याचा कोणाचीही काही हरकत असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर होवुन उजर, आक्षेप नोंदवावा व मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या हक्कात वारसाचे प्रमाणपत्र देण्याचे आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १/१०/२०२४

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक कन्नड

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. १२०/२०२४

अर्जदारः- १) रामदास सदु चव्हाण वय-६१ वर्ष धंदा- शेती २) भारत सदु चव्हाण वय-५०वर्ष धंदा-शेती ३) एकनाथ सदु चव्हाण वय-४५वर्ष धंदा-शेती ४) कलाबाई दौलत चव्हाण वय-७५ वर्ष धंदा-घरकाम ५) ज्ञानेश्वर दौलत चव्हाण वय-४८वर्ष धंदा-शेती ६) शेवंताबाई शोभा चव्हाण वय-७० वर्ष धंदा-घरकाम ७) पोपट शोभा चव्हाण वय-४९ वर्ष धंदा-शेती ८) ईश्वर शोभा चव्हाण वय-४७वर्ष धंदा-शेती ९) पोंगुबाई विश्राम चव्हाण, वय-७५ वर्ष धंदा-घरकाम १०) संतोष विश्राम चव्हाण, वय-५० वर्ष धंदा-शेती ११) विनोद विश्राम चव्हाण, वय-३२वर्ष धंदा-शेती वरील सर्व रा.धाप ता. सोयगाव जि. छ. संभाजीनगर १२) सुमनबाई अरुण राठोड वय-५७ वर्ष धंदा-घरकाम रा. विष्णूनगर, पोस्ट-गाळण, ता.पाचोरा, जि. जळगाव. १३) संगीताबाई सुरेश वंजारी, वय-४३वर्ष धंदा- शेती रा.लाख तांडा, ता.पाचोरा जि. जळगाव. १४) कविताबाई गोकुळ राठोड वय-३८वर्ष धंदा- शेती रा. कोकडीतांडा, आंबेवडगाव, ता.पाचोरा, जि. जळगाव. १५) सविताबाई नारायण पवार वय-३६वर्ष धंदा- शेती रा. एन-६, सिडको, छ. संभाजीनगर

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. एस. पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.४, ६, व ९ यांचे सासरे व अर्जदार क्र. १ ते ३, ५, व ७ ते १५ यांचे आजोबा कै. लाला उर्फ लालचंद रामसिंग चव्हाण यांचा दिनांक ०१/०६/१९५४ रोजी वृद्धपकाळाणे मौजे धाप (अंतुर), ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते १५ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते १५ हे मयल कै. लाला उर्फ लालचंद रामसिंग चव्हाण यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते १५ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते १५ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख २१/११/२०२४. आज दि.२१/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन
विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १७०/२०२४.

अर्जदार : १. गंगाबाई आत्माराम तिडके, वय. ७५ वर्षे, धंदा. घरकाम, २. राजिव आत्माराम तिडके, वय. ५२ वर्षे, धंदा. शेती, ३. सुनिल आत्माराम तिडके, वय. ४८ वर्षे, धंदा. शेती, सर्व रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

-विरुध्द-

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण :- वारस प्रमाण-पत्र मिळणें बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांने वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत आत्माराम किसन तिडके हे दि. २६/११/१९९९ रोजी सोयगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ व ३ हे मयत आत्माराम किसन तिडके यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह अजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख : २६/११/२०२४.

आज दि. १९/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशावरुन
विभीगीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. /२०२४

१/- लताबाई दत्तात्रय इंगळे, वय ५२ वर्ष, धंदा शेती, रा. गलवाडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- सविता धोंडू सोनवणे, वय ४२ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ३/- प्रवीण दत्तात्रय इंगळे, वय ४० वर्ष, धंदा नोकरी, रा. वरीलप्रमाणे. ४/- सचिन दत्तात्रय इंगळे, वय ३८ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध
निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत दत्तात्रय नारायण इंगळे यांचा दि. २४.०५.२०२४ रोजी मौजे जळगाव, ता. जळगाव, जि. जळगाव येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ४ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क. १ ते ४ हे मयत दत्तात्रय नारायण इंगळे यांचे वारस असुन त्यांना मयत दत्तात्रय नारायण इंगळे यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल,

आजरोजी दि २१/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. ७/१२/२०२४

आदेशावरुन
विभीगीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६९/२०२४

१/- कैलास धनसिंग पवार, वय ५२ वर्ष, धंदा शेती, रा. नांदगाव, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.

विरूद्ध
निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत दुबलाबाई धनसिंग पवार यांचा दि. २५.१०.२०१३ रोजी मौजे नांदगाव तांडा, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क. १ हे मयत दुबलाबाई धनसिंग पवार यांचे वारस असुन त्यांना मयत दुबलाबाई धनसिंग पवार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि २१/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. २/१२/२०२४

आदेशावरुन
विभीगीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १७६/२०२४

१/- राजेद्र भिकन खैरनार, वय ५९ वर्ष, धंदा शेती, रा. गोंदेगाव, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- पुष्पाबाई राजेंद्र खैरनार, वय ५१ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ३/- गायत्री भूषण खैरनार, वय २८ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ४/- पुष्कराज भूषण खैरनार, वय ८ वर्ष, अ.पा.क. म्हणून अर्जदार क्र. ३.

विरूद्ध
निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत भूषण राजेद्र खैरनार यांचा दि. २६/११/२०२९ रोजी मौजे गोंदेगाव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ४ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क. १ ते ४ हे मयत भूषण राजेद्र खैरनार यांचे वारस असुन त्यांना मयत भूषण राजेद्र खैरनार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि. २१/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. ४/१२/२०२४

आदेशावरुन
विभीगीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १७४/२०२४

१/- निमाबाई बद्री राठोड, वय ५५ वर्ष, धंदा शेती, रा. लिहा दिगर, ह मु. सोयगाव, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- नवल बद्री राठोड, वय ३० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/- दौलत बद्री राठोड, वय २४ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४- ज्ञानेश्वर बद्री राठोड, वय १९ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध
निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत ओंकार दलपत राठोड यांचा दि. २३.०७.२०२४ रोजी मौजे लिहे दिगर, ता. जामनेर, जि. जळगाव येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ४ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क. १ ते ४ हे मयत ओंकार दलपत राठोड यांचे वारस असुन त्यांना मयत ओंकार दलपत राठोड यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि २१/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. ४/१२/२०२४

आदेशावरुन
विभीगीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १७१/२०२४.

नि. क्रं.

१. पदम हरलाल चव्हाण, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. उप्पलखेडा, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

२. बद्री हरलाल चव्हाण, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध
निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत हरलाल साहेबु चव्हाण यांचा दिनांक १०/१०/२०२२ व कासाबाई हरलाल चव्हाण यांचा दिनांक ०२/०४/२०२१ रोजी मौजे उप्पलखेडा येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते २ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते २ हे मयत हरलाल साहेबु चव्हाण व कासाबाई हरलाल चव्हाण यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र दंण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २१/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २५/११/२०२४

आदेशावरुन
विभीगीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
सोयगांव

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद दिवाणी किरकोळ**

अर्ज क्रं. १७३/२०२४.

१. शांताबाई दगडु दामोधर, वय ७५ वर्षे, धंदा शेती, रा. फर्दापुर, ता.सोयगांव, जि. छ.संभाजीनगर. २. पद्माकर दगडु दामोधर, वय ३४ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. सत्यवान दगडु दामोधर, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध
निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत दगडु त्रंबक दामोधर यांचा दिनांक १६/०९/२०२४ रोजी मौजे फर्दापुर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत दगडु त्रंबक दामोधर यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र दंण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २१/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २७/११/२०२४

आदेशावरुन
विभीगीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. १२८ /२०२४

अर्जदार : १) ललिताबाई बाबुलाल पवार, वय-५७ वर्ष धंदा-घरकाम २) रविंद्र बाबुलाल पवार, वय-३७ वर्ष धंदा- शेती ३) अनिता जितेंद्र आगळे वय-३४वर्ष धंदा-शेती ४) शरद बाबुलाल पवार वय-३१-वर्ष धंदा-शेती सर्व रा. किन्ही ता.सोयगाव, जि. औरंगाबाद

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी.सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील, कै. बाबुलाल गंगाराम पवार यांचा दिनांक-२१/०२/२०२४ रोजी वृद्धपकाळाणे मौजे किन्ही ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत कै. बाबुलाल गंगाराम पवार यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १९/१०/२०२४. आज दि. २१/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

२२/११/२४

आदेशावरुन
विभागीय लिपीकसहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# काहीजण निवडणुकीत भूछत्रा सारखी दिसतात व नंतर निघून जातात, पण मी तुमच्यासाठी २४ तास उपलब्ध : आ.संग्राम जगताप

## शहरातील प्रतिष्ठित नगर क्लबच्या सदस्यांशी आ.जगताप यांचा संवाद

नगर – शहरातील पाण्याचा, रस्त्यांचा, ड्रेनेज लाईन या मुलभूत सुविधांचा प्रश्न सोडवला आहे. शहरात कोट्यावधी रुपयांची विकासकामे पूर्ण झाली आहेत, तर बरीच कामे प्रगतीपथावर आहेत. आता उद्योग व रोजगार वाढण्यासाठी पिंपरी चिंचवडच्या धर्तीवर शहराच्या जवळच ६०० एकर जागेत नवी एमआयडीसी लवकच निर्माण करत आहोत. शहराला नवी दिशा देणारा हा प्रकल्प आहे. भविष्यात शहरात अनेक उड्डाणपूलही होणार आहेत. चहूबाजूंनी शहराचा सर्वंगीत विकास होत असल्याने आता नगर शहरात अनेक मल्टी नॅशनल ब्रान्ड येत आहेत. त्यामुळे नगर शहराची वाटचालही मेट्रो शहराकडे होत आहे. शहराचा विकास करताना मी सुखदुःखात तुमच्यासाठी २४ तास उपलब्ध आहे. पण बरीच लोक निवडणूक आली की भूछत्रा सारखी दिसतात व नंतर निघून जातात. २०१४ लाही काहीजण आले होते पण परत काही सापडले नाहीत. पण मी कायम जनतेसाठी उपलब्ध आहे. शहराचा आजपर्यंत जो विकास करू शकलो तो जनतेने दिलेल्या मत रुपी आशीर्वादामुळेच करू शकलो. त्यामुळे शहरच्या प्रगतीसाठी पुन्हा मला सर्व जनतेच्या आशिर्वादाची पुन्हा गरज आहे, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.



नगरमध्येही आता विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी प्रचार सुरु केला असून शहरात विविध भागांमध्ये मतदारांच्या गाठीभेटी वर आ.जगताप भर देत आहेत. आज सकाळीच शहरातील उच्चभ्रू व प्रतिष्ठित नागरिकांच्या नगर क्लबच्या सदस्यांची संवाद साधून गेल्या पाच वर्षात शहराचा आमदार या नात्याने केलेल्या विकास कामांचा धावता आढावा आ.जगताप यांनी घेतला. यावेळी नगर क्लबच्या वतीने उपाध्यक्ष सीए.अशोक पितळे यांनी आ.जगताप यांचा सत्कार करून निवडणुकीस शुभेच्छा दिल्या. यावेळी क्लबचे सचिव नरेंद्र फिरोदिया, संचालक सुमतिलाल कोठारी, सिए. प्रवीण कटारिया, पेमराज बोथरा, हेमेंद्र कसावा. दिलीप बोरा, अॅड.जयदीप भापकर, अॅड.किशोर देशपांडे, स्त्यान गुंदेचा, डॉ.जयंत भापकर, सुभाष जग्गी, अॅड.सुभाष काकडे आदींसह मोठ्या संख्येने क्लबचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी सिए अशोक पितळे म्हणाले, नगर शहराच्या अर्थकारणाला खेळ बसली आहे. ती दूर करण्यासाठी एखादा मोठा प्रकल्प नगरमध्ये येणे आवश्यक आहे. यासाठी नव्या एमआयडीसीमध्ये असा एखादा प्रकल्प व्हावा यासाठी आमदार जगताप यांनी प्रयत्न करावेत, अशी मागणी केली.

प्रस्ताविकात सुमतीलाल कोठारी म्हणाले, पुढील वीस ते पंचवीस वर्षाचा विचार करून आमदार संग्राम जगताप यांनी नगर शहरात मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू केली आहेत. तत्कालीन नगराध्यक्ष स्व.नवनीतभाई बार्शीकर यांच्यानंतर नगरमध्ये एवढे विकास कामे झालेली नाहीत. आज जर भाई असते तर तेही म्हणाले असते 'तू माझी गादी उत्तम प्रकारे चालवत आहेस. अशा शब्दात कौतुक करून नगर शहराचा सर्वांगीण विकास करणारे आमदार संग्राम जगताप यांच्या पाठीशी पूर्ण नगर क्लब व सर्व सदस्य उभे असल्याची ग्वाही दिली.

यावेळी पेमराज बोथरा व उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनीही आमदार जगताप यांनी केलेल्या विकास कामांचे कौतुक करून त्यांना विधानसभा निवडणुकीच्या विजयासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी अॅड.अशोक कोठारी, डॉ. आर.आर. धुत, राजू भिंगारवाला, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया, अशोक मोरे, डॉ. निसार, सागर बोरा, किरण भंडारी, श्री बात्रा, कांती पटेल, श्री देवगावकर, राजेंद्र चोपडा आदींसह मोठ्या संख्येने विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शालेय समिती सदस्यपदी मनाजोद्दिन ईनामदार यांची निवड

तभा वृत्तसेवा



बिडकीन दि २२ ऑक्टोबर – पैठण तालुक्यातील बिडकीन येथील जिल्हा परिषद शालेय समिती पदी बिडकीन ग्रामपंचायत सदस्य मिनाजोद्दिन मेहराजद्दिन ईनामदार ,व अमोल कोथिंबिरे यांची नियुक्ती, जिल्हा परिषद शालेय समिती पदी ग्रामपंचायत दोन सदस्य यांची नियुक्ती बाबत बिडकीन ग्रामपंचायत मासिक सभा दि ३ ऑक्टोबर रोजी सर्वानुमते असा ठराव घेण्यात आला कि जिल्हा परिषद शाळेच्या शालेय शिक्षण समिती मध्ये ग्रामपंचायत दोन सदस्य यांची निवड करण्यात आली असून या मध्ये उर्दू माध्यमिक समिती वर मिनाजोद्दिन ईनामदार यांची नियुक्ती तर मराठी माध्यमिक समिती वर अमोल तुकाराम कोथिंबिरे यांची नियुक्ती करण्यात आली असून यांना ग्रामपंचायत सरपंच अशोक धर्मे, ग्राम विकास अधिकारी अरुण गोर्डे, जिल्हा परिषद मुख्याध्यापक यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले, यांच्या नियुक्ती झाल्याबद्दल सरपंच अशोक धर्मे ग्रामविकास अधिकारी अरुण गोर्डे, सागर फरताळे,रमेश शिंदे, अविनाश राठोड, ज्ञानेश्वर कांबळे, राहुल ठाणगे, पत्रकार अली ईनामदार, अरुण देविदास,अलिम शेख,हसन चाऊस, रांजणगाव खुरी जिल्हा परिषद केंद्र प्रमुख उमेश सोनवणे आदींनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

पैठण उप शहराध्यक्षपदी आबासाहेब गिरगे.

तभा वृत्तसेवा पैठण दि २२ :- पैठण शहर भाजपच्या उप शहराध्यक्षपदी आबासाहेब गिरगे यांची निवड



जिल्हाध्यक्ष सुहास भाऊ शिरसाठ,छत्तीसगड भाजपा नेते सोमेश पांडे,औताडे,जिल्हा सरचिटणीस रेखाताई कुलकर्णी,पैठण विधानसभा प्रमुख डॉ सुनील शिंदे, सहकार आघाडीचे जिल्हाध्यक्ष तुषार शिसोदे,तालुकाध्यक्ष लक्ष्मण औटे,नगराध्यक्ष सुरज लोळगे,शहराध्यक्ष सिद्धार्थ परदेशी यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन करण्यात आली असून यावेळी किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाप्पासाहेब शेळके,जिल्हा उपाध्यक्ष महेश जोशीआबासाहेब सोलाटे,विजय ठाणगे,उप तालुका प्रमुख दत्ता वाकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. विधानसभा निवडणूक व संगठनात्मक विषया संदर्भात भारतीय जनता पक्षाच्या वतीने पितांबरी मंगल कार्यालय याठिकाणी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ही नियुक्ती करण्यात आली. या निवडीबद्दल आबासाहेब गिरगे यांचे अभिनंदन होत आहे.

# स्वाभिमानी शेतकरी संघटना विधानसभेला देणार उमेदवार

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२२ ऑक्टोबर – तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन त्या शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना परिवर्तन महाशक्ती या नावाखाली कन्नड – सोयगाव विधानसभा निवडणुक लढविणार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा कृषीभूषण भाऊसाहेब थोरात यांनी (दि.२१) ला सोमवारी दिली.

तालुक्यातील पाणपोई फाटा येथे एका खाजगी मंगल कार्यालयात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत भाऊसाहेब थोरात बोलत होते. पुढे बोलतांना थोरात म्हणाले कि येणाऱ्या काळात तालुक्यात आद्रक संशोधन केंद्र उभारणार, सहकारी साखर कारखाना उभारण्याचा मानस आहे, आद्रक पिकाची पिकविम्यात नोंद होवू शकते त्यासाठी प्रयत्न करणार असा जाहीरनामा संघटनेचा राहणार असून दोन दिवसात उमेदवाराच्या नावाची घोषणा करण्यात येईल अशी माहिती यावेळी भाऊसाहेब थोरात यांनी दिली.

जातीची लढाई न होता मातीची लढाई व्हावी कारण प्रत्येक जातीमध्ये शेतकरी आहेत. स्वाभिमानीची लढाई शेतकऱ्यांच्या खिशात पैसा यावा यासाठी आहे. असे तालुकाध्यक्ष प्रकाश बोरसे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस गणपतराव खरे, दिनकरराव पवार, चंद्रकांत देशमुख, प्रा. इंगळे, , नानासाहेब चव्हाण, मुक्तेश्वर चव्हाण, शंकर पवार, भगवान लहाणे, सुदाम जगताप, राजु बोंगाणे, बाळासाहेब चोपडे , विनायक खरात, निसार पठाण आदी उपस्थित होते.

# खुन करुन पळुन आलेला आरोपी अटकेत

जालना/प्रतिनिधी – खुन करुन पळुन आलेला आरोपी स्थागुशा पोलिसांनी पकडला. ही कारवाई २० ऑक्टोबर रोजी रात्री ०९:३० वाजेच्या सुमारास करण्यात आली. बहिणीस सासरवाडी येथे जबरदस्ती घेवुन का गेले याचा जाब विचारण्यास गेलेला भाऊ नामे अमोल फुलचंद नागणे, वय–२६ वर्ष, रा. चंदनझिरा, जालना याने मेव्हण्याचा नातेवाईक शंकर गजु तटवारे, वय–३५ वर्ष, रा. डोंगरगावं, ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यावर चाकुने वार करुन त्याचा खुन केला. त्यानुषंगाने सिल्लोड पोलीस ठाणे येथे आरोपी विरुध्द खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. आरोपी अमोल फुलचंद नागणे, वय–२६ वर्ष, रा. चंदनझिरा, जालना हा जालना येथे पळुन आलेला असल्याबाबत गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळाल्यावरुन पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल यांचे सुचनेनुसार पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांनी एक पथक तयार करुन आरोपीचा शोध घेणेबाबत सुचना दिल्या. दिनांक २१ ऑक्टोंबर रोजी आरोपीचा शोध घेत असतांना आरोपी अमोल फुलचंद नागणे, हा बस स्थानक जालना परिसरामध्ये असल्याबाबत खात्रीलायक माहिती मिळाल्याने त्यास बस स्थानक परिसरातुन ताब्यात घेतले व त्यास सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी यांचे ताब्यात देण्यात आला.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल , उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, पो. नि.सम्राटसिंग राजपुत, राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार संभाजी तनपुरे, देविदास भोजने, संजय सोनवणे, किशोर पुंगळे, सागर बाविस्कर, सर्व स्था.गु.शा.जालना व कृष्णा तंगे, साई पवार, राजु पवार या टीमने कारवाई केली

# विधानसभा निवडणुकी मध्ये भाजपच्या पहिल्या यादीत माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांची उमेदवारी जाहीर

## बुऱ्हानगर येथे कार्यकर्त्यांचा फटाके वाजून जल्लोष साजरा

नगर : विधानसभा निवडणूक २०२४ ची निवडणूक जाहीर झाली असून भारतीय जनता पार्टीने राहुरी पाथर्डी नगर विधानसभा मतदारसंघातून शिवाजीराव कर्डिले यांची पहिल्या यादीत उमेदवारी जाहीर केले असून कार्यकर्त्यांनीबुऱ्हानगर येथे फटाके वाजून व एकमेकांना पेढे खाऊ घालून जल्लोष केला यावेळी. माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले म्हणाले की गेली ३० वर्ष जनतेचे प्रश्न प्रामाणिकपणे सोडवले असून गेल्या ५ वर्षांमध्ये मी लोकप्रतिनिधी



नसताना देखील राज्य शासनाकडून मतदार संघाच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. जनतेच्या विश्वासावर मी नक्कीच विजय होणार आहे भारतीय जनता पार्टी च्या नेतृत्वाने माझ्यावर विश्वास टाकून पहिल्या यादीत माझे नाव जाहीर केले त्यांच्या विश्वासाला मी नक्कीच पात्र राहील आणि राहुरी पाथर्डी नगर मतदार संघामधील विजय कार्यकर्त्यांच्या पाठबळावर खेचून आणार आहे जनता ही सध्याच्या लोकप्रतिनिधीला कंटाळली असून त्यांच्या नाकर्त्यापणाला कंटाळली आहे जनतेच्या सुखदुःखामध्ये सामील होत दररोज जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न सोडविण्याचे काम सुरू आहे अशी प्रतिपादन माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी केले.

चौकट माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांची उमेदवारी जाहीर होतात चिमुकल्या नात्याच्या हस्ते पेढे खाऊन आनंद उत्सव साजरा करत विजयाचा निश्चय केला

# लोकशाहीमुळे मिळालेल्या अधिकार आणि कर्तव्यांबाबत युवकांनी जागरुक असावे – जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२२(जिमाका):- आपल्या आयुष्यात व सामाजिक जीवनात मिळणाऱ्या विविध सोई, सुविधा आपले शिक्षण, रोजगार यासारख्या बाबी प्राप्त करण्यात तसेच आपल्याला मिळालेले अधिकार आणि कर्तव्य हे सगळे लोकशाहीमुळे मिळालेले असून त्यासंदर्भात युवकांनी जागरुक असावे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.



विधानसभेच्या १०७–औरंगाबाद (मध्य) मतदारसंघांतर्गत येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मतदार जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ. प्रभा खैरे, डॉ. विनोद मुंदडा, आयएमएच्या डॉ. उज्वला दहिफळे, डॉ. श्रीनिवास गडाफ, डॉ. सुरेश सारवडे, स्वीप अधिकारी संजीव सोनार आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, विद्यार्थी जिवनात विद्यार्जन करणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. त्याच प्रमाणे आपल्या जीवनासाठी आपल्या समाजासाठी लोकशाहीचे संवर्धन आणि जतन करणे हे सुद्धा आपले आद्यकर्तव्य आहे. त्यासाठी युवकांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवून मतदान करणे हे महत्त्वाचे आहे. त्यासाठी युवकांनी जागरुक असायला हवे. विद्यार्थी दशेत असतांना विद्यार्थ्यंनी आपल्या भवतालच्या सार्वजनिक प्रश्नात लक्ष घालून पर्यावरण रक्षण, प्रदूषण नियंत्रण, वृक्षरोपण अशा विविध विषयांत विद्यार्थ्यांनी कार्यरत असणे आवश्यक आहे. आपल्या आई वडील, गुरुजनांचा आदर करणे, सुसंस्कारित होणे यासारख्या बाबी ह्या व्यक्तिमत्व विकासाला पूरक असतात. या संस्कारांपासून दुर जाणाऱ्या पिढीला संस्कारक्षम बनवून देश, राज्य आणि समाजाभिमुख युवक घडविणे हे आजच्या शिक्षक आणि पालकांचे उद्दिष्ट असायला हवे,असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

# सुनील गुट्टेंना परळी विधानसभेच्या उमेदवारीचे वरिष्ठांकडुन संकेत!

## शेतकरी संवाद यात्रे निमित्ताने घेतलेला आढाव पक्षश्रेष्ठीकडे सुपूर्त

मुंबईः सध्या राज्यात विधान सभेच्या उमेदवारी बाबत अनेक उमेदवारांची आप आपल्या पक्षश्रेष्ठीकडे उमेदवारी मिळवण्यासाठी भेटी घेतल्या जात आहेत त्यातच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटा कडेही परळी विधानसभा मतदारसंघात आपल्यालाच उमेदवारी मिळावी या करिता आप आपल्या परीने इच्छुक उमेदवार भेटी घेत असताना पक्षाच्या कोअर कमिटीने युवानेते सुनील गुट्टे व जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांना तातडीने मुंबई येथे बोलावून पक्षश्रेष्ठीकडुन उमेदवारीचे संकेत दिल्याचे कळते आहे.



युवानेते सुनील गुट्टे व जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांनी आज रविवारी सकाळी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार साहेब, राज्य अध्यक्ष जयंत पाटिल,खा. सुप्रिया सुळे,आ.रोहित दादा पवार यांची भेट घेऊन परळी विधानसभा मतदार संघा विषयी सविस्तर चर्चा करण्यात आली.चर्चा दरम्यान परळी मतदारसंघात काढलेल्या शेतकरी संवाद यात्रेचा अहवाल, नौकरी महोत्सव अदी कार्याचा कार्य अहवाल पक्षश्रेष्ठींना देऊन मतदार संघाची सद्य परिस्थिती वर सखोल चर्चा करण्यात आली. पक्षश्रेष्ठींकडून शेतकरी संवाद यात्रा नौकरी महोत्सवाची दखल घेऊन कौतुक केले असून अजून ही पुढे आशाच कार्याची अपेक्षा पक्षश्रेष्ठीकडुन

युवानेते सुनील गुट्टे व जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे या माता व पुत्राला सुचक विधान करुन उमेदवारी चे संकेत दिले असल्याचे बोलले जात आहे.याच बैठकीत यावेळी परळी मतदारसंघात सुरू केलेल्या शेतकरी संवाद यात्रेबद्दल साहेबांना माहिती दिली. तसेच मतदारसंघात आयोजित रोजगार मेळावे, ज्यातून हजारो तरुणांना पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर येथे रोजगार मिळाला, याबद्दलही चर्चा झाली. आतापर्यंत केलेल्या कामांचा कार्य अहवाल शरद पवार साहेबाना सादर केला.तसेच परळी मतदार संघात विधानसभेसाठी इच्छुक असल्याचा माता पुत्राकडुन उमेदवारी आम्हालाच मिळावी अशी मागणी करताच तुम्ही परत मतदारसंघात जाऊन जोमाने कामाला लागा अश्या सुचना पक्षश्रेष्ठींनी दिल्या आसल्याने सुनील गुट्टेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तथा महाविकास आघाडीचे उमेदवार असतील या तातडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार साहेब, राज्य अध्यक्ष जयंत पाटिल,खा. सुप्रिया सुळे,आ.रोहित दादा पवार यांची भेट

# समाजमाध्यमावर फोटो टाकण्याची धमकी देऊन, तरुणीवर दोन वर्षे अत्याचार; भाडेकरू नराधमाला केलं जेरबंद

जालना/प्रतिनिधी

जालना शहरातील मधूबन कॉलनीत राहणार्या एका २२ वर्षीय तरुणीच्या घरात खोली भाड्याने घेऊन, कार्तिक भाऊसाहेब नरवडे (रा. मानदेऊळगाव, ता. बदनापूर) हा त्याच्या आईसोबत राहत होता..

त्यादरम्यान, सदर तरुणी नरवडे याच्या आईला भेटण्यासाठी त्याच्या खोलीत गेली असताना, त्याने तिच्यासोबत एक सेल्फी फोटो काढला होता. त्यावेळी त्यास तिने फोटो डिलिट करण्यासाठी वारंवार विनवणी केली तरी त्याने तो फोटो डिलिट केला होता.

त्यानंतर काही दिवसांनी तो सदर तरुणीची खोली सोडून, देहेडकरवाडी भागात भाड्याने खोली घेऊन, राहण्यासाठी गेला होता. सदर तरुणीला गेल्या दोन वर्षांपासून आपले दोघांचे फोटो समाजमाध्यमावर टाकून, व्हायरल करीन, अशी धमकी देऊन, देहेडकरवाडी भागात खोलीवर बोलावून घेऊन, तिच्यावर अनेकवेळा बलात्कार केला. तसेच, ३० सप्टेंबर २०२४ रोजीदेखील संभाजीनगर रोडवरील करमाडजवळ असलेल्या लॉजवर नेऊन सदर तरुणीवर कार्तिक नरवडे याने बलात्कार केला होता. याप्रकरणी कदीम जालना पोलीसांनी रविवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल केला आहे. कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिध्दार्थ माने, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानदेव नागरे, किशोर वनवे, प्र. पोलीस उपनिरीक्षक नेमाने यांच्यासह पिंक पथकाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. दरम्यान, आज आरोपी कार्तिक नरवडे यास ताब्यात घेतले आहे.

गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर वनवे हे करीत असून, त्यांना पिंक मोबाईल पथकाचे कर्मचारी मदन डोईफोडे, सुमित्रा अंभोरे, चालक नाथा दिवटे आदी सहकार्य करीत आहेत.

# जुगार अड्ड्यावर, छापा, ५ लाखाचा मुद्देमाल जप्त

जालना/प्रतिनिधी – मंठा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लिंबखेडा येथे चालणार्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकला. पोलीस अधीक्षक यांच्या आदेशावरून पोनि श्री. पंकज जाधव स्थानिक गुन्हे शाखा जालना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने पोलीस ठाणे मंठा हद्यीत अवैध धंद्याचे माहिती घेत असतांना, मौले लिंबखेडा शिवारात जुगार अड्डा चालु असल्याची माहिती गोपनीय बातमीदार यांचे मार्फतीने मिळाली होती. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने, मौजे लिंबखेडा शिवारात दि.२० ऑक्टोंबर रोजी १५:३० वाजता छापा कारवाई करुन जुगार खेळणारे रामदास भास्कर गायकवाड, वय ४० वर्ष, रा.येवती ता. लोणार जि. बुलडाणा प्रल्हाद शामराव नागरे, वय ४० वर्ष, रा.येवती ता.लोणार जि. बुलडाणा, समाधान ज्ञानदेव आघाव, वय ४३ वर्ष, रा.अंभोरा शेळके, ता. मंठा ,राजु रामदास कायंदे, रा.येवती ता.लोणार जि. बुलडाणा ,सोपान साहेबराव गायकवाड,रा. टाकळखोपा ता.मंठा व अड्डा चालविणारे गजानन राठोड रा. लिंबखेडा ता. मंठा , संतोष म्हस्के रा. लिंबखेडा, यांचेसह घटनास्थळावरुन वाहनासह पळुन गेलेले ०४ जुगारी असे एकुण (११) इसमांविरुध्द पोलीस ठाणे मंठा येथे महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असुन, कार्यवाहीमध्ये रोख रक्कम, मोबाईल, व मोटारसायकल असा एकुण ५ लाख २२ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार, रुस्तुम जैवाळ, कैलास खाडे, इरशाद पटेल, किशोर पुंगळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा यांनी कामगिरी केली.

# जालना शहरात ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गाचे आयोजन

जालना/प्रतिनिधी – चैतन्यसाधना रिसर्च फाउंडेशन, ब्राम्हण सभा व रेड स्वस्तिक यांच्या संयुक्त विद्यमाने दर वर्षी प्रमाणे या वर्षीही ज्ञानाची दिवाळी साजरी करण्यासाठी, दिवाळीच्या सुट्टीत जालना शहरात ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. संत ज्ञानेश्वरांनी तेराव्या शतकात भगवद्गीतेवर केलेली टीका केली तीच ज्ञानेश्वरी होय. संत ज्ञानेश्वरांनी संस्कृत भाषेत असलेली ब्रम्हविद्या मराठी भाषेत सांगून ब्रम्हविद्येचा सुकाळ केला आहे आणि जो कोणी ही ब्रम्हविद्या घेईल व देईल त्या दोघांचे कल्याण होईल असे ज्ञानेश्वरीत सांगितले आहे. या उदात्त हेतूनेच जालना शहरात दर वर्षी ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात येत असते. यावेळी ज्ञानेश्वरीतील ९ व्या अध्यायाचा अभ्यास होणार आहे. अध्याय ९ वा राजगुह्यराजविद्यायोग असून यात गुह्य ज्ञानाचा परिचय करून देण्यात आला आहे. या अध्यायावर संतसाहित्याचे व वेदांत तत्त्वज्ञानाचे अभ्यासक हभप डॉ.प्रमोद कुमावत हे निरुपण करणार आहेत. जालना शहरात हा अभ्यास वर्ग दिनांक ४ ते ८ नोव्हेंबर २०२४ दरम्यान ब्राम्हण सभा भवन, स्टेशन रोड, गांधी चमन येथे सकाळी ६.३० ते ९.३० या वेळेत होणार आहे. हा अभ्यास वर्ग नि:शुल्क असून अभ्यासवर्ग पूर्ण करणार्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. अभ्यासक, साधकांनी ज्ञानेश्वरीचा अभ्यास करण्यासाठी वही,पेन व एक ज्ञानेश्वरी आपल्या सोबत आणावी. ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गाला ब्राम्हण सभेचे अध्यक्ष श्री.कल्याणराव देशपांडे, उपाध्यक्ष श्री रमेश देहेडकर, रेड स्वस्तिकचे अध्यक्ष श्री जितेंद्र अग्रवाल,सचिव डॉ.मोहन शिंदे,श्री पवन जोशी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या वर्गाचा लाभ साधकांनी,मुमुक्षूंनी तसेच अभ्यासकांनी घ्यावा असे आवाहन चैतन्यसाधना रिसर्च फाउंडेशनचे संचालक हभप सागर महाराज चापाईतकर, सदस्य डॉ. ऋषीबाबा शिंदे,डॉ.प्रकाश मांटे,डॉ.नंदकिशोर डंबाळे, प्रा.श्री.प्रशांत जाधव,डॉ.दिनेश इंगळे,श्री.गजानन मापारी,डॉ. शंकर तिकांडे, श्री.महेश उफाड,श्री.संजय चौधरी, श्री संदीप भांदरगे, श्री जालिंदर बटूळे,श्री अशोक चुनखडे आदींनी केले आहे.

## अग्रलेख...

# नक्षलवाद्यांविरुद्धचा मोलाचा लढा यशस्वी

देशाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याचे आवाहन सरकारतर्फे नक्षलवाद्यांना करण्यात आले होते. तसे न केल्यास दोन वर्षांमध्ये नक्षलवाद्यांना संपवून टाकू, असे गृहमंत्री अमित शाह यांनी बजावले होते. या पृष्ठभूमीवर राज्य आणि केंद्र सरकारने समन्वय साधत अलिकडेच अनेक नक्षलींना यमसदनी धाडले. ही कारवाई करून सरकारने नक्षलवादाच्या विरोधातील लढाई अंतिम टप्प्यात असल्याचा संदेश दिला आहे. राज्य आणि केंद्र सरकारमध्ये समन्वय असल्यास काय करता येते, याचे उदाहरण म्हणजे गडचिरोलीपासून अडीचशे किलोमीटर अंतरावर ४० नक्षलवाद्यांना यमसदनी धाडण्यात आल्याची अलिकडील घटना. ही कारवाई करून सरकारने नक्षलवादाच्या विरोधातील लढाई अंतिम टप्प्यात असल्याचा संदेश दिला आहे. आज देशातील लोकशाही व्यवस्थेसमोर नक्षलवाद हे मोठे आव्हान आहे. महाराष्ट्र आणि तेलंगणामधील नक्षलवादाला बऱ्यापैकी अटकाव करण्यात यश आले असले, तरी छत्तीसगड, झारखंड राज्यात नक्षलवादी अधूनमधून डोके वर काढत असतात. एकीकडे विकास झाला नाही, अशी बोंब ठोकायची आणि दुसरीकडे विकासाचे प्रकल्प होऊ द्यायचे नाहीत; स्थानिक आदिवासींना सरकारविरोधात भडकावून द्यायचे, अशी नीती नक्षलवादी अवलंबत आहे. आता त्यांना स्थानिकांचा पूर्वीइतका पाठिंबा राहिलेला नाही. त्यामुळे नक्षलवाद्यांचा ठावठिकाणा शोधण्यात अडचणी येत नाहीत. 'सरकार या प्रदेशाच्या विकासासाठी, युवकांच्या विकासासाठी, तुमच्या कुटुंबाच्या विकासासाठी कटिबद्ध आहे; शस्त्रे सोडा आणि येथे सुरू असलेल्या विकासाच्या रथात सामील व्हा. नवीन युगाला बळ द्या,' असे आवाहन शाह यांनी अलिकडे केले होते; ते महत्त्वाचे मानले पाहिजे. गेल्या काही दिवसांमध्ये अनेक नक्षलवाद्यांनी चुकीचा मार्ग सोडून विकासाची वाट निवडली असली, तरी काही जण रक्तरंजित क्रांतीचा मार्ग सोडायला तयार नाहीत. त्यांना वठणीवर आणण्यासाठी सरकार उचलत असलेली पावले चुकीची नाहीत. संपूर्ण छत्तीसगड आणि देशाला नक्षलवादाच्या समस्येतून मुक्त करण्यासाठी दोन वर्षांचा कृती आराखडा तयार करून शाह यांनी अल्टिमेटम दिला होता. नक्षलवाद्यांनी मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी आत्मसमर्पण करावे किंवा सक्तीच्या कारवाईसाठी तयार राहावे, असा इशारा त्यांनी दिला होता. अमित शाह आणि छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साय यांच्या नक्षलवादाविरुद्धच्या आक्रमक भूमिकेचा परिणाम आता दिसून येत आहे. गेल्या नऊ महिन्यांमध्ये केंद्र आणि राज्य सरकारमधील उत्तम समन्वयामुळे पोलिस, निमलष्करी दल, केंद्रीय राखीव पोलिस आदींचे मनोबल वाढले असून माहिती यंत्रणा पूर्वीपेक्षा अधिक मजबूत झाली आहे. त्यामुळे राज्यात सातत्याने नक्षलवाद्यांच्या हत्या होत आहेत. दर महिन्याला नक्षलवादी मारले जात आहेत. नक्षलवाद्यांविषयी असलेली सामान्यांची भीती आता कमी व्हायला लागली आहे. अनेक बाबतीत तर स्थानिकांनीच यंत्रणांना नक्षलवाद्यांची माहिती दिली आहे. नारायणपूर-दंतेवाडा जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या थुलथुली गावाजवळील जंगल आणि डोंगराळ भागात झालेल्या चकमकीत जवानांनी ४० नक्षलवादी ठार केले. गेल्या दोन तपांमधील ही सर्वात मोठी कारवाई आहे. नक्षलवाद संपवण्यासाठी सुरू झालेला लढा आता शेवटपर्यंत पोहोचल्यानंतरच संपेल, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. काही दिवसांपूर्वी यंत्रणांना दंतेवाडा जिल्ह्यातील गावडी, थुलाथुली, नेंदूर आणि रेंगावाया गावांदरम्यानच्या टेकडीवर नक्षलवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाली होती. त्यानंतर, 'डीआरजी' आणि 'स्पेशल टास्क फोर्स'च्या (एसटीएफ) जवानांची संयुक्त टीम दंतेवाडा आणि नारायणपूर जिल्ह्यातून रवाना करण्यात आली. हा भाग इंद्रावती एरिया कमिटी, पीएलजीए (पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी) कंपनी क्रमांक ६ आणि माओवाद्यांची प्लाटून १६ यांचा गड मानला जातो. सुरक्षा दल परिसरात शोध मोहीम राबवत असताना नक्षलवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार सुरू केला. त्याला सुरक्षा दलांनीही प्रत्युत्तर दिले. सुरक्षा दलांनी या परिसरातून एके-४७ रायफल, एसएलआर (सेल्फ-लोडिंग रायफल), इन्सास रायफल, एलएमजी रायफल आणि .३०३ रायफलसह शस्त्रांचा साठा जप्त केला, ही मोठी गोष्ट होती. दंतेवाडा आणि नारायणपूरसह सात जिल्ह्यांचा समावेश असलेल्या बस्तर प्रदेशात यावर्षी आतापर्यंत सुरक्षा दलांनी वेगवेगळ्या चकमकींमध्ये १८५ माओवाद्यांना ठार केले आहे. याआधी १६ एप्रिल रोजी कांकेर जिल्ह्यात सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीमध्ये काही वरिष्ठ केडरसह २९ नक्षलवादी ठार झाले होते. छत्तीसगड, आंध्रप्रदेश, झारखंड, केरळ, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल या सात राज्यांमध्ये नक्षलवादी अधूनमधून डोके वर काढत असतात. देशातील ३८ जिल्ह्यांपैकी छत्तीसगडमधील १५ जिल्हे नक्षलग्रस्त आहेत. यामध्ये विजापूर, बस्तर, दंतेवाडा, धमतरी, गरिआबंद, कांकेर, कोंडागाव, महासमुंद, नारायणपूर, राजनंदगाव, मोहला-मानपूर-अंबागड चौकी, खैरागड छूई खान गंडई, सुकमा, कबीरधाम आणि मुंगेली या नक्षलग्रस्त जिल्ह्यांचा समावेश आहे. संपूर्ण देशात छत्तीसगडमध्ये सर्वाधिक नक्षलग्रस्त जिल्हे आहेत. हा 'रेड टेरर'चा बालेकिल्ला आहे. त्याला 'रेड कॉरिडॉर' म्हणतात. मध्य पूर्व आणि दक्षिण भारतातील भाग या 'रेड कॉरिडॉर'मुळे सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. या भागांना नक्षलवाद्यांचा गड म्हटले जाते. गेल्या पाच दशकांमध्ये या भागात अशा भयानक घटना घडल्या आहेत, ज्यात हजारो लोकांना आपला जीव गमवावा लागला. विशेषत: या घटनांमध्ये निमलष्करी दलाच्या जवानांनी मोठ्या संख्येने बलिदान दिले आहे. या कारवायांमुळे गेल्या १० वर्षांच्या तुलनेत नक्षलवादाला बऱ्यापैकी आळा घालण्यात यश आले आहे. २०२१ मध्ये ६० जिल्ह्यांमध्ये पसरलेला नक्षलवाद आता फक्त ३० जिल्ह्यांमध्ये राहिला आहे. हे जिल्हे बिहार, छत्तीसगड, झारखंड, ओडिशा आणि पश्चिम बंगालमधील आहेत. हे सर्व जिल्हे आदिवासीबहुल क्षेत्र असून जंगल आणि डोंगरांनी वेढलेले आहेत. नक्षलवादी या ठिकाणांना 'सेफ झोन' मानून आपला अड्डा बनवतात. तेलंगणामध्ये नक्षलवाद आता बॅकफूटवर असला, तरी छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिशा, पश्चिम बंगाल तसेच बिहारमध्ये नक्षलवाद्यांची भीती अजूनही कायम आहे. या भागांमध्ये नक्षलवादी सक्रिय असून एकामागून एक मोठ्या घटना घडवून आणत आहेत. अल्पभूधारक शेतमजूर आणि गरिबांना जमीन हक्क आणि रोजगार मिळावा, या मागणीसाठी नक्षलवादी वारंवार पोलिस, प्रभावशाली आदिवासी, राजकारणी आणि सरकारी कर्मचाऱ्यांना लक्ष्य करतात. विशेष म्हणजे या वेळच्या मोहिमेत एकाही जवानाचे बलिदान न देता ४० नक्षलवाद्यांना यमसदनी धाडण्यात यश आले. त्यात बस्तर विभागाची म्होरकी असलेल्या उर्मिलावर २५ लाखांचे बक्षीस होते. ती पूर्व बस्तरची प्रभारी होती. येथे १६ नक्षलवाद्यांवर १ कोटी ३० लाखांहून अधिक रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. या वर्षात ७०६ नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली असून ७३३ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. या कारवाईनंतर नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला असलेल्या पूर्व बस्तर विभागातील माओवाद्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे सरकारची मोठी उपलब्धी मानली पाहिजे.

सर्वोच्च नक्षलवादी नेतृत्व या भागाला आपले सुरक्षित आश्रयस्थान मानत होते. आजपर्यंतच्या नक्षली कारवायांमध्ये कांकेरमध्ये झालेल्या कारवाईपेक्षा ही मोठी नक्षल कारवाई ठरली आहे. ४० नक्षलवाद्यांनी थुलथुली जंगलात एक मोठी बैठक घेऊन जवानांचे मोठे नुकसान करण्याची रणनीती आखली होती. या बैठकीला प्रमुख नक्षलवादी नेतेही उपस्थित होते; मात्र पोलिसांनी त्यांचा खात्मा केला. पूर्व बस्तर विभागासह इंद्रावती क्षेत्र समितीमधील डझनभर नक्षलवादी तसेच नक्षलवाद्यांचे प्रमुख नेते कमलेश, नीती ऊर्फ उर्मिला यांच्याशिवाय इतर बडे नक्षलवादी बैठकीसाठी आले होते. यात नक्षलवादी आघाडीचे नेते कमलेश, नीती उर्फ उर्मिला यांचीही हत्या झाली. काही नक्षलवादी घटनास्थळावरून फरार झाले. नक्षलवाद्यांच्या कंपनी-६ चे मोठे नुकसान झाले आहे. या मोहिमेचे उत्तम नियोजन करून सुरक्षा दलांनी पाच जिल्ह्यांमधील समर्थ जवानांचा समावेश करून घेतला, हे बरे झाले.

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# युरोपप्रमाणे आशियातही नाटो?

जपान हा देश पूर्व आशियात प्रशांत महासागर, ओखोत्स्क समुद्र, जपानचा समुद्र आणि पूर्व चीन समुद्रांनी वेढलेला देश आहे. जपानी प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ३,७८,००० चौरस किलोमीटर आहे. तुलनेत जर्मनीचे क्षेत्रफळ ३,५७,५९२ चौरस किलोमीटर आहे. जपानमध्ये होक्काइडो, होन्शू, शिकोकू आणि क्युशू या चार मोठ्या बेटांचा आणि इतर लहान बेटांचा समावेश आहे. सर्वात मोठे बेट होन्शू सुमारे २,२८,००० चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असलेले जगातील सातव्या क्रमांकाचे बेट आहे. जपानची लोकसंख्या सुमारे १२.५१ कोटी आहे तर रशियाची लोकसंख्या थोडी जास्त म्हणजे सुमारे १४.४२ कोटी आहे. क्षेत्रफळ मात्र प्रचंड म्हणजे १,७०,९८,२४२ चौरस किलोमीटर आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या १२.२८ कोटी आणि क्षेत्रफळ ३,०८,००० चौरस किलोमीटर आहे.

लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी हा जपानमधला दुसऱ्या महायुद्धापासूनचा सत्ताधारी पक्ष राहिला आहे. मावळते पंतप्रधान लिबरल डेमोक्रॅटिक पार्टीचेच फुमियो किशिदा यांच्या कारकीर्दीतील अनेक घोटाळे समोर आल्यामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला. जपानचे नवीन पंतप्रधान लिबरल डेमोक्रॅटिक पार्टीचे शिगेरू इशिबा यांनी आपल्या कारकीर्दीतील प्रथम हाताळायचे मुद्दे स्पष्ट केले आहेत, ते असे- पहिला मुद्दा त्यांच्या मूळ पक्षाचे शुद्धीकरण हा असेल. दुसरा मुद्दा असेल मरगळलेल्या जपानी अर्थक्षेत्रात पुन्हा चेतना निर्माण करणे. तिसरा जपानच्या सुरक्षेला बाधा निर्माण करू पाहणाऱ्या शक्तिशाली शेजाऱ्यांचा बंदोबस्त करणे. यात अर्थातच चीन, उत्तर कोरिया आणि रशिया यांचा समावेश असेल हे उघड आहे. पंतप्रधानपदासाठीची ही आपली पाचवी आणि शेवटची शर्यत असल्याचे त्यांनी अगोदरच जाहीर केले होते. या पाचव्या प्रयत्नात त्यांनी प्रतिस्पर्ध्याविरुद्ध निसटता विजय संपादन केला आहे. त्यांच्या प्रतिस्पर्धी होत्या सानी ताकायची. सानी ताकायची यांच्या गाठीशी मंत्री म्हणून काम केल्याचा अनुभव होता. त्या लिबरल डेमोक्रॅटिक पार्टीच्या २००० पासूनच्या सदस्या आहेत. जुन्या कट्टरवादी म्हणून त्या जपानमध्ये ओळखल्या जातात. असो.

इशिबा १९८६ मध्ये प्रथमच पार्लमेंटमध्ये निवडून आले. संरक्षण, कृषी ही महत्त्वाची खाती त्यांनी सांभाळली. ते कट्टर राष्ट्रवादी म्हणून ओळखले जातात. सानी ताकायचीसह एकूण ९ प्रतिस्पर्ध्यांना बाजूला सारत त्यांनी पंतप्रधानपदाची शर्यत निसटत्या बहुमताने का होईना, पण जिंकली आहे. इशिबा स्त्री-पुरुष समानता, समलिंगी विवाहांना मान्यता यांचे पुरस्कर्ते आहेत. युरोपातील नाटोप्रमाणे आशियन नाटोची उभारणी केली पाहिजे, या भूमिकेचे ते खंदे पुरस्कर्ते आहेत. नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन ३२ सदस्यांची युरोपातील राष्ट्रांची लष्करी संघटना रशियन वर्चस्वाला आवर घालण्यासाठी दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झाली. हिचा ३० वा सदस्य नॉर्थ मॅकेडोनिया आहे. ३१ वा फिनलंड २०२३ मध्ये दाखल झाला तर स्वीडन नुकताच या संघटनेत सामील झालेला ३२ वा सदस्य आहे तसेच आशियातही व्हायला इशिबांना हवे आहे.

तसे पाहिले तर, अनझूस किंवा एएनझेडयूएस (दी ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड अँड युनायटेड स्टेट्स सिक्युरिटी ट्रिटी) १९५१ मध्येच आकाराला आली होती. हिचा उद्देशही पॅसिफिक महासागर क्षेत्रात सुरक्षा पुरवण्याचाच होता. पण पुढे हा तह औपचारिकरीत्या जरी रद्द करण्यात आला नाही, तरी न्यूझीलंडने आपला देश न्यूक्लिअर फ्री झोन म्हणून जाहीर केला आणि अमेरिकेच्या न्यूक्लिअर पॉवरवर चालणाऱ्या सबमरीन्सना आपल्या देशाच्या बंदरात प्रवेश नाकारला. ही भूमिका न्यूझीलंडने कोणाच्या दडपणाखाली येऊन स्वीकारली ते सांगण्याची आवश्यकता नसावी. यामुळे हा तह असूनही नसल्यातच जमा झाला. हा इतिहास बाजूला सारत मूळ कराराला इशिबा यांनी आता दक्षिण कोरिया आणि फिलिपाईन्सला सोबत घेऊन नवसंजीवनी प्रदान करावी आणि अमेरिकेच्या नेतृत्वाखाली एक संरक्षक जाळे किंवा कवच उभारावे, असा आग्रही प्रचार सुरू केला आहे. पॅसिफिक क्षेत्राला शांतता आणि स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी हे अत्यावश्यक आहे, असे ते म्हणतात. चीनने तर लगेचच आगपाखड करायला सुरुवात केली आहे. पण इशिबा यांनी चीनच्या दक्षिण चिनी समुद्र क्षेत्रातील सामरिक हालचाली कशा वाढत चालल्या आहेत, यावर भर देणे सुरूच ठेवले आहे. एक जबरदस्त संरक्षक फळी उभारली गेली तरच चीनला जरब बसेल, असे इशिबा पुन:पुन्हा कंठरवाने सांगत आहेत. आज अमेरिका आणि जपान यांचे संबंध दृढ आहेत. पण ते बरोबरीच्या नात्याचे असायला हवेत, असे इशिबा यांचे म्हणणे आहे. स्वसंरक्षणासाठी आयोजित प्रशिक्षण देणारी केंद्रे अमेरिकेत उभारली जावीत, या मताचे ते आहेत. या माध्यमातून जपान आणि अमेरिका आणखी जवळ तर येतीलच; शिवाय संरक्षणविषयक बाबींकडे विशेष लक्षही पुरविता येईल, असा त्यांचा विश्वास आहे. या मुद्द्यावर आणखी स्पष्टपणे बोलण्याचे त्यांनी टाळले आहे. जपानच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी अमेरिकेने उचलावी, असे तर इशिबा यांना म्हणायचे नाही ना, अशी शंका अभ्यासकांना येते. तैवानच्या स्वतंत्र अस्तित्वाचे आणि तेथील लोकशाही व्यवस्थेचे ते स्वत:ला पाठीराखे म्हणवतात. तैवानवर केव्हाही संकट येण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत एक आपात्काल नियंत्रण यंत्रणा (डिझॅस्टर मॅनेटमेंट एजन्सी) उभारण्याच्या प्रश्नावर तातडीने विचार व्हावा, असे ते म्हणतात. हिच्या कार्यकक्षा केवळ तैवानपुरत्या मर्यादित असू नयेत, असेही त्यांनी सुचविले आहे. रीतसर पदभार स्वीकारून कामाला सुरुवात करण्यापूर्वी आपण जपानमध्ये २७ ऑक्टोबर २०२४ ला नव्याने निवडणुका घेऊन जनादेश घेऊ, असे त्यांनी जाहीर केले आहे.

नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन (नाटो) ही जगातील राष्ट्रांमधली सैनिकी आघाडी असून ती ४ एप्रिल १९४९ ला नॉर्थ अटलांटिक करारानुसार अस्तित्वात आली आहे. यातील कलम ५ हे सैनिकी दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असून त्याच्यानुसार उत्तर अमेरिका आणि युरोपमधील कोणत्याही एका सदस्य देशावरील हल्ला हा सर्व देशांवरील हल्ला मानला जाईल. एसियन नाटो ही युरोपातील देशांच्या नाटो या संघटनेसारखी संघटना असावी अशी कल्पना जपानचे नवीन पंतप्रधान शिगेरू इशिबा यांची आहे. या संघटनेत भारत असणे आवश्यक आहे, असे त्यांचे आग्रही मत आहे. राष्ट्राराष्ट्रांत अशी सैनिकी आघाडी असल्याशिवाय आणि सामूहिक सुरक्षेची हमी देणारी व्यवस्था असल्याशिवाय युद्धाची शक्यता एखाद्या टांगत्या तलवारीसारखी छोट्या राष्ट्रांच्या शिरावर सतत लटकती राहील, असे त्यांचे मत आहे. हे विचार मांडताना त्यांच्यासमोर रशिया, चीन, उत्तर कोरिया, इराण अशी राष्ट्रे असणार, हे नक्की आहे. ज्या राष्ट्रांजवळ आण्विक हत्यारे आहेत, त्यांनी ती एकतर इतर राष्ट्रांमध्ये तैनात ठेवावीत किंवा या राष्ट्रांनी ती स्वत: तरी तयार करावीत, या विचारांचे ते आहेत.

भारताने अशा एखाद्या संघटनेत सामील होण्यास सपशेल नकार दिला आहे. एकतर भारत स्वत: अण्वस्त्रधारी असल्यामुळे स्वत:चे संरक्षण करण्याची क्षमता असलेला देश आहे. चीनशी लढाईची वेळ आलीच तर भारताला काही शस्त्रसामग्री आणि हेरगिरीशी संबंधित मदत लागू शकते. क्वाडमध्ये सामील होणे वेगळे आणि परस्पर संरक्षण करारात सामील होणे वेगळे. अतिशय घाई होत आहे, असे म्हणत अमेरिकेनेही हा प्रस्ताव स्वीकारलेला नाही.


९४२२८०४४३०

## वेध

**नितीन शिरसाट**

# परतीच्या पावसाने शेती पिकाचे नुकसान

निसर्ग हा मानव जातीचा महत्त्वाचा अविभाज्य भाग आहे. निसर्गाच्या सान्निध्यात अनेक जण सुखावतात. पाऊसही सर्वांना हवाहवासा वाटतो. पण राज्यभरात परतीचा पाऊस शेती पिकाचे प्रचंड नुकसान करून शेतकऱ्यांना आर्थिक फटका देऊन आत्महत्येचे पाऊल उचलण्यास भाग पाडतो आहे. सध्या राज्यातील विविध भागांत चार ते पाच दिवसांपासून परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. शेतकऱ्याच्या शेतातील काढून ठेवलेल्या सोयाबीन, कापूस या नगदी पिकाचे नुकसान झाले आहे. दिवाळी सणाच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या तोंडातील घास या ढगफुटीसारख्या पावसाने हिरावून घेतला आहे. गेल्या आठ दिवसांपासून विदर्भ, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्रातील सर्वच तालुक्यांत विजांच्या प्रचंड कडकडाटांनी हजेरी लावली आहे. केळी, पपई फळ बागाचे नुकसान झाले आहे. पश्चिम वऱ्हाडातील अकोला, बुलढाणा, वाशीम जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावली. घराची पडझड होऊन टिनपत्रे उडाली, वीज पडून जनावरे मृत्युमुखी पडली. शेतातील कापूस, सोयाबीनच्या गंजी भिजल्या. त्यांना कोंब फुटली. शेती पिकांच्या नुकसानीचे सर्वेक्षण प्रशासनाने सुरू केले आहे. परंतु विधानसभा निवडणुकीच्या प्रशिक्षणाच्या ताण कर्मचाऱ्यावर येत आहे. सप्टेंबरच्या महिन्यात झालेल्या खरीप हंगामातील अतिवृष्टी नुकसानग्रस्तांचे पीक विमा कंपनीने २५ टक्के अग्रिम द्यावे असा निर्देश प्रशासनाच्या वतीने देण्यात आला.



शेतकऱ्याला शासकीय मदत व पीक विमा मदत पदरात पाडून घ्यावयाची असेल तर नुकसान झाल्यापासून ७२ तासांच्या आतमध्ये नुकसानीचा दावा तोही ऑनलाईन करायचा आहे. मात्र, पाऊस पडून किंवा पिकांचे नुकसान होऊन ७२ तास उलटले तरी शेतात पाणी साचलेले आहे किवा नुकसानीपर्यंत जाणे अवघड होऊन बसले आहे, तर शासनाकडून पीक पंचनामा झाल्याशिवाय मदत मिळणार नाही. शिवाय पावसामुळे निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणीही वेगळ्याच असतात. साचलेल्या पाण्यामुळे शेतामध्येच प्रवेश करता येत नाही, त्यामुळे नुकसानीचा दावा करावा कसा असा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत आहे.

शेतकऱ्यांनी क्रॉप इन्शुरन्स ॲपवरून झालेल्या नुकसानीची माहिती स्वत: भरायची आहे, याद्वारे माहिती भरल्यानंतर अधिकारी, कर्मचारी हे पंचनाम्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर येणार आहेत. आपापल्या भागात ज्या विमा कंपन्या काम करत आहेत त्यांच्या टोल फ्री क्रमांकाद्वारेही शेतकरी झालेल्या नुकसानीची माहिती सांगू शकतात. नुकसानीच्या दाव्याशिवाय शेतकऱ्याला मदत मिळू शकणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान झाल्याचे विमा कंपनीला कोणत्या ना कोणत्या माध्यमातून म्हणजे ऑनलाईन किंवा ऑफलाईन हे कळवावेच लागणार आहे. राज्य शासनाने खबरदारी घेत आचारसंहितेपूर्वी पीक विमा रक्कम, लाडकी बहीण योजना, महिला बचत गट लाभार्थींच्या बँकेच्या खात्यात रक्कम जमा केली असल्याने विरोधकाच्या पोटात दुखत आहे. परतीच्या अवकाळी पावसाने लहान-मोठ्या धरण प्रकल्पातील जलसाठा तुडुंब झाल्याने भविष्यातील पाणीटंचाई तसेच रब्बी पिकांना पोषक वातावरण निर्माण झाले आहे. खरिपातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत मिळावी यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सर्वच पक्षांनी व अपक्ष इच्छुक उमेदवारांनी पाहणी करून मतांचा जोगवा मागितला आहे. परंतु निसर्गाच्या सान्निध्यात वर्षानुवर्ष शेती करणारा शेतकरी, शेतमजूर अतिवृष्टीच्या नुकसान भरपाई मदतीपासून वंचित राहणार नाही ही काळजी घेऊन त्यांना आधार देण्याची आवश्यकता आहे, एवढे मात्र खरे

९८८१७१७८२८

## इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# मानव संबंध व्यवस्थापनातील शिखरपुरुष : रतन टाटा

मृत्यूनंतर झालेली गर्दी हीच माणसाने कमावलेली खरी संपत्ती असते. रतन टाटांच्या अमाप संपत्तीचे दर्शनच त्यांच्या मृत्यूनंतर जगाला झाले. व्यवसाय व्यवस्थापनात जपलेल्या मानवी मूल्यांचा परिपाक म्हणजेच, अन्त्यदर्शनासाठी झालेली टाटा समूहाच्या कर्मचाऱ्यांची गर्दी होती. व्यवसाय करताना माणुसकी जपण्याचा वस्तुपाठच रतन टाटांनी घालून दिला. माझा निर्णय स्पष्ट आहे, या देशाला वाहनपुरवठा करण्याचा करार या क्षणी रद्द झाला आहे. व्यवसाय-व्यवस्थापन क्षेत्रात मानवी पैलूंना व मूल्यांना मोठे स्थान आहे. शेकडो निरपराध्यांचे बळी घेत, संपूर्ण मुंबईवर जीवघेणे बॉम्बहल्ले करणाऱ्या पाकिस्तानला, यापुढे टाटा समूहाकडून वाहन पुरवठा होणार नाही. रतन टाटांनी टाटा उद्योग समूहाचे अध्यक्ष म्हणून वरील रोखठोक निर्णय घेण्यामागे पृष्ठभूमी होती, २६/११ रोजी मुंबईवर पाकिस्तानी दहशतवाद्यांकडून झालेल्या भीषण हल्ल्याची.

काही तज्ज्ञ सहकाऱ्यांकडून वरील कथित निर्यात व्यवसायाचा करार असा रद्द केल्यास व्यावसायिक नुकसान तर होईलच; शिवाय मोठी नुकसान भरपाई पण द्यावी लागेल, असे सांगण्यात आले. मात्र, रतन टाटा आपल्या निर्णयावर ठाम राहिले. त्यांच्या मते, माझ्या देशाचे नागरिक आणि देशहित यापेक्षा माझा व्यवसाय मोठा थोडाच आहे? मला माझ्या देशवासीयांचा बळी घेणाऱ्यांबरोबर व्यवसाय करायचा नाही हे निश्चित. २६/११ च्या दहशतवाद्यांच्या बॉम्बहल्ल्यांमध्ये मुंबईच्या टाटा उद्योग समूहांतर्गत असणाऱ्या ताज या पंचतारांकित हॉटेलवर दहशतवाद्यांनी धाबा बोलल्यावर, ताजच्या तीन कर्मचाऱ्यांनी आपल्या प्राणांची आहुती देत, मोठ्या संख्येत भारतीय व विदेशी पाहुण्यांचे प्राण वाचविले होते. ताजवरील त्या हल्ल्यानंतरच्या आपल्या पहिल्याच मुंबई भेटीत रतन टाटांनी आपले कर्तव्य बजावताना मृत्युमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. त्यानंतर त्यांनी मोठ्या प्रमाणात विध्वंस व जाळपोळ झालेल्या ताज हॉटेलला भेट दिली. पूर्ण हॉटेलची पाहणी केल्यावर त्यांनी सुरुवातीला नमूद केलेला निर्णय घोषित केला व त्यावर ते शेवटपर्यंत ठाम राहिले.

केवळ व्यवसायातच नव्हे, तर रतन टाटांनी सेवा व सामाजिक क्षेत्रातही अग्रणी स्वरूपाचे काम केले. रतन टाटांनी भारतीय विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी कॉर्नेल विद्यापीठाला एकूण २८ दशलक्ष डॉलर्सची देणगी दिली. यामुळे गरीब व मध्यमवर्गीय भारतीय विद्यार्थ्यांना मदत होत आहे. याशिवाय त्यांनी मुंबईच्या आयआयटीला २०१४ साली खास अद्ययावत तंत्रज्ञान व संशोधनाला चालना देण्यासाठी ९५ कोटींची देणगी दिली. दरवर्षी आपल्या कमाईतील विशिष्ट हिस्सा रतन टाटा धर्मादाय कामासाठी खर्च करीत असत.



रतन टाटांच्या वैयक्तिक कारकीर्दीच्या संदर्भात सांगायचे म्हणजे, त्यांनी १९६१ साली टाटा समूहाची प्रसिद्ध कंपनी टाटा स्टीलमधून आपल्या करीअरची सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात त्यांनी प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत व स्वत:च्या हाताने काम केले. भारतीय उद्योग विश्वातील असे हे एकमेवाद्वितीय उदाहरण म्हणावे लागेल.

त्यानंतर रतन टाटा १९७५ साली हॉर्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये व्यवसाय व्यवस्थापन शिकण्यासाठी गेले. त्यांनी कॉर्नेल युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमधून पदवीही मिळविली. आर्थिकदृष्ट्या व जागतिक अर्थव्यवस्थेच्या संदर्भात १९९१ सालचे हे वर्ष खूप महत्त्वाचे ठरते. त्याच दरम्यान देशात उदारीकरण व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारण्याच्या पृष्ठभूमीवर रतन टाटा हे टाटा उद्योग समूहाचे अध्यक्ष झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली या उद्योग समूहाने केवळ भारतातच नव्हे, तर जगभरात आपली छाप सोडली. १९९० ते २०१२ सालापर्यंत रतन टाटा टाटा समूहाचे अध्यक्ष होते. त्याशिवाय रतन टाटांनी एअर इंडियाचा आपल्या उद्योग साम्राज्यात समावेश करून आपला औद्योगिक वारसा जागतिक पातळीवर एका नव्या उंचीवर नेला. रतन टाटा यांच्या कार्यकाळातील परमोच्च टप्पा वा घटना म्हणून त्यांच्या निवृत्तीचा उल्लेख करावा लागेल. उच्चपदस्थांची नियुक्ती कुणाची पण गाजते; मात्र यासंदर्भात पण रतन टाटांचे व्यवस्थापन वैशिष्ट्य म्हणजे त्यांची सर्वाधिक गाजलेली निवृत्ती. २००२ साली वयाच्या ६५ व्या वर्षी रतन टाटा निवृत्त होणार होते. मात्र, कंपनीने त्यांना निवृत्त होण्याची परवानगी नाकारली. एवढेच नव्हे, तर त्यानंतरही तीन वर्षांनी कंपनी बोर्डाने रतन टाटांच्या निवृत्तीचे वय ६५ वर्षे राहील, असे जाहीर केले.

टाटा वाहन उद्योग क्षेत्रातील मोठ्या व महत्त्वाच्या निर्णयांवर रतन टाटांच्या मानवी मूल्यांच्या माहात्म्याची छाप स्पष्टपणे दिसून येते. टाटा सुमो या टाटा वाहन उद्योगाच्या अत्यंत उपयुक्त व लोकप्रिय वाहनाला त्यांनी जोडलेले सुमो हे नाव म्हणजे, त्यांचे अत्यंत जवळचे सहकारी व सुमो प्रकल्पावर आघाडीने काम करणाऱ्या सुमंत मुळगावकर यांच्या कामाची स्मृती चिरंतनपणे जपण्याचा तो प्रयत्न होता. त्याचप्रमाणे टाटा इंडिका म्हणजे संपूर्णपणे स्वदेशी बनावटीची गाडी. लाखभर रुपयात गरिबांचेही चारचाकीचे स्वप्न पूर्ण व्हावे, यासाठी वाहन उद्योगात नवे व्यावसायिक अर्थशास्त्र टाटांनीच रुजविले. कंपनी, कंपनीचे कामकाज व कर्मचारी या साऱ्यांमध्ये सामंजस्यच नव्हे, तर एकजिनसीपणा कसा असायला हवा, याचे उदाहरण रतन टाटा यांनी घालून दिले. त्यामुळे जमशेदपूरपासून पिंपरी-चिंचवडपर्यंतचे कर्मचारी, कुटुंबीय व त्यांच्या पिढ्या यांच्या जीवनात टाटा संकल्पना-संस्कृतीला एक महत्त्वाचे व मानाचे स्थान कायमचे लाभले. आम्ही टाटा उद्योगात काम केले. आम्ही टाटा कॉलनीत राहिलो, एवढेच नव्हे, तर माझे शिक्षण टाटांच्या शाळेत झाले, असे सांगणाऱ्या पिढ्या सदोदित दिसतात. अशा पद्धतीने टाटांनी जपणूक केलेला मानवीय पैलू त्यांच्याच नव्हे, तर भारतीय उद्योग क्षेत्रासाठीही मार्गदर्शक ठरला.

रतन टाटांचे पुण्यावर विशेष प्रेम कायमस्वरूपी राहिले. याच कारणाने २८ डिसेंबर २०१२ रोजी आपल्या कार्यालयीन कामातून निवृत्त होण्याच्या अखेरच्या दिवशी रतन टाटा यांनी पुणे येथील कर्मचाऱ्यांसह घालविला. याचे कारण म्हणजे टाटा मोटर्स एम्प्लॉईज युनियनचे तत्कालीन अध्यक्ष विष्णू नवले यांनी टाटांना त्यांचा वाढदिवस कंपनी कर्मचाऱ्यांसह साजरा करण्याची विनंती केली. टाटांनी ती मान्य केली. त्यामुळे तो दिवस सर्वांच्याच कायमस्वरूपी स्मरणात राहिला.

व्यवस्थापन-कामगार संघटना संबंध यासंदर्भात वस्तुनिष्ठ भूमिका घेत रतन टाटांनी मानवीय मूल्यांची जपणूक केली. त्यामुळेच त्यांच्या अन्त्यदर्शनासाठी पिंपरीतील सुमारे एक हजार कामगार रात्रपाळी संपवूनही आवर्जून गेले. रतन टाटांनी जपलेल्या मानवीय संबंधांचा परिचय त्याच्या मरणानंतर अशाप्रकारे आला..

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### विनाशकाले विपरीत बुद्धी

महाराष्ट्रात निवडणुका जाहीर झाल्या आणि प्रचाराचा धुराळा उडणे वाढले. भाजपा, शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांची महायुती आणि काँग्रेस, शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांची महाआघाडी असा मुख्य सामना आहे. वंचित, प्रहार, अपक्ष, नाराज पक्ष असेही मैदानात राहतीलच. महायुतीने लाडकी बहीण, अप्रेंटिसशिप, वृद्ध, महिला, शेतकरी, कामकरी यांच्याकरिता विविधोपयोगी योजना जाहीर करून अंमलातही आणल्या.

महाआघाडीने अर्थातच त्याचा विरोध केला, तांत्रिकदृष्ट्या ते योग्य असेल, पण महाआघाडीचे बिनीचे नेते उद्धव बा. ठाकरे यांनी एका सभेत घोषणा केली की, आमचे सरकार आले की, पहिल्याच बैठकीत जुन्या सरकारच्या सर्व योजना मोडीत काढू, म्हणजे बंद करू. आता या घोषणेमुळे लाडक्या बहिणी, शेतकरी, युवा, कामकरी, वृद्ध सगळेच प्रचंड नाराज न झाले तरच नवल! आधीच महाआघाडी सरकारचे अडीच वर्षांचे सरकार आठवले की, सर्वसामान्यांच्या अंगावर काटा उभा राहतो. कोरोनातील बेजबाबदारपणा, ते घोटाळे, त्या अटका, ते खून काय काय आठवते; त्यात आता ही घोषणा. म्हणतात ना 'विनाशकाले विपरीत बुद्धी.'

**रवी वाघमारे**/नागपूर

### पेन्शन : मानसिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून

पेन्शन या मुद्यावर बरीच चर्चा झाली. माझ्या मते हा मुद्दा आर्थिकदृष्टीने खूप महत्त्वाचा आहे. त्याचप्रमाणे मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. आजूबाजूचा युवक नोकरी असूनही आपल्याला आज सतत बेचैन दिसतो. जास्तीत जास्त पैसे मिळविण्यासाठी त्याची सतत धडपड चालू असते. त्यामुळे संसाराकडेही त्याचे नीट लक्ष राहत नाही. तो घरच्या लोकांनाही वेळ देऊ शकत नाही. शिवाय त्याची पत्नीही अर्थार्जनासाठी रात्रंदिवस झटत असते. संसार हा त्यामुळे नीटनेटका करणे त्यांना फारच कसरत वाटते. तुम्ही पैशाच्या मागे एवढे का? यासाठी मी बऱ्याच युवकांशी संपर्क साधला आहे. आजच्या संसारी जोडप्यांच्या मते... तुमच्या वेळी चांगलं होतं; तुम्ही नोकरी करायचे आणि त्यानंतर तुम्हाला पेन्शन असायची म्हणून तुम्ही शांत असायचे. आज आम्ही किती कमावून ठेवावं? किती महागाई येणार? याचा काहीच अंदाज नाही आणि मग मन अस्थिर होतं, पैसे जमवण्याकडे कल होतो. दोघांनाही कमवावं लागतं. आजच्या नोकऱ्या खूप वेळाच्या असतात. त्यामुळे संसाराकडे दुर्लक्ष होतं. मुलांना पाळणाघरात ठेवावं लागतं. त्यामुळे आई-बाबांचा मानसिक गुंतागुंतीचा प्रश्न दिवसेंदिवस वाढत चालला आहे. समाजात आज आपल्याला घरोघरी प्रत्येक संसारात हीच परिस्थिती दिसत आहे आणि असाच समाज तयार झाला तर? समाजात स्वास्थ्य कसे राहणार? समाजात अस्थिर वातावरण तयार होतं आहे निश्चितच! आणि समाज सुदृढ राहणार नाही. म्हणून पेन्शनचा विचार या दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. पेन्शन नागरिकांना मानसिक शांतता देते आणि शांत लोकच समाज सुदृढ करतील. आता तर अनेक योजनांद्वारे पैशाचा पाऊस पडणाऱ्या योजना अंमलात येत आहेत. असं असताना जीवनभर एखाद्या संस्थेसाठी, एखाद्या कंपनीसाठी जे लोक राब राब राबतात, त्यांना नोकरी संपल्यानंतर सेवानिवृत्तीचे वेतन का नको द्यायला? किंबहुना तो त्यांचा हक्कच आहे. हा हक्क सरकार हिरावून घेऊ शकत नाही;. नोकर वर्गासाठी आणि समाजासाठीपण!

**वर्षा विजय देशपांडे**/नागपूर

## वाचक पत्रे

### 'माय नागपूर' ॲपचा सुखद अनुभव

आजकाल मोबाईल आणि त्यात नवीन नवीन ॲप्स आणि त्याद्वारे केले जाणारे व्यवहार हे सगळे आपण रोजच करतो. अगदी विविध ॲप जसे युट्युब, बँकेचे ॲप, यूपीआय ॲप, महावितरणाचे मासिक पैसे भरायला ॲप ही अगदी सगळ्यांची दैनंदिन बाब झाली आहे. (सोशल मीडिया ॲपबद्दल माहिती न दिलेलीच बरी!) यात अजून एक भर पाडावीशी वाटते; ती म्हणजे नागपूर महानगरपालिकेची माय नागपूर ॲप. या ॲपमध्ये तक्रार विभाग हा स्वतंत्र विभाग आहे. कचरा व्यवस्थापन, रस्ता, विद्युत रोषणाई, दिवे, उद्यान विभाग, आरोग्य विभाग अशा बऱ्याच तक्रारींचे निवारण करण्याकरिता हे ॲप असून नागपूर महानगरपालिका तातडीने दखल घेऊन समस्येचे निवारण करते. मी माझ्या स्वत:च्या घरासमोरचा लाईट बंद असल्यामुळे तक्रार केली अन् ती दुसऱ्याच दिवशी सकाळी पूर्णपणे निवारण करण्यात आली. नागपुरातील प्रत्येक नागरिकांनी याचा जास्तीत जास्त उपयोग करावा आणि शहराला छान स्वच्छ सुंदर बनवायचा प्रयत्न करावा. ही ॲप युज करताना तुम्हाला तुमचा झोन नंबर आणि वॉर्ड नंबर हा माहिती असणे आवश्यक आहे. तो माहिती नसल्यास तुम्हाला एनएमसीच्या वेबसाईटवर मिळेल.

**परीक्षित फुले**/९५४५५५५०७५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बीड विधानसभेसाठी दुपारपर्यंत ५३ अर्जाची झाली विक्री

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑक्टोबर**

विधानसभा निवडणूकीच्या प्रक्रियेला आजपासून प्रत्यक्ष सुरूवात झाली आहे. कालपासून दि. २२ उमेदवारी अर्ज विक्रीस सुरूवात झाली असून दुपारपर्यंत बीड विधानसभा मतदार संघासाठी ५३ अर्जाची विक्री झाली होती. पहिल्याच दिवशी तब्बल ५३ अर्ज विक्री झाल्याने आज आणि परवा हा आकडा वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. आजपासून अर्जाची विक्री आणि दाखल करण्यास सुरूवात झाली असुन दि. २९ ऑक्टोबर पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. बीड तहसील प्रशासन अर्ज विक्रीसाठी सज्ज झाले असुन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत अर्ज विक्रीचे टेबल लावण्यात आले असुन आवश्यक त्या टेबलवर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# मिलिंद महाविद्यालयात मतदान जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ ऑक्टोबर**

परळी वै. येथील नाथ शिक्षण संस्था संचलित मिलिंद ज्युनियर कॉलेज येथे विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने 'परळी वैजनाथ विधानसभा मतदार संघ स्वीपकक्षा मार्फत' मतदार जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष मिलिंद ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य श्री.वैजनाथ शिंदे सर हे होते. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून मिलिंद ज्युनियर कॉलेजचे प्राध्यापक श्री.विलास रोडे, मिलिंद माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.कदरकर सर तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी,प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक श्री.फड सर यांनी केले. त्यांनी स्वीपकक्ष स्थापनेमागची भूमिका व कक्षाच्या माध्यमातून पार पाडल्या जाणाऱ्या जबाबदाऱ्या या विषयाची माहिती उपस्थितांस दिली.कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्राध्यापक श्री.विलास रोडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना लोकशाही शासन व्यवस्थेच्या यशस्वितेसाठी मतदानाची असणारी उपयुक्तता,सर्व मतदारांचे योगदान हे अनेक उदाहरणे देऊन समजावून सांगितले.या प्रसंगी विद्यार्थ्यांना मतदानास प्रोत्साहित करीत असताना अनेक उदाहरणांचा आधार घेत लोकशाही शासन व्यवस्थेत असणारे मतदानाचे महत्त्व प्रतिपादित केले.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी मिलिंद माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.कदरकर सर यांनी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना मतदान जनजागृतीसाठी आपण सर्व अधिकाधिक प्रयत्न करून आपल्या परीसरातील मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याच्या सुचना यावेळी केल्या. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून मतदानाची सामुहिक शपथ घेण्यात आली.कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापिका सौ.गित्ते मॅडम यांनी केले.

# परळीत विविध पक्ष आणि संघटनांच्या कार्यकर्त्यांचा धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेशाचा ओघ सुरूच

## एमआयएम युवक आघाडीचे शहराध्यक्ष उमर शेख यांसह असंख्य तरुणांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ ऑक्टोबर**

विधानसभा निवडणुकीच्या तारखा जसजशा जवळ येत आहेत तसतसे राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात विविध पक्ष आणि संघटनांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा धनंजय मुंडे यांचे नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेशाचा ओघ प्रचंड वाढला आहे.

एम आय एम पक्षाचे युवक आघाडीचे शहराध्यक्ष शेख उमर यांच्यासह एम आय एम चे युवक आघाडीचे पदाधिकारी व असंख्य कार्यकर्त्यांचा आज ज्येष्ठ नेते वाल्मीक अण्णा कराड यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश संपन्न झाला. यावेळी वाल्मिक अण्णा कराड यांनी पक्ष प्रवेश देऊन सर्वांचे स्वागत केले व शुभेच्छा दिल्या.



यावेळी एमआयएमचे उमर शेख यांच्यासह अरबाज पठाण, सोहेल शेख, आयान शेख, अजीम शेख, फिरोज शेख, तारीख शेख, ताहेर शेख, हमजा शेख, आमिर शेख, शहाबाज शेख, अरबाज शेख, लाला तांबोळी, जाहीर तांबोळी, सोहेल शेख, रोमन शेख, मुस्तकीन सय्यद, सय्यद निजाम, शेख समीर, मोजन शेख, शहाबाज पठाण, इरफान शेख, सोनू शेख, मुजफ्फर कुरेशी, पूर्वान पठाण, जाहीर पठाण, सोहेल खान, समीर पठाण, जुनेद शेख, रोहिन खान, मोजम कुरेशी, दनियल खान, सुलतान पठाण, आरिफ शेख, मेहबूब भाई, सलमान शेख, मुजाहिद शेख, तोफिक शेख, सय्यद साबीर, शेख इस्माईल, शेख फरीद, शेख अझहर, शेख अजीम, सय्यद राजू , अरबाज कुरेशी, अजहर कुरेशी, जुबेर खान, समीर खान, अर्षद शेख, नाझीरखान, आयान शेख, जावेद सय्यद, सय्यद गुलमाल, सय्यद सलमान, अरबाज खान, असलम कुरेशी, मोबीन खान, नसीर पठाण, शेख चांद, मुक्तार सय्यद, मुस्तकीन बागवान, दिशान बागवान यांसह असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

# परप्रांतीयांचा वाद; एकाचा चाकू भोसकून खून

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑक्टोबर**

शहरातील एमआयडीसी भागातील म्हाडा कॉलनीत दोघा परप्रांतीय इलमामध्ये वाद झाला. यातून एकाने चाकू भोकसून खून केल्याची धक्कादायक घटना मध्यरात्री समोर आला आहे. हे. ग्रामीण पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असल्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी बटेवाड यांनी माहिती दिल्याचे वृत्त आहे. समीरभाई भास्त (वय ५० वर्ष) रा. गांधीनगर गुजरात असे मयताचे नाव आहे. तर संशयित आरोपीचे नाव चंदनकुमार राऊत (वय-२५ वर्ष) रा. बिहार असे असल्याचे समजते. या दोघांमध्ये दारुच्या नशेत वाद झाला. हा वाद वाढत टोकाला जाऊन चंदनकुमार याने रागाच्या भरात चाकूने भोसकून समीरभाई भारुत यांचा खून केला. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी बीड ग्रामीण पोलिसांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक शिवाजी बटेवाड यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळाचा पंचनामा करून संशयित आरोपी चंदनकुमार राऊत यास घटनास्थळावरुन ताब्यात घेतले.

# दिवाळीनिमित्त शाळांना २८ ऑक्टोबर ते १६ नोव्हेंबर २० दिवसांच्या सुट्ट्या

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑक्टोबर**

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना यंदा दिवाळीत २० दिवसांच्या सुट्या मिळणार आहेत. याबाबतचे पत्र जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी सर्व तालुक्यांच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना दिले आहे.

पत्रात म्हटले आहे की, बीड जिल्हा परिषद अंतर्गत सर्व शाळांना दिवाळी सुट्या जाहीर केल्या जात आहेत. माध्यमिक शाळा संहितेनुसार शैक्षणिक वर्षातील सर्व प्रकारच्या एकूण सुट्या या ७६ दिवसांपेक्षा जास्त नसाव्यात असा नियम आहे. त्यानुसार, २८ ऑक्टोबर ते १६ नोव्हेंबर या कालावधीत शाळांना दिवाळी सुटी जाहीर केली जात आहेत. १८ नोव्हेंबरपासून सुरु होणार आहेत. दीर्घ सुट्यांच्या कालावधीत खासगी शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा व्यवस्थापनाच्या परवानगी शिवाय मुख्यालय सोडू नये व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मुख्याध्यापकांच्या परवानगी शिवाय मुख्यालय सोडू नये. शासन निर्णय, परिपत्रक, वरिष्ठ कार्यालयाचे पत्र या नुसार सुटीच्या कालवाधीत बदल केला जाऊ शकतो.

# लोकशाहीचे महत्त्व: माजलगाव विधानसभा मतदारसंघात इच्छुकांची गर्दी

## राजकीय इच्छुकांची वाढती संख्या दर्शवते सामूहिक परिवर्तनाची आकांक्षा व मतदानाचे महत्त्व

**किल्ले धारूर/सुर्यकांत जगताप**
**दि.२२ ऑक्टोबर**

सध्या माजलगाव विधानसभा मतदारसंघामध्ये विविध राजकीय इच्छुकांची उम्मेदवारी आणि तिकीट मागणीचा एक लाट पाहायला मिळत आहे. विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, समाजसेवक आणि स्थानिक नागरिक-सर्वजण आमदारकीच्या तिकिटासाठी काहीही करण्यास सज्ज आहेत. जे पक्षचे तिकीट मिळाले नाहीत, ते अपक्ष उमेदवारीसाठी तयार आहेत. हे स्पष्ट करते की लोकशाहीत प्रत्येक व्यक्तीस एक महत्वाचे स्थान आहे आणि देशाच्या भविष्याबद्दल विचार करण्याची मोकळीक आहे.

लोकशाहीची गरज

लोकशाही म्हणजे वैयक्तिक हक्कांचे आणि स्वतंत्रतेचे संरक्षण करणारा एक यंत्रणा. प्रत्येक नागरिकाला आपल्या गरजा आणि आकांक्षांचा आवाज उठवण्याचा हक्क आहे. हे लक्षात घेतल्यास, माजलगाव विधानसभा मतदारसंघातील इच्छुकांची गर्दी केवळ राजकीय इच्छाशक्तीचे दर्शक नाही, तर मोठ्या सामाजिक बदलाची तीही एक उपयोजना आहे.




समृद्धीच्या दिशेने कदम

माजलगाव, धारूर, वडवणी तालुक्यांमध्ये लोकशाहीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग एक महत्त्वाचा घटक आहे. एकत्र काम करण्यात स्थानिक समस्यांबद्दल जागरूकता वाढते आणि जनतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात मदत होते. यामुळे जनतेच्या आक्रोशाचा लोकप्रतिनिधींच्या निवडीत महत्त्वपूर्ण प्रभाव दिसून येतो.

कार्यकर्त्यांचे संकल्प

परंतु, इच्छुकांनी मतदारांशी संपर्क साधणे आणि शुचिता राखणे आवश्यक आहे. त्यांना मतदारसंघातील समस्यांची समज असली पाहिजे आणि लोकांशी संपर्क साधण्याची क्षमता देखील आवश्यक आहे. कोणत्याही सामाजिक सुधारणा चळवळीत सहभागी होणे किंवा स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांकडे लक्ष देणे म्हणजे लोकशाहीत यशस्वी होण्याची प्रक्रिया आहे.

या गर्दीत असलेल्या प्रत्येक चेहऱ्यात जिज्ञासा आणि आकांक्षा आहे. लोकशाही आम्हाला समान हक्क प्रदान करते, संवाद साधण्याची संधी देते, आणि परिवर्तनाच्या वाऱ्याचे आश्रय देते. माजलगाव विधानसभा मतदारसंघात इच्छुकांची गर्दी त्यांच्या स्वप्नांचा गजर करत आहे-एक महत्त्वाचा प्रश्न जो लोकशाही प्रत्येकाला विचारते: आपण कोण आहोत, आणि आपण काय करतो?

जर आपण या प्रक्रियेमध्ये एकत्र आलो, तर अधिक सक्षम आणि समृद्ध समाज निर्माण करू शकतो. लोकशाहीत समान हक्क आणि मतदानाचे महत्त्व हे सुवर्णसूत्र असावे-तेच या गर्दीचा मुख्य संदेश आहे.

# गिरजाबाई सौदागर यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२२ ऑक्टोबर**

तालुक्यातील आनंदगाव येथिल मूळ रहिवाशी धानोरा येथे निवासी असलेल्या जेष्ठ महिला गिरजाबाई भाऊराव सौदागर वय ७८ वर्ष यांचे वृद्धपकाळाने सोमवार रोजी सायंकाळी निधन झाले.



त्यांच्यावर धानोरा येथे आज मंगळवार रोजी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात मुलगा सून नातवंडे असा मोठा परिवार आहे.प्रेमळ स्वभावाच्या काकू म्हणून त्या सर्वपरिचित होत्या. त्या पत्रकार डॉ हनुमंत सौदागर यांच्या चुलती होत.

# शेतकरी मित्र राजेंद्र मस्केंचा शरद पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

## मस्के माझे जीवाभावाचे सहकारी..विश्वासात घेऊन काम करू-शरद पवार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑक्टोबर**

शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी परवा भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर आज थेट मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पक्षाचे संस्थापक अध्यक्ष मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांच्या साक्षीने जाहीर प्रवेश केला. यावेळी पक्षाचे निरीक्षक माननीय जीवनराव गोरे, पक्षाचे नेते दिलीपराव गोरे, प्रदेश युवती अध्यक्षा सक्षणा सलगर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी संबोधित करताना शरद पवार साहेब म्हणाले की, श्रीयुत राजेंद्र मस्के यांनी पंधरा वर्षांपूर्वी माझ्या बरोबर राष्ट्रवादीमध्ये काम केलेलं आहे. काही राजकीय परिस्थितीमुळे आमच्यामध्ये आणि त्यांच्यामध्ये अंतर पडले. कालचे राजकारण विसरून आता आमच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सहभागी झाले. त्यांचं निश्चितच स्वागत आहे. श्रीयुत मस्के जीवाभावाचे सहकारी असून विश्वासात घेऊनच निर्णय घेतले जातील. लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यातील जनतेने खासदार निवडून देऊ आमच्या वर विश्वास व्यक्त केला. निवडणूक लढवण्याची इच्छा अनेकांची असते. लवकरच सर्वांना विश्वासात घेऊन उमेदवार निवडला जाईल. आता कालचे राजकारण विसरून सर्वांनी विधानसभा निवडणुकीत एकत्रितपणे काम करण्याची आणि विजय कमावण्याची नैतिक जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वीकारावी.

जिल्ह्यात जाती-जातीमध्ये निर्माण झालले अंतर कमी करून जातीय सलोखा निर्माण करण्याची अपेक्षा माननीय शरद पवार साहेब यांनी व्यक्त केली. राजेंद्र म्हस्के यांच्या बरोबर त्यांचे सहकारी सर्वश्री सोमनाथराव माने माजी सभापती प.स., विठ्ठल नाना शिंदे संचालक खरेदी विक्री संघ, बद्रीनाथ जटाळ संचालक मजूर फेडरेशन, कैलास काटे वृद्ध कलावंत जिल्हा समिती सदस्य, माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानराव बापू गवते, शरद बडगे भाजपा विस्तारक, शफिकभाई काझी अल्पसंख्यांक आघाडी, महेश सावंत अभियंता सेल जिल्हाध्यक्ष, लालासाहेब पन्हाळे कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष, शफिक पेंटर अल्पसंख्यांक सेल कामगार मोर्चा, मदन काका मस्के, मोसिन पठाण, सरपंच महादेव नैराळे, सरपंच किशोर शेळके, सरपंच बाळासाहेब वायभट, उपसरपंच पांडुरंग कानडे, सरपंच सुधाकर चव्हाण, कैकाडी समाज जिल्हाध्यक्ष तुकाराम गायकवाड, भाजपा तालुका सचिव गणेश वाणी, उपसरपंच विकास वायकर, माजी सरपंच वसंत गुंदेकर, चेअरमन बाळसाहेब वायभट, अभियंता सेलचे शंकर तुपे, माजी सरपंच अश्विन शेळके, उपसरपंच भागवत खाकरे, माजी सरपंच दादासाहेब खिल्लारे, उपसरपंच शरद घोलप, माजी सरपंच बालाचार्य घोलप, प्रल्हाद धनगुडे, माजी सरपंच रावसाहेब तात्या म्हस्के, उपसरपंच बाबू कदम, माजी सरपंच सचिन आगाम, से.सो. चेअरमन कल्याण पवार, उपसरपंच दामोदर थोरात, अविनाश नवले,अनिल शेळके, सुरेश माने, सचिन मस्के, महादेव बहीरवाळ, रवींद्र कळसाने, अजय ढाकणे, शरद बहिरवाळ, हनुमंत मस्के, युवराज मस्के, संभाजी मस्के, राकेश बिराजदार, बाळासाहेब गात मारुती तिपाले, रसाळ सर, बाबा गव्हाणे, विनय पवार, सुग्रीव डोके, आबा येळवे शिवाजी तुपे, अंकुश खटाने, सुभाष पाटील, महेश दहे, विनोद मुके, हनुमान बहिरवाळ, धनराज गवळी, राहुल गायकवाड, गणेश शेंडगे, लक्ष्मण भिंगले. अन्वर शेख, शेख मतिन, शामराव तुपे, शेलार मामा, उध्दव जाधव, एकनाथ महाकुडे, मच्छिंद्र तकिक, गंगाधर ढोले, राजू पाडंव, अंकुश दादाखीळ, विष्णू दादाखीळ, शिवशंकर गाडे, अरुण घोडके, लक्ष्मण हाटवटे,शिवाजी ढगे, कल्याण काष्टे,उपसरपंच दिलीप दाभाडे, दत्ता दाभाडे, अशोक वाणी, विलास आहेर, प्रल्हाद आहेर, राहुल गायकवाड, गणेश बालगुडे, सचिन शिंदे, शरद वाघमारे, रमेश कवचट, शिंदे प्रशांत यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मुंबई येथे जाहीर प्रवेश केला आहे.



# धारूर तालुक्यात शेतकऱ्यांचा उपोषणाचा इशारा: सोयाबीन खरेदी केंद्राची मागणी

## अधिकाऱ्यांच्या लेखी आश्वासनानंतर राजेंद्र मुरलीधर तिडके यांनी उपोषण मागे घेतले; शेतकऱ्यांना योग्य उत्पादन मूल्य मिळवण्याची आवश्यकता.

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२२ ऑक्टोबर**

धारूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी इशारा दिला आहे की, सरकारने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू न केल्यास आणि त्यांच्या इतर मागण्या न मानल्यास ते २१ ऑक्टोबर २०२४ पासून बेमुदत उपोषण सुरू करतील. यासंबंधीत, राजेंद्र मुरलीधर तिडके यांनी उपोषण सुरू केले होते, परंतु अधिकाऱ्यांकडून लेखी आश्वासनानंतर ते मागे घेण्यात आले.



धारूर तालुक्यात चांगल्या पावसामुळे सोयाबीनच्या पिकाचे उत्पादन वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तथापि, महाराष्ट्र सरकारने खरेदी किंमत ४८९२ निश्चित केले आहे, तर व्यापारी वर्ग प्रति क्विंटल ४२०० वर खरेदी करत आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे योग्य मूल्य मिळवणे अत्यंत आवश्यक आहे.

जर कृषी उत्पन्न बाजार समिती राज्य सरकाराच्या निर्देशानुसार सोयाबीन खरेदी लागू करण्यात अपयशी ठरली, तर धारूर तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसाना सामोरे जावे लागेल. या कारणास्तव, शेतकऱ्यांनी २२ ऑगस्ट २०२४ रोजी सचिवांना शासकीय खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी करणारे निवेदन दिले. या निवेदनात, शेतकऱ्यांनी २१ ऑक्टोबर २०२४ पासून उपोषण सुरू करणार असल्याचे सूचित केले, परंतु प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई केली गेली नाही.

या प्रशासनिक दुर्लक्षामुळे २१ ऑक्टोबर २०२४ रोजी धारूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या समोर उपोषण सुरू झाले. उपोषणाची सुरुवात केल्यानंतर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव सोळंके आणि तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे व्यवस्थापक चोले यांनी शेतकऱ्यांना लेखी आश्वासन दिले.कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव सोळंके यांनी उपोषणकर्त्यांना पुढील लेखी आश्वासन दिले:

- जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीवर कापसाचे दर वेळेत दर्शवले जातील.
- वजन काटा शेतकऱ्यांसमोर दररोज तपासला जाईल, आणि त्यानंतरच कापसाची खरेदी सुरू केली जाईल.

याशिवाय, अधिकाऱ्यांनी कापूस व्यापाऱ्यांना शेतकऱ्यांना सरकारच्या ठरवलेल्या हमीभावानुसार ग्रेडनुसार भाव देणे बंधनकारक असेल, याबाबतही आश्वासन दिले.

तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे व्यवस्थापक चोले यांनी देखील उपोषणकर्त्यांना आश्वासन दिले की:

- २ नोव्हेंबर २०२४ पासून शासकीय खरेदी सुरू होईल, आणि याची सर्व जबाबदारी तालुका सहकारी खरेदी विक्री संघावर राहील.

राजेंद्र मुरलीधर तिडके यांनी उपोषण सुरू केले होते, परंतु २२ ऑक्टोबर २०२४ रोजी अधिकाऱ्यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर ते मागे घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत महायुतीच्या नेत्यांची वज्रमुठ

## हिंगोली, सेनगाव येथील भाजपच्या बुथ अध्यक्ष, प्रमुखांचा मेळावा




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ आक्टोबर**

हिंगोली विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांना निवडून आणण्यासाठी महायुतीचे स्थानिक नेत्यांसह भाजपचे नेत्यांनी वज्रमुठ बांधली असून यावेळी नेत्यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना आ. तान्हाजीराव मुटकुळे यांना निवडून आणण्यासाठी आ- वाहन केले.

शहरातील अथर्व लॉन येथे मंगळवार दि २२ आक्टोबर रोजी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्या नेत्यांसह भाजपचे हिंगोली व सेनगाव येथे भारतीय जनता पक्षाच्या बूथ अध्यक्ष व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत हिंगोली विधानसभेचे महायुतीचे भाजपचे अधिकृत उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांना भरघोस मतांनी निवडून आणण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन पक्षाच्या सर्व नेत्यांनी केले.

यावेळी बोलतांना माजी खा ॲड शिवाजीराव माने म्हणा- ले की, हिंगोली विधानसभा मतदारसंघात मागील दहा वर्षात कोट्यावधी रूपयांचा निधी आणून विकास कामे केली आहेत. रस्ते, सिंचन, पाणी, वीज तसेच मुलभूत सुविधा देण्यासाठी प्रयत्न केले. केंद्रात एनडीए सरकार असल्यामुळे राज्यात विविध उद्योगधंदे आले आहेत. त्यामुळे बेरोजगारांच्या हाताला कामे मिळाली आहेत. तसेच अनेक कल्याणकारी योजनांचा लाभ होत आहे. केंद्रात आणि राज्यात एका विचाराची सत्ता आल्यास राज्याचा तसेच मतदारसंघाचा विकास होतो.

यावेळी आ. मुटकुळे बोलतांना म्हणाले की, भाजपने मला तिसऱ्यांदा उमेदवारी देत विश्वास टाकला आहे. पदाधिकारी आणि कार्यकर्ते तसेच जनतेचा माझ्यावर विश्वास असल्यामुळे मतदारसंघाचा विकास मला करता आला. यापुढेही मतदारसंघाच्या विकासासाठी मी सतत काम करीत राहील. विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता आपण केलेल्या विकास कामांचा तसेच केंद्र आणि राज्य सरकारने केलेल्या विकास कामांचा तसेच कल्याणकारी योजनांची माहीती घरोघरी पोहचवून येत्या निवडणुकीत प्रत्येक बुथ मजबुत करण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कामाला लागावे.

याप्रसंगी महायुतीच्या नेत्यांनी एकदिलाने आ. तान्ह- ाजीराव मुटकुळे यांना विजयी करण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना आवाहन केले. यावेळी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बी डी बांगर, माजी खासदार शिवाजीराव माने, माजी आमदार रामरावजी वडकुते, लोकसभा प्रभारी रामदास पाटील सुमठाणकर, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, शिवाजीराव मुटकुळे, दुर्गादास साकळे उपस्थित होते. यावेळी भाजपचे सर्व इच्छुक एकाच मंचावर उपस्थित राहून एकदिलाने कामाला लागल्याचे पाहून सर्व कार्यकर्त्यांत उत्साह संचारल्याचे दिसत होते. यावेळी मोठ्या संख्येने भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसेच पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# हिंगोली विधानसभा मतदारसंघात ६६ नामनिर्देशन पत्राची विक्री

## निवडणुक निर्णय अधिकारी घुटुकडे यांची माहीती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ आक्टोबर**

हिंगोली विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी दि २२ आक्टोबरपासून नामनिर्देशन पत्र विक्री तसेच नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास सुरूवात झाली आहे. आज एकही नामनिर्देशन पत्र दाखल झाले नाही परंतु ६६ नामनिर्देशन पत्राची विक्री झाल्याची माहीती उपविभागीय अधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी माहीती देतांना घुटुकडे यांनी सांगितले की, नामनिर्देशन पत्रात अपक्ष ३५, बहुजन समाज पार्टी ६, भारतीय जनता पार्टी ४, अभिनव भारत जन- सेवा पक्ष २, वंचीत बहुजन आघाडी २, नॅशनल काँग्रेस पार्टी १, आम आदमी पार्टी १, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष २, एमआयएम पक्ष ३, आझाद समाज पार्टी २, राष्ट्रीय समाज पक्ष २, शिवसेना उध्दव ठाकरे गट ६ अशा ६६ नामनिर्देशन पत्राची विक्री झाली आहे. तीन एसएसटी पथके कनेरगाव नाका, येलदरी, वाढोणा याठिकाणी कार्यान्वित करण्यात आले आहेत. नागरिकांनी निवडणुक कामाव्यतिरिक्त कार्यालयनी कामाकरिता दुपारी ४ नंतर यावे. निवडणुक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण दि २७ आक्टोबर रोजी आदर्श महाविद्यालयात आयोजित करण्यात आले आहे.

सक्षम ॲप द्वारे पात्र दिव्यांग मतदारांना मतदान करण्यासंबंधी हवी असलेली मदतीबाबत ॲपद्वारे मागणी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उमेवारांसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा अंतीम दिनांक २९ आक्टोबर असून ३० आक्टोबरला अर्जाची छाननी केली जाणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतीम तारीख ४ नोव्हेंबर २०२४ आहे. दि २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर शनिवारी मतमोजणी होणार आहे. दि २५ नोव्हेंबर २०२४ रोजी निवडणुक प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

१९ आक्टोबर २०२४ रोजीच्या अद्ययावत मतदारांची संख्या ३ लाख ३२ हजार ४३७ एवढी असून त्यामध्ये पुरूष मतदार १ लाख ७३ हजार १६२ तर स्त्री मतदार १ लाख ५९ हजार २७३ आहेत. इतर मतदार दोन आहेत. यामध्ये नवमतदारांची संख्या ७ हजार १४० तर दिव्यांग मतदार १६०१ आहेत. ८५ वर्षे वरील मतदार ५ हजार ४६० आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी ३४३ मतदान केंद्रे आहेत. सिटी क्लब येथे महिला करीता मतदान केंद्र, कृषी उत्पन्न बाजार समिती येथे दिव्यांगकरिता मतदान केंद्र तसेच आदर्श कॉलेज येथे आदर्श मतदान केंद्राची उभारणी करण्यात येणार असल्याची माहीती निवडणुक निर्णय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी दिली. कळमनुरीत ४४ तर वसमतमध्ये ४३ नामनिर्देशन पत्राची विक्री झाली आहे.

# दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांना सक्षम ॲप ठरणार मदतगार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ आक्टोबर**

आगामी विधानसभा निवडणुकीत दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांना सुलभ रीतीने मतदान करण्यास मदत व्हावी, यासाठी निवडणूक आयोगाने सक्षम नावाचे मोबाईल प तयार केले आहे. या पवर दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करुन दिले आहे. या सुविधेचा सर्व पीडब्ल्यूडी (पर्सनल व्हीथ डिसबेलिटी) मतदारांनी आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करून मतदारांसाठी दिलेल्या सोयी सुविधा प्राप्त करून घ्याव्यात, असे आ- वाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

पीडब्ल्यूडी (पर्सनल व्हीथ डिसबेलिटी) मतदारांकरिता आयोगाने तयार केलेले सक्षम पवर विविध सोयी सुविधा देण्यात येत आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी सर्वप्रथम प्रत्येक पीडब्ल्यूडी मतदाराने सक्षम प आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करून घ्यावा. निवडणूक संदर्भात सेवा घेण्याकरीता दिव्यांग व वयोवृद्ध मतदारांना त्यांचे नाव पत्ता आणि मोबाईल क्रमांक इत्यादी माहिती पमध्ये भरावी. दिव्यांग वयोवृद्ध मतदारांना या सक्षम पद्वारे मतदानासाठी लागणाऱ्या सहायतेची मागणी नोंदविता येईल. त्याद्वारे मतदार संघातील दिव्यांग वयोवृद्ध मतदानाचे मतदार संघ व स्थाननिश्चिती यंत्रणेला करणे शक्य होईल. पद्वारे नोंदणी झाल्यानंतर पीडब्ल्यूडी मतदारांना ने-आण करण्यासाठी वाहतूक व्यवस्था, व्हील चेअर, सहाय्यक मदतन- ीस इत्यादी प्रकारची सुविधा या पच्या माध्यमातून पीडब्ल्यूडी मतदार मिळवू शकतो.

सक्षम पवर अनेक वैशिष्ट्ये प्रदान करते. दृष्टीहीन असलेल्या पीडब्ल्यूडीसाठी आवाज प्रदान करते. श्रवण अक्षम असलेल्या पीडब्ल्यूडीसाठी प-टेक्स्ट-टु-स्पीच प्रदान करते. पमध्ये मोठे फॉन्ट आणि उच्च कॉन्ट्रास्ट रंग असल्यामुळे पीडब्ल्यूडीसाठी वापरणे सोपे होते. पमध्ये मतदान केंद्राबद्दल माहिती उपलब्ध असून ज्याम ध्ये मतदान केंद्राचे स्थान, मतदान केंद्र उपलब्ध प्रवेश योग्यता वैशिष्ट्ये आणि मतदान अधिकाऱ्यांच्या संपर्क तपशिलांचा समावेश आहे. पीडब्ल्यूडीला निवडणूक प्रक्रियेत सहभागी होतांना येणाऱ्या कोणत्याही सम स्याबद्दल पवर तक्रारी नोंदविता येते.

पीडब्ल्यूडीसाठी निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी सक्षम प हे महत्वाचे असून वापरण्यास सोपा आहे. ज्यामुळे पीडब्ल्यूडीला मतदान करण्यासाठी नोंदणी करणे, त्यांचे मतदान केंद्र शोधणे आणि त्यांचे मत देणे सोपे होते. जिल्ह्यातील सर्व पीडब्ल्यूडी मतदारांनी सक्षम प डाऊनलोड करून विविध सुविधेचा लाभ घ्यावा.



हिंगोली- ९४- हिंगोली विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशन प्रक्रिया सुरू होणार आहे. यानिमित्त उपविभागीय कार्यालयाबाहेर तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून यावेळी पोलिस येणाऱ्या- जाणाऱ्या अभ्यागतांची तपासणी करूनच त्यांना कार्यालयात प्रवेश दिल्या जात आहे. छाया- विजय गुंडेकर

## संक्षिप्त वृत्त

### अंडरग्राऊंड ब्रिजचे काम युध्दपातळीवर



हिंगोली-शहरातील खटकाळी बायपास रोडवरील रेल्वे उड्डाणपूलाच्या खाली सुरू असलेल्या अंडरग्राऊंड ब्रिजचे काम युध्दपातळीवर सुरू असून या ब्रिजमुळे पोलिस वसाहत, जीनमाता नगर, गंगा नगर, हनुमान नगर आदी भागांना याचा लाभ होणार आहे. लवकरात लवकर हे काम पूर्ण व्हावे अशी मागणी या भागातील रहीवाशी करीत आहेत.

### दिपावलीनिमित्त हिंगोलीत बाजारपेठ सजली



हिंगोली- दिवाळी सणाला अवघे काही दिवस शिल्लक असल्यामुळे हिंगोली बाजारपेठेत विविध साहित्य विक्रीसाठी आले आ- हेत. दिवाळीसाठी लागणारे मातीचे दिवे, आकाशदिवे, विविध प्रकारच्या इलेक्ट्रीक लाईंटींग, प्रसादाचे साहित्य, मातीच्या खे- ळणी, महालक्ष्मीच्या मूर्ती आदी साहित्य विक्रीसाठी आले आहेत. तसेच कपडा बाजार, किराणा दुकाने, मिठाईची दुकाने आदींनीही ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विविध प्रकारची सुट दिल्याचे बोर्ड दुकानाबाहेर लावले आहेत. परंतु अजूनही पाहीजे तसा प्रतिसाद दुकानदारांना मिळत नसल्याचे दिसत आहे.



हिंगोली- एनटीसी भागात नुकतेच बांधलेल्या सिमेंट रस्ते फोडून त्याठिकाणी गट्टु टाकण्याचे काम सुरू आहे. छाया- सुनील पाठक

# श्री विघ्नहर्ता चिंतामणी संस्थानतर्फे पोलीस कल्याण निधीसाठी ५० हजार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ आक्टोबर**

शहरातील गड्डेपीर गल्ली भागामधील श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिर संस्थांनच्या वतीने पो- लीस कल्याण निधी करता ५० हजाराचा धनादेश मंगळवारी जिल्हा पोलीस अध- ीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांना देण्यात आला.

हिंगोली शहरातील श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती बाप्पाची आख्यायिका सर्व दूर प्रसिद्ध आहे. या गणपतीच्या दर्शनाकरिता गणेशोत्सवात लाखो भाविकांनी उपस्थिती लावून गणपतीचे दर्शन घेतात. भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाच्यावतीने सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवला जा- तो. पोलिसांसोबत स्वयंसेवक ही उपस्थित असतात. मागील काही वर्षांपासून श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती संस्थांनच्या वतीने पोलीस कल्याण निधी करता प्रत्येकी वर्षी ५० हज- ाराचा निधी दिला जातो. त्या निमित्ताने २२ ऑक्टोबर रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्याकडे ५० हज- ाराचा धनादेश मंदिर संस्थांच्या वतीने पदाधिकारी दिलीप बांगर सतीश लोहिया मनोज दावणगिरे यांनी दिला यावेळी अप्पर पो- लीस अधीक्षक अर्चना पाटील, पोलीस निरीक्षक विकास पाटील यांची उपस्थिती होती.

# नवीन पंचायत समितीच्या प्रवेशद्वाराजवळील काम थांबवा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ आक्टोबर**

नव्याने बांधकाम सुरू असलेल्या पंचायत समिती कार्यालयाच्या ईमारती चे मुख्य प्रवेश द्वार हे सिद्धार्थ (मिलिंद) कॉलनीतील तक्षशिला बुद्ध विहाराच्या व विपश्यनाकेद्राच्या प्रवेशद्वाराच्या समोरासमोर तेथील पंचरंगी धम्म ध्वज व ध्वज स्तंभ उपटून त्या ठिकाणी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. हे काम थांबवावे नसता नेहमीसाठी कायदा व संस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशा आशयाचे निवेदन प्रशास- नाला देण्यात आले आहे.

सिद्धार्थ सहकारी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेअंतर्गतच्या सिद्धार्थ (मिलिंद)कॉलनी भागा- तील नागरिकांनी जिल्हाधिकारी,जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद बांधकाम विभाग व अन्य विभागांना प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले. त्यामध्ये नमूद करण्यात आले आहे की, नवीन पंचायत समिती कार्यालय इमारतीचे बांधकाम करणारे कंत्राटदार व संबंधित यंत्रणेचे कर्मचारी हे जातीयद्वेष भाव- नेतून पूर्वी झालेल्या चर्चेनुसार ठरल्याप्रमाणे आता ज्या ठिकाणी पंचायत समिती इमारतीचे मुख्य प्रवेशद्वार आहे त्या ठिकाणचे प्रवेशद्वार रद्द करून ऐन तक्षशिलाबुद्ध विहाराच्या व विपश्यना केंद्राच्या प्रवेशद्वारावर व सध्या असलेल्या पंचरंगी ध्वजस्तंभ व ध्वज उपटून टाकून त्या ठिकाणी करून ऐननिवडणुकीच्या काळात जातीयद्वेष भाव- नेतून आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याच्या तयारीत आहेत. काम थांबविण्याची मागणी निवेदनाद्वारे रहिवाशांनी प्रशासन व संबंधित यंत्रणेकडे केली आहे. यावेळी शिष्टमंडळात संस्थेचा अध्यक्ष लक्ष्मीबाई इंगोले, सचिव प्रयागबाई हानवते यांच्यासह आशाबाई खिल्लारे, गिताबाई दिपके, भाऊराव पंडित, अनुप हनवते, प्रकाश इंगोले आदींची उपस्थिती होती.

# प्रसार माध्यम कक्षातील अधिकारी, कर्मचारी व पत्रकारांना पेडन्यूजबाबत प्रशिक्षण



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २२ आक्टोबर**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला आहे. या निवडणूक कार्यक्रमानुसार हिंग- ोली जिल्ह्यातील ९२-वसमत विधानसभा मतदार संघासाठी तहसील कार्यालय, वसमत जि. हिंग- ोली येथे स्थापन करण्यात आलेल्या प्रसार माध्यम कक्षातील अधिकारी, कर्मचारी तसेच पत्रकारांना आज प्रशिक्षणामध्ये पेड न्यूज व इतर अनुषंगिक बाबींची माहिती देण्यात आली.

यावेळी माध्यम व प्रमाणन समितीची रचना, पेड न्यूज, मुद्रीत, इलेक्ट्रॉनिक माध्यम, सोशल मिडीया यासाठी जाहिरातीचे प्रमाणन करणे तसेच त्याअनुषंगाने पाठवावयाचे अहवाल व त्यांच्या नमुन्याची माहिती, सोशल मिडिया व मुद्रीत माध्यमातील पेड न्यूज शोधणे व त्यावर कार्यवाही करणे आदी बाबींची माहिती या प्रशिक्षणामध्ये दिली. तसेच पेड न्यूजबाबत वसमत येथील पत्रकारांनाही यावेळी या प्रशिक्षणात जिल्हा माध्यम व प्रमाणन सनियंत्रण समितीचे पथक प्रमुख तथा जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते आणि जिल्हास्तरीय प्रशिक्षण समितीचे डॉ. दीपक साबळे यांनी सादरीकरणाद्वारे दिली.

यावेळी वसमत विधानसभा प्रसार माध्यम कक्षाच्या नोडल तथा नायब तहसीलदार अनिता कोळगने, प्रशिक्षण व्यवस्थापन समितीचे अमोल निळेकर, एम. बी. सोनटक्के, पि. एस. पाईकराव, सी. एन. धुमाळ, तसेच वसमत येथील सर्व पत्रकार बांधव उपस्थित होते.

# हयातनगर आरोग्य केंद्रातील ईसीजी मशीनच चोरट्यांनी पळविली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ आक्टोबर**

वसमत तालुक्यातील हयात नगर प्राथमिक आरोग्य केंद्रातील ईसीजी मशीनच चोरट्यांनी पळविल्याची घटना उघडकीला आली असून याप्रकरणी हट्टा पोलिस ठाण्यात दि २१ आक्टोबर रोजी गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकारामुळे आरोग्य यंत्रणाही चक्रावून गेली आहे.

वसमत तालुक्यातील हयात नगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात रूग्णांना तातडीच्या आणि अत्याधुनिक सुविधा मिळाव्यात यासाठी आरोग्य यंत्रणेकडून प्रयत्न केले जात असून त्यासाठी यंत्र सामुग्री उपलब्ध करून दिली जात आहे. त्यानुसार हयातनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी नवीन अत्याधुनिक ईसीजी मशीन मे महिन्यात देण्यात आली होती.

दरम्यान, आरोग्य केंद्र जुने ईसीजी मशीन असल्यामुळे नवीन मशीन आरोग्य केंद्रातील प्रयोगशाळेत ठेवण्यात आले होते. त्यानंतर जून्या मशीनवरच ऱ्हदय रूग्णांचे ईसीजी काढले जाऊ लागले होते. त्यानंतर आरोग्य विषयक कार्यक्रमसाठी नवीन ईसीजी मशीन सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार आरोग्य केंद्र प्रशासनाने नवीन ईसीजी मशीन काढण्यासाठी लॅबमध्ये पाहणी केली असता त्याठिकाणी मशीनच आढळून आली नाही. आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सर्वत्र शोधाशोध केली मात्र मशीन सापडलेच नाही. त्यानंतर डॉ व्यंकटेश जिंतूरकर यांनी हट्टा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक संग्राम जाधव, जमादार बालाजी जाधव यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. आरोग्य केंद्रातील साहित्यच पळविल्याची घटना घडल्यामुळे पोलिसांसह आरोग्य यंत्रणा चक्रावून गेली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मतदार यंदा आ.नारायण कुचेंना डावलणार तर मा.आ.संतोष सांबरेंना देणार पुन्हा संधी!





**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राज्यात विधानसभा निवडणुकांचे पडघम वाजायला सुरुवात झाली भाजपकडुण आ.नारायण कुचे यांना पक्षाने उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र मागील पंचवार्षिक विधानसभेच्या निवडणुकीत बदनापुरकरांनी एका नगरसेवकाला बदनापुर विधानसभा मतदासघांच आमदार केल. आ नारायण कुचे यांच्याकडुन मतदारांना आ कुचें कडुण विकासाची मोठी आ-पेक्षा होती मात्र आ कुचेंनी बदनापूर सोडुण औरंगाबाद येथुनच कामकाजाची धुरा सांभाळली असून परिनामी बदनापुर चा विकासकामे खोळंबली होती. सत्तेत आल्यावर आ कुचेंकडुण बदनापुर विधानसभा मतदासंघात कोणत्याही महत्वाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ सामान्य जणांसाठी दिला नसल्याने यावेळी बदनापूरकर यावेळी बदनापुरकर संधी उपलब्ध करून देणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

उबाठा गट (शिवसेनेचे) माजी आमदार संतोष सांबरे हे सत्तेत नसले तरी त्यांनी बदनापूरच्या जण-तेसोबत त्यांची नाळ जोडलेली आहे.

पडतीच्या काळातही संतोष सांबरे यांनी बदनापुरच्या जण-तेसाठी रस्त्यावर उतरून मोठे जण अंदोलने उभारले आहे . विषेष म्हणजे ज्ञानराधा मल्टीस्टेट या बॅंकेत सर्व सामान्य कष्ठकरी माणसांचे कष्टांचे पैसे ठेवी स्वरूपात ठेवलेल्या ठेवी अडकल्या होत्या त्यावेळी जणसेवक म्हणून मा . आ संतोष सांबरे प्रथम धावून आले असल्याने उन्हाळ्यात मतदार संघात मोठ्या प्रमाणात पिण्याची पाण्याची गैर सोय झाली होती त्यावेळी शाषण दरबारी मोठा आवाज सांबरे यांनी उठावला सर्वसामान्य माणसाच्या मनात आपुलकी निर्माण केली असून सध्या बदणापूर मतदार संघात माजी आमदार संतोष सांबरे यांचा प्रभाव वाढला आसल्याने बदनापुरकर सांबरे यांना यावेळी आमदारकीची संधी देतील अशी चर्चा मतदार संघात सुरू आहे.

## समृद्धीतुन सतिष घाटगेंची मतदारसंघात वाढली क्रेझ!

# आ.राजेश टोपेंनी २५ वर्षापासुन जनतेला घातल्या विकासाच्या नावावर नुसत्याच टोप्या?





**तभा वृत्तसेवा**
**जालना-घनसावंगी/प्रतिनिधी**

एस .पि . राष्ट्रवादी गटाचे आमदार राजेश टोपे यांचे नाव राज्याच्या राजकारणात खुप मोठे व आद-राणे घेतले जात आहे . आ . टोपे यांना राजकीय क्षेत्रात काम करत आसताना मंत्रीपदे भोगले आहेत .मात्र घनसावंगी विधानसभा मतदारसंघात विकासकामे करण्यास अपयशी ठरले आहे . अशी चर्चा निवडणुकांच्या तोंडावर घनसावंगी तालुक्यातील जणतेतुन ऐकायला मिळत आहे आ. टोपे यांनी केवळ शेतकऱ्यांच्या उसाचे राजकारणात भांडवल करून आणि क्षैक्षणिक संस्थांचे राजकीय फायदा घेत घनसावंगी तालुक्यातील जणतेला विकासापासून कोसो दूर ठेवून आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी पुढील राजकारण केले . असून मतदार संघातील अनेक खेडेगावांना दळणवळण करण्यासाठी पक्का रस्ता नाही तर यंदाच्या उन्हाळ्यात तब्बल एकवीस गावांना दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती पाण्यासाठी कोसोदूर भटकंती करावी लागत होती यावेळी सतीष घाटगे यांचा समृद्धी साखर कारखाना घनसावंगी मतदार संघाच्या मदतीला धावून आला . घाटगेंच्या माध्यमातुन अनेक गावांना पिण्याच्या पाण्याचे टॅंकर मोफत उपलब्ध करून दिली . मतदार संघातील कित्येक गावात सतिष घाटगे यांनी स्वतः च्या पैश्यातुन गांवांचे पक्के रस्ते करुण घनसावंगी तालुक्यातील विकास कामांत भर घातली यामुळे यंदा घनसावंगी तालुक्यातील जणतेत सतीष घाटगे यांची क्रेझ निर्माण झाली आहे . त्यामुळे विधानसभेतही त्यांना जागा मिळवून देण्यासाठी घनसावंगीकर का माला लागल्याचे चित्र पहायला मिळत आहे .

## संक्षिप्त

### कारला आरोग्य केंद्रात २०५ ग्रामस्थांची नेत्र तपासणी!



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जनसाथी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी आणि लॉयन्स क्लब ऑफ जालना मर्चंट सिटी च्या संयुक्त विद्यमाने सेवा सप्ताहा अंतर्गत कारला ता. जालना येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मंगळवारी ( ता. २२ ) मोफत नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले.

डॉ. प्रियंका पवार यांच्या हस्ते शिबीराचे उद्दघाटन झाले. यावेळी प्रकाश देशमुख, अरुण बकाल , ज्ञानेश्वर सरोदे ,गणेश सांगोळे ,रमेश शिंदे , जनसाथी अर्बन चे सुनील देशमुख , तुकाराम काटे ,दीपक वाघमारे ,भागवत देशमुख ,जगदीश अग्रवाल आदींची उपस्थिती होती. दिवसभर चाललेल्या शिबीरात २०५ महिला व ग्रामस्थांची तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान ११ मोतीयाबिंदूचे रुग्ण आढळून आले असून त्यांच्यावर लॉयन्सच्या नेत्रालयात जनसाथी अर्बनच्या सहकार्याने शस्त्रक्रिया करण्यात येईल असे सुनील देशमुख यांनी सांगितले.

### टोकवाडी येथील दलित कार्यकर्त्यांचा आ.लोणीकरांच्या नेतृत्वात भाजपामध्ये प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

आपण केलेल्या सर्वसामान्य जनतेच्या सेवेमुळेच दलित पीडित शोषित या सह सामान्य नागरिकांचा आपल्यावर विश्वास असल्याने, भारतीय जनता पार्टीमध्ये रोज असंख्य कार्यकर्ते दाखल होत असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले. ते सातोना तालुका परतुर येथे टोकवाडी तालुका मंठा येथील कार्यकर्त्यांच्या प्रवेश सोहळ्याप्रसंगी बोलत होते. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांसाठी असलेल्या विविध योजनांचा व्यक्तिगत लाभ त्या त्या व्यक्तीपर्यंत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण नियमितपणे प्रयत्नांची पराकाष्टा करीत आलेलो आहोत त्यामुळेच तळागाळातील सर्वसामान्य नागरिकांचा आपल्यावर विश्वास असून या विश्वासाच्या बळावरच सर्वसामान्य जनता आपल्या पाठीशी खंबीर असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले. यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत आनंद जाधव जनार्धन वायाळ सोनाजी जाधव कृष्णा जाधव भगवान लहाने यांच्या पुढाकाराने अनेक युवकांनी व जेष्ठ नागरिकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला प्रवेशामध्ये टोकवाडी गावचे उपसरपंच मल्हारी प्रधान विकास राठोड विनोद आढे नारायण आढे अंबादास राठोड बाळू राठोड राजेश राठोड संतोष राठोड सुरेश राठोड जानकीराम राठोड गुलाब आढे मनापासून भाऊराव राठोड संजय राठोड भारत राठोड संपत चव्हाण ज्ञानेश्वर राठोड राहुल कांबळे अशोक चव्हाण बाबासाहेब प्रधान महादेव प्रधान विशाल प्रधान भीमराव चव्हाण तुळशीराम प्रधान विकास कांबळे राजेश जाधव अशा असंख्य कार्यकर्त्यांनी यावेळी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला यावेळी विलास भाऊ आकात बबनराव आकात निवृत्ती राव लाटे सरपंच विकासराव खरात शिव-ाजीराव घनवट परमेश्वरराव आकात बाबासाहेब आकात रोहन आकात सय्यद भाई गुलाबराव आकात शाहूराव आकात जफर पठाण भगवानराव आकात यासीन भाई यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# विधानसभा मतदार संघासाठी २ उमेदवारांचे ३ अर्ज दाखल आजपर्यंत १५८ उमेदवारांना ४०३ नामनिर्देशन अर्जाचे वितरण

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४**

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील ९९- परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२- बदनापूर (अ.जा.) आणि १०३-भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी आज २ उमेदवारांनी ३ नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. आजपर्यंत एकुण २ उमेदवारांचे ३ नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

९९-परतूर, १०२- बदनापूर आणि १०३-भोकरदन या तीन विधानसभा मतदार संघासाठी आज कोणीही अर्ज दाखल केला नाही. मंगळवार दि. २२ ऑक्टोबर, २०२४ रोजी १००-घनसावंगी मतदारसंघासाठी चोथे शिवाजीराव कुंडलिकराव (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे) यांनी दोन तर १०१-जालना विधानसभा मतदारसंघासाठी मिलिंद बालु बोर्डे (अपक्ष) यांनी एक नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहे. याप्रमाणे चोथे शिवाजीराव कुंडलिकराव (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे) आणि मिलिंद बालू बोर्डे (अपक्ष) याप्रमाणे आज दोन नामनिर्देशन अर्ज दाखल केले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

आजच एकूण १५८ इच्छुक उमेदव-ारांना ४०३ नामनिर्देशन अर्जाचे वितरण करण्यात आले आहे. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेतले. उमेदवारांना मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ३ यावेळेत आपले नामनिर्देशन पत्र सादर करता येणार आहे. बुधवार, दि. ३० ऑक्टोबर, २०२४ रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ४ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येणार आहे. तर बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान होणार आहे. या निवडणूकीचा निकाल शनिवार दि. २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी जाहिर केला जाणार आहे.

## संगमपुर येथे भुमिपुत्राचां ग्रामपंचायत कार्यालय व ग्रामस्थांच्या वतिने सत्कार




**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**

जाफ्राबाद तालुक्यांतील मौजे घानखेडा (संगमपुर) येथील किरण नारायण डुकरे, (आर्मी) तर महाराष्ट्र पोलीस दिपक गणदास ईराळे, तर पशुसर्वधन सेवक म्हणुन पवण दिलीप ईराळे,यांच्या शासकिय व अशासकिय सेवेत निवड झाल्या बद्दल या तिन्ही भुमी पुत्राचा घानखेडा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या जवळ चौकात सत्कार व पुष्प गुच्छ, शाल, श्रीफळ , देऊन सत्कार व गौरवण्यांत सरपंच परशुराम पा.ढाले, संजय जी लहाने सर, झगरे गुरुजी, उपसरपंच सुभाष मोरे, नितिन सुधाकर रगड,( फौजी) याच्या हस्ते या तिन भुमि पुत्राचा सत्कार सभारंभ आयोजित करण्यांत आला या वेळी सर्व आजी,ग्रा.प.सदस्य, माजी ग्रा.प.सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व उपस्थितांचे अभार सरपंच परशुराम पा. ढाले, यांनी मानले.

# लिंबखेडा शिवारातील जुगार अड्ड्यावर छापा

## ५ लाख २२ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त, ११ जुगाऱ्याविरुध्द स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक जालना यांनी दिलेल्या सुचना व आदेशाप्रमाणे दिनांक . २०/१०/२०२४ रोजी पोनि पंकज जाधव स्थानिक गुन्हे शाखा जालना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस ठाणे मंठा हद्यीत अवैध धंद्याचे माहिति घेत असतांना, मौले लिंबखेडा शिवारात जुगार अड्डा चालु असल्याची माहिती गोपनीय बातमीदार यांचे मार्फतीने मिळाली होती. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने, मौजे लिंबखेडा शिवारात दि.२०/१०/२०२४ रोजी १५:३० वाजता छापा कारवाई करुन इसम नामे १) रामदास भास्कर गायकवाड, वय ४० वर्ष, रा.येवती ता.लोणार जि. बुलडाणा २) प्रल्हाद शामराव नागरे, वय ४० वर्ष, रा.येवती ता. लोणार जि. बुलडाणा ३) समाधान ज्ञानदेव आघाव, वय ४३ वर्ष, रा. अंभोरा शेळके, ता. मंठा जि. जालना ४) राजु रामदास कायंदे, वय ३५ वर्ष, रा. येवती ता. लोणार जि. बुलडाणा ५) सोपान साहेबराव गायकवाड, वय ४० वर्ष, रा. टाकळखोपा ता. मंठा जि. जालना व अड्डा चालविणारे ०६) गजानन राठोड रा. लिंबखेडा ता. मंठा जि. जालना ७) संतोष म्हस्के रा. लिंबखेडा ता. मंठा जि. जालना यांचेसह घटनास्थळावरुन वाहनासह पळुन गेलेले ०४ जुगारी असे एकुण (११) इसमांविरुध्द पोलीस ठाणे मंठा येथे महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असुन, कार्यवाहीमध्ये रोख रक्कम, मोबाईल, व मोटारसायकल असा एकुण ५,२२,०००/- रुपये किंमतीचा मुद्येमाल जपत केला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल व अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार, रुस्तुम जैवाळ, कैलास खार्डे, इरशाद पटेल, किशोर पुंगळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी केली आहे.

## प्रभारी पक्ष निरीक्षक महेश शर्मा यांच्या उपस्थितीत

# परतूर कॉंग्रेसच्या वतीने आधुनिक बुथ कमिटी प्रशिक्षण शिबिर संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर-मंठा विधानसभा मतदार संघातील कॉंग्रेस पक्षाचे बुध कमिटी प्रशिक्षण ३५९ बुध करिता आयोजित करण्यात आले होते. बुध कमिटीच्या प्रशिक्षणाला तालुक्यातील बुथ कमिटी पदाधिकारी मोठया संख्येने सहभागी झाले होते .या वेळी बुथ कमिटीला संबोधित करताना प्रभारी पक्ष निरीक्षक महेश शर्मा म्हणाले की तुम्ही सुरेश जेथलिया यांना आमदार बनवा मंत्रीपद देण्याची जिम्मेदारी मी घेतो.उमेदवारीबद्धल कुठलाही संभ्रम मनामध्ये बाळगू नका. परतूर विधानसभेची जागा ही कॉंग्रेस पक्षच लढावणार असून तनमण धनाने कामाला लागा असे सुचक वक्तव्य प्रभारी पक्ष निरीक्षक महेश शर्मा यांणी बुथ प्रशिक्षण शिबीरात मार्गदर्शन करताना त्यांनी प्रतिपादन केले.

या वेळी प्रशिक्षणाला मा.आमदार सुरेश जेथलिया, सहप्रभारी बालासाहेब देशमुख,नितीनजी जेथलिया,विशाल भाऊ तौर, ता.अध्यक्ष बाबाजी गाडगे ,बाळासाहेब अंभिरे,इंद्रजीत घनवट,लक्ष्मण शिंदे,मंजुळदास सोळंके,बाबुराव हिवाळे ,रहेमु कुरेशी,सादेक खतीब,राजु भुजबळ, अण्णासाहेब खंदारे,माऊली वायाळ, सुरेश जिजा सवणे, पांडू आबा कुरधने, मंजुळदास,सोळंके, सिद्धू भैया सोळंके, पंजाब देशमुख, प्रफुल्लआबा शिंदे, हाजी रहमत खान, सादिक जागीरदार, अजीम कुरेशी, अविनाश शहाणे, प्रवीण डुकरे, अनिल आंबेकर, सिद्धू अंभोरे,अमीर पठाण,हाशमी साहब,महिला असंघटित कामगार कॉंग्रेस ता.अ.सारीका ताई सरवणकर, अलका कोळे महिला कॉंग्रेस तालुकाध्यक्ष परतुर,आदी पदाधिकारी कार्यकर्ता मोठया संख्येने उपस्थित होते.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाची वाटचाल विकसित राष्ट्राकडे -आ.बबनराव लोणीकर

## आमदार बबनराव लोणीकरांच्या विशेष प्रयत्नातुन ३५५ कोटींच्या रस्त्याच्या कामास मंजुरी



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

परतूर तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी रु), वाटूर, आष्टी, श्रीष्टी व सातोना येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (२४ कोटी ८८ लाख) असा एकूण ८४ कोटी ८८ लक्ष रु निधी मंजूर तर मंठा तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालय (६० कोटी), दहिफळ खंदारे व ढोकसाळ या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी (१२ कोटी ४४ लक्ष), तर खोराड सावंगी व उस्वद प्राथमिक आरोग्य उपकेंद्रसाठी (१ कोटी १० लाख) असे एकूण ७३ कोटी ५४ लक्ष रु मंजूर, मतदारसंघात २ उपजिल्हा रुग्णालयासाठी १२० कोटी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ३७ कोटी ३२ लाख तर २ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी १ कोटी १० लाख रुपये असा एकूण १५७ कोटी ४२ लक्ष रुपयांचा निधी मंजूर आपण केंद्र सरकार च्या आरोग्य मंत्रालयाकडून मंजूर करून आणला असल्याची माहिती महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. सातोना व श्रीष्टी जिल्हा परिषद सर्कल मधील भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बैठका आज सातोना व दैठणा या ठिकाणी संपन्न झाल्या याप्रसंगी उपस्थित भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत असताना ते बोलत होते.

या प्रसंगी सातोना येथे भाजपा महाराष्ट्र राज्य प्रदेश सचिव राहुलभय्या लोणीकर, परतूर विधानसभा प्रभारी निरीक्षक माजी आमदार संजय दिंडे, विलासभाऊ आकात, परमेश्वरनाना आकात, निवृत्त-ीआप्पा लाटे, संपतराव टकले, नगरसेवक शिवराज जाधव, रोहनभैया आकात, बंडु मानवतकर, रेंगे पाटील, सरपंच विकास खरात, बबनदादा आकात, पैलवान विलास आकात, बाबासाहेब आकात, अक्षयभैया आकात, आबा आकात, अशोकराव खंदारे, शिवाजीदादा घनवट, परमेश्वर लाटे, सुधाकर बेरगुडे, भगवानराव आकात, विठ्ठलराव बिडवे, नारायण बिडवे, गोपाळराव बिडवे, नामदेवतात्या आकात, सय्यद अली, अशोक दांगट. सर्जेराव मानवतकर. ओमजी साठे, प्रकाश चव्हाण, नामदेव मानवतकर. रामप्रसाद गाढवे, नदीम सरपंच. गोपाल गोरे. राहुल काळे, विलास मोठे, युसुफ भाई यांची उपस्थिती होती.

# नांदेड जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के;हदगाव तालुक्यात केंद्रबिंदू

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २२ ऑक्टोबर**

नांदेड शहर व तसेच अर्धापूर, हदगाव या तालुक्यातून आज दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ०६:५२ मिनिटांनी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले असल्याची माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास प्राप्त झाली. अधिकृतरित्या दिलेल्या वृत्तानुसार या भूकंपची तीव्रता रिष्टर स्केल वर ३.८ अशी नोंदविण्यात आलेली आहे.




भूकंपाचा केंद्रबिंदू नांदेड शहरापासून २९ किमी दूर उत्तरपूर्व दिशेला हदगाव तालुक्यातील सावरगाव या गावात असून या धक्क्यामुळे कुठलीही जीवित व वित्त हानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास प्राप्त झाली असल्याचे जिल्हा आपत्कालीन कार्य केंद्राचे अधिकारी किशोर कुऱ्हे यांनी दिली आहे.

## माफियांनी वापरली अक्कल, रेती वाहतुकीसाठी लढवली नवीन शक्कल

# छोटा हत्तीच्या माध्यमातून पुन्हा रेती वाहतूक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २२ ऑक्टोबर**

विशेष पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप व जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या कडक भूमिकेमुळे शहरासह जिल्ह्यातील अवैध धंद्यावर अंकुश बसला आहे. दिवस- रात्र होणारी रेती वाहतूक बंद झाली होती. परंतु रेती वाहतुकीसाठी माफियांनी अक्कल लावत चांगलीच शक्कल लढवली असून मोठ्या वाहनांचा वापर न करता छोटा हत्ती म्हणून परिचीत असलेल्या मालवाहू वाहनाच्या माध्यमातून रेतीची वाहतूक सुरू करण्यात आली आहे.

मागील काही महिन्यापूर्वी शहर, परिसरातून मोठ्या प्रमाणात टिप्पर, टेम्पो, हायवाच्या माध्यमातून अवैध रेती वाहतूक होत होती. परंतु विशेष पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यात फ्लश आऊट मोहीम सुरू केल्यानंतर अनेक अवैध धंद्यावर लगाम लागला आहे. शहर, परिसरातील विष्णुपुरी, असर्जन हस्सापूर,



भनगी आदी परिसरातून होणाऱ्या रेती उपसा, वाहतुकीवर लगाम लागला होता. परंतु रेतीमाफीयांनी आता रेती वाहतुकीसाठी चांगली शक्कल लढवली असून रेती वाहतुकीसाठी मोठ्या वाहनांचा वापर न करता छोटा हत्ती या मालवाहू वाहनाच्या माध्यमातून रेतीची वाहतूक सुरू केली आहे. या वाहनातून बिनधास्तपणे रेती वाहतूक करण्यात येत आहे. या वाहनातून करण्यात येत असलेल्या वाहतुकीवर संशय येत नसल्याने रेतीमाफीयांनी हा फंडा सुरू केला आहे. केवळ पहाटेच नाही तर दिवसभर या वाहनातून रेती वाहतूक सुरू आहे. सुरुवातीला एक- दोन वाहनातून होणारी वाहतूक आता वाढत चालली असून छोटा हत्ती या वाहनाबरोबरच बोलेरो वाहनाचा देखील वापर करण्यात येत आहे.

### शासकीय कामाच्या नावाखाली मुरुमाची वाहतूक

शहरासह पफिसरात रस्ते, पुलांची कामे सुरू असल्यामुळे या कामांच्या नावाखाली मुरुम माफिया देखील सक्रिय झाले आहेत. शासकीय कामासाठी वाहतूक होत असल्याचे सांगत बिनधास्तपणे मुरूम वाहतूक देखील करण्यात येत आहे. तर या वाहतुकीची शहानिशा, चौकशी करण्याकडे पोलीस, तहसील तसेच प्रादेशिक परिवहनच्या अधिकाऱ्यांकडे वेळ नसल्याचे दिसून येत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या अध्यक्षपदी करंदीकर तर कार्याध्यक्षपदी डोईफोड

**भोकर**-डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष सखाराम वाघमारे यांच्या निवासस्थानी रविवारी बैठक घेण्यात आली होती.या बैठकित डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या नविन नियूक्तुया घोषीत करण्यात आल्या असून भोकर तालूका कार्याध्यक्ष पदी पत्रकार अरुण डोईफोडे यांची तर तालूका अध्यक्ष पदी गंगाधर करंदीकर यांची सर्वानूमते निवड करण्यात आली.यावेळी जिल्हा प्रसिध्दी प्रमूख धसाडे सर संपादक उत्तम बाबळे के. वाय.देवकांबळे जिल्हाध्यक्ष सखाराम वाघमारे सचिव चंद्रकांत बाबळे मराठवाडा प्रमूख कवडीकर संजय बोथीकर चिदगीरी येथील सरपंच पवार आदिंची प्रमूख उपस्थिती होती.डॉ.अण्णाभाऊ क्रांती सेनेची कार्यकारीणी पूढिल प्रमाणे निवडण्यात आली सचिव विठ्ठल डाकोरे उपाध्यक्ष अविनाश कराळे कोषाध्यक्ष राम बोयेवार तालूका यूवा अध्यक्ष मारोती कराळे सोशल मिडिया तालूका अध्यक्ष प्रल्हाद सूंकळेकर अंबादास बोयेवार आदिंची निवड करण्यात आली असून नवनियूक्त पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले व पूढिल कार्यास त्यांना शूभेच्छा देण्यात आल्या.



### महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षपदी शिवराम लुटे

**नवीन नांदेड**-महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि.: १८ऑक्टोबर २०२४ रोजी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे संपन्न झाली. या सभेमध्ये महासंघाच्या नवीन कार्यकारणीची निवड करण्यात आली असून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष शिवराम लुटे यांची महासंघाचे उपाध्यक्ष म्हणून एक मताने निवड करण्यात आली आहे. सदरील निवड ही पुढील पाच वर्षासाठी आहे.



महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि १८ ऑक्टोबर, २०२४ रोजी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे संपन्न झाली. या निवडीबद्दल नांदेड दक्षिणचे आमदार मा. मोहनराव हंबर्डे व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अधिकारी फोरमचे अध्यक्ष डॉ.अशोक कदम सर, कृती समितीचे सचिव हुशारसिंग साबळे सर, पतसंस्थेचे अध्यक्ष गोविंद हंबर्डे, सचिव संजयसिंह ठाकूर, मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष तथा पतसंस्थेचे उपाध्यक्ष, कृती समितीचे अध्यक्ष काळबा हानवते, विद्यापीठ फंड कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष तुकाराम हंबर्डे, शिवलिंग पाटील, अब्दुल बशीर, प्रमोद देशमुख, संदीप येडके, गणपत लुटे,विवेक भोसले यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी यांनी शिवराम लुटे यांचे अभिनंदन करून भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### नरेंद्र चौदंते यांचे निधन

**मुदखेड**-शहरातील अशोका नगर येथील रहिवाशी का. नरेंद्र नारायण चौदंते यांचे दि.२२ ऑक्टोंबर रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर भीमनगर येथील बौद्ध समशान भूमी येथे दि.२२ ऑक्टोंबर रोजी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुले, दोन बहिणी, भाचे, असा त्यांचा मोठा परिवार आहे. का. नरेंद्र नारायण चौदंते हे भोकर डिव्हिजन आष्टी ३३ के वी उपकेंद्र येथे वरिष्ठ यंत्र चालक म्हणून कार्यरत होते.



### धर्माबाद येथील २१ वर्षीय तरुण बेपत्ता

**धर्माबाद**-शहरातील फुलेनगर येथील रहिवासी असणारा २१ वर्षीय शेख रेहान शेख पाशा हा दि. २९ एप्रिल २०२४ रोजी घरून रात्री ३ च्या सुमारास कार घेऊन हैदराबादचे भाडे आहे जाऊन येतो म्हणून घरून निघून गेला होता. या प्रकरणी धर्माबाद पोलिसात नोंद करण्यात आली आहे.

# संघटना मजबूत करून सर्वसामान्य लोकांसाठी लढणारा शिवसैनिक बनवा : आ.हेमंत पाटील

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २२ ऑक्टोबर**

शिवसेना जिल्हा युवा संवाद मेळाव्याच्या अनुषंगाने शिवसेना पदाधिकारी व युवकांना संवाद साधताना मुदखेड येथे आयोजित कार्यक्रमात शिवसेना नेते हेमंत पाटील यांनी पक्ष संघटना मजबूत करुन सर्वसामान्य लोकांसाठी लढणारा शिवसैनिक बनवा पक्ष तुमची दखल घेईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विविध जनकल्याणासाठी विविध योजना काढून सर्वसामान्य नागरिकांना केंद्रस्थानी मानुन चोवीस तास मधुन विस ते बाविस तास काम करणारे एकमेव मुख्यमंत्री म्हणून ओळखले जातात. मी मुदखेड भागात अनेक निवडणूका काळात शिवसेना पक्ष वाढीसाठी कामकरताना केलेला संघर्ष, यश अपयश अनेक घटनांच्या चर्चा करुन युवा संवाद मेळाव्याच्या अनुषंगाने प्रत्येक गावात हक्काचे



जिवा भावाचे दहा युवक तयार करा आणि संघटना मजबूत करा मी सदैव तुमच्या सोबत आहे असे विचार त्यांनी मांडले. राज्यपाल नियुक्त विधानपरिषदेत नियुक्त आमदार झाल्यापासून प्रथम मुदखेड शहरात आगमन असल्याने फटाके फोडून व ढोलताशांच्या गजरात जंगी सत्कार मुदखेड ता शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिकांच्या वतीने करण्यात आला. यावेळी शेकडो कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख सचिन कीसवे, युवा सेना जिल्हाप्रमुख विकास देशमुख, शिवसेना महिला जिल्हाप्रमुख पूर्वहीती ताई, अर्धापूर तालुकाप्रमुख संतोष कपाटे, हे उपस्थित होते. प्रास्ताविक संजय पाटील कुरे शिवसेना मुदखेड ता प्रमुख यांनी केले व कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सचिन माने शहर प्रमुख यांनी केले. पंजाब पाटील मुगल, उत्तम पाटील खवास, सुरेश शेट्टी, मार्केट क सचालक रामेश्वर लोकरे, बाळू मुंगल, साहेबराव शिंदे, नारायण पांचाळ, काशिनाथ शिंदे, चंद्रकांत उबाळे, विनायक गाडे, ओमकार माचनवाड, अश्विन राठोड, प्रकाश पाटील कोरे, दीपक कोकुले, शंकर गाडे,संतोष ढगे, महादेव गायकवाड, बंडू पाटील कुरे, बंडू पाटील गाडे, अमोल भांगे, गजानन शिंदे, यासह आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिरड येथील पाणी फिल्टर बंद

**तभा वृत्तसेवा**
**निवघा बा.,दि. २२ ऑक्टोबर**

हदगाव तालुक्यातील शिरड ग्रामपंचायतचा रामभरोसे कारभार सुरू असून आठ महिन्यापासून पंधराव्या वेतन आयोगामध्ये ग्रामपंचायत मिळाले फिल्टर बंद अवस्थेत आहे. पाणी फिल्टरसाठी परिसरातील नागरिकांनी २०० रुपये भरून कार्ड काढले त्या कार्डाचे करायचे काय असा सवाल नागरिक करत आहेत. ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांना विचारना केली असता एक दोन दिवसात फिल्टर चालू होईल असे सांगुन टाळाटाळ करण्यात येत आहे.

# मतदान प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार: सीईओ मीनल करनवाल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ ऑक्टोबर**

मतदान हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असून तो वापरणे ही आपल्या लोकशाही प्रणालीतील एक अत्यावश्यक प्रक्रिया आहे, असे प्रतिपादन नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मतदान जनजागृती कक्षाच्या प्रमुख मीनल करनवाल यांनी केले.

जिल्हयातील नऊ विधानसभा सार्वत्रिक निवडणूक व नांदेड लोकसभा पोटनिवडणूक जनजागृतीसाठी आज जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात घेण्यात आलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले,



सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार आदींची उपस्थिती होती. पुढे त्या म्हणाल्या, येत्या २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीत आपली जबाबदारी ओळखून सर्वांनी मतदान करावे. प्रत्येक मत लोकशाहीला अधिक बळकट करण्यासाठी मोलाचे असल्याचेही त्या म्हणाल्या. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल कनवाल यांच्या हस्ते मतदान जनजागृती सेल्फीपॉइंटचे विमोचन करण्यात आले. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी संतोष शेटकार, कक्ष अधिकारी राघवेंद्र मदनुरकर, अधीक्षक बळीराम एरपुलवार, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शुभम तेलेवार, जनसंपर्क अधिकारी मिलिंद व्यवहारे, प्रलोभ कुलकर्णी, सुनिल मुत्तेपवार, आशा घुले सारिका आचमारे, अनिल कांबळे, शिवराज पवार, हणमंत राठोड, संभाजी पोकले, मुकुंद अळसपुरे, माणिक भोसले, सुनिल दाचावार यांच्यासह जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचारी यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

### ३० हजार कर्मचाऱ्यांनी घेतली मतदानाची शपथ

नांदेड जिल्हयातील सर्व पंचायत समित्या व जिल्हा परिषदेच्या विविध कार्यालयातून आज मतदान शपथ घेवून मतदाचे महत्व विशद करण्यात आले. जिल्हयातील सुमारे ३० हजार अधिकारी व कर्मचा-यांनी आज मतदानाची शपथ घेतली. मतदान जनजागृतीसाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात उपस्थित असलेल्या विविध विभागांचे प्रमुख, अधिकारी व कर्मचा-यांनी आपआपल्या क्षेत्रात तसेच नाते परिवार तसेच गावस्तराव मतदानाची जनजागृती करण्याचा संकल्प केला.

## नायगांव येथील कृषी कार्यालयात दीपेश देवरे रुजू

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. २२ ऑक्टोबर**

नायगांव तालुका कृषी अधिकारी कार्यालयात मागील काही वर्षापासून प्रभारी कृषी अधिकारी काम पाहत होते मात्र आता प्रभारी राज संपले असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून नियुक्त झालेले कायमस्वरूपी कृषी अधिकारी म्हणून दीपेश देवरे हे नुकतेच रुजू झाले आहेत. नवनियुक्त कृषी अधिकारी दीपेश देवरे हे धुळे जिल्ह्यातील असून त्यांनी २०२२ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली होती त्यांना महाराष्ट्र शासनाने नांदेड जिल्ह्यातील नायगांव तालुका येथील कृषी अधिकारी कार्यालयामध्ये पूर्ण वेळ कृषी अधिकारी म्हणून पाठवले. येथे कार्यरत असलेले प्रभारी कृषी अधिकारी एस.डी.वरपडे यांची हिंगोली जिल्हा येथे बदली झाली आहे. नवनियुक्त कृषी अधिकारी यांनी पदभार घेतल्यामुळे या कार्यालयाचे मंडळ कृषी अधिकारी श्रीमती एस.डी. भुमरे, एस बी जगताप, कृषी पर्यवेक्षक बी.जी. चव्हाण, आर. जी. भुताळे, एस. ओ. यरावाड, जी.ए. पाटील यांसह शेतकरी बांधवांनी त्यांचे स्वागत केले.



# संत सेवालाल महाराजांच्या स्मारकाविरूद्धचे अपिल न्यायालयाने फेटाळले

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २२ ऑक्टोबर**

भोकर येथील संत सेवालाल महाराज स्मारक व सभागृहाच्या बांधकामाविरुद्धचे अपिल न्यायालयाने फेटाळून लावले असून, हे स्मारक नगरपरिषदेची मालकी असलेल्या भूखंडाच्या हद्दीत उभारले जात असल्याचा निर्वाळा दिला आहे. भोकर येथे गेल्या १७ ऑगस्ट रोजी नगर परिषदेच्या माध्यमातून नियोजित श्री संत सेवालाल महाराज स्मारक तथा सामाजिक सभागृहाचे पालकमंत्री ना. गिरीश महाजन यांच्या हस्ते व माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, राज्यपाल नियुक्त विधान परिषद सदस्य आ. बाबुसिंगजी महाराज, दीक्षागुरु संत प्रेमसिंगजी महाराज (संस्थान माहूर व कोतापल्ली) आदींच्या प्रमुख उपस्थितीत भूमिपूजन करण्यात आले होते. सुमारे ७ कोटी रुपये अंदाजित खर्च असलेल्या या स्मारकाचे बांधकामही सुरु झाले आहे. बंजारा समाजाची एक महत्वपूर्ण मागणी मार्गी लागत असताना शेख इनायात शेख फरीद आणि महम्मद अन्वर शेख फरीद यांनी सदरहू स्मारक आपल्या मालकीच्या जागेत होत असल्याचा दावा करून स्मारकाचे भूमिपूजन रोखण्याची मागणी करणारे अपिल भोकर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर अ. प्र. कराड यांच्या न्यायालयात दाखल केले होते. मात्र, हे अपिल त्यांनी फेटाळून लावले. त्याविरूद्ध अपिलकर्त्यांनी दिवाणी जिल्हा न्यायालयात दाद मागितली. परंतु, जिल्हा न्यायाधीश वाय.एम.एच. खरादी यांनी कनिष्ठ न्यायालयाचा निकाल कायम ठेवून वादींचे अपिल नामंजूर केली आहे. संत सेवालाल महाराजांच्या स्मारकाविरूद्धच्या या अपिलावरील सुनावणीत भोकर नगरपरिषदेने जागेचा मोजणी अहवाल व इतर दस्तावेजांच्या आधारे हे स्मारक आपल्या मालकीच्या हद्दीत असल्याचे सिद्ध केल्याने जिल्हा न्यायाधीशांनी हे अपिल फेटाळून लावले आहे. या प्रकरणामध्ये भोकर नगर परिषदेच्या वतीने ॲड. शिवाजी कदम यांनी बाजू मांडली.

### हा सत्याचा विजय: यु.एल. जाधव

श्री संत सेवालाल महाराजांच्या स्मारकाविरूद्धची अपिल फेटाळले जाणे हा सत्याचा विजय असल्याची प्रतिक्रिया स्मारक समितीचे अध्यक्ष यु.एल. जाधव यांनी व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, हे स्मारक नियमानुसारच उभारले जाते आहे. परंतु, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर खा. अशोकराव चव्हाण यांच्याबाबत अपप्रचार करण्याच्या हेतूने या स्मारकाला राजकीय विरोध करण्यात आला. न्यायालयाच्या या निर्णयाने विरोधक तोंडावर पडले आहेत. बंजारा समाज खा. अशोकराव चव्हाण यांच्या पाठीशी होता व यापुढेही कायम राहिल.

### राजकीय विरोधाला न्यायालयाची चपराक: विनोद चव्हाण

श्री संत सेवालाल महाराजांच्या स्मारकविरूद्ध अपिल फेटाळून न्यायालयाने राजकीय विरोधाला सणसणीत चपराक लगावल्याचे बंजारा समाजातील सक्रिय कार्यकर्ते विनोद चव्हाण यांनी व्यक्त केली आहे. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी या संतकार्यासाठी नियमानुसार जागा दिली होती. मात्र, त्यांच्या राजकीय विरोधकांनी या कामात जाणीवपूर्वक अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. न्यायालयाच्या निर्णयामुळे बंजारा समाजात आनंदाचे वातावरण पसरल्याचे ते पुढे म्हणाले.

# केराम साहबका काम बोलता है भाई.!

## गोकुंदा, सुभाषनगरातील असंख्य मुस्लिम कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. २२ ऑक्टोबर**

विद्यमान आमदार भीमराव केराम यांना भारतीय जनता पक्षाची उमेदवारी जाहीर झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी सुभाषनगर व गोकुंदा येथील असंख्य मुस्लिम कार्यकर्त्यांनी आमदार भीमराव केराम यांच्या नेतृत्वावर व विकासकार्यावर विश्वास ठेऊन भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.



भारतीय जनता पक्षाने किनवट विधानसभा मतदारसंघासाठी विद्यमान आमदार भीमराव केराम यांना दुसऱ्यांदा उमेदवारी जाहीर केली आहे.उमेदवारी जाहीर झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी किनवट शहरातील सुभाषनगर तसेच गोकुंदा येथील मुस्लिम समाजातील शेख सोनू शेख तबरेज,शेख अझहर,शेख गौस, शेख चांद यांनी त्यांच्या शेकडो समर्थकासह तर विक्रांत पवार रोहित पिंपळे, शुभम वाघमारे, अक्षय मरसकोल्हे अजय मेश्राम यांनी त्यांच्या समर्थकासह आ भीमराव केराम यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांना उमेदवारी मिळाल्याबद्दल शुभेच्छा देत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. आमदार भीमराव केराम यांनी अल्पशा कालावधीत करोडो रुपयाची विकास कामे करून किनवट माहूर तालुक्याचा कायापालट केला.त्यांच्या विकासात्मक नेतृत्वाला प्रभावित होऊन आम्ही भारतीय जनता पक्षाचे प्रवेश करत आहोत.अशा भावना पक्षप्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, सुनील पाटील, दत्ता आडे, स्वागत आयनेनीवार, शिवा आंधळे, ॲड. मास बडगुजर हे उपस्थित होते.

# मुखेड-कंधार विधानसभा अपक्ष लढवणार: बालाजी खतगावकर

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रामाबाद,दि. २२ ऑक्टोबर**

मुखेड येथील शिवसेना (शिंदे गट) पक्ष कार्यालय येथे दि.२१ रोजी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. मुखेड - कंधार विधानसभा अपक्ष लढवणार असल्याची माहिती उमेदवार बालाजी पाटील खतगावकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. मुख्यमंत्री यांचे खासगी सचिव बालाजी पाटील खतगावकर यांनी मुखेड मतदारसंघात गेल्या तीन महिन्यापासून झंझावत दौरा करुन मतदारांची भेटी घेऊन संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला. त्यांना आशा होती की तिकिट आपलाच फायनल होणार परंतु भाजप पक्षश्रेष्ठिणी विद्यमान आमदार डॉ.तुषार राठोड यांना उमेदवारी घोषित केल्यामुळे इच्छूक उमेदवार बालाजी पाटील खतगावकर यांनी बंडखोरी करत संपूर्ण ताकदिनिशी अपक्ष निवडणूक लढवणार असल्याची



घोषणा केली. पुढे ते बोलताना म्हणाले की मतदासंघात सर्व्हेमध्ये मी पहिल्या स्थानावर आहे. प्रत्येक पक्ष आपली ताकद आजमावत असतो. त्यांचा निर्णय मान्य करावा लागतो. मुखेडचा विकास हेच माझं एकमेव ध्येय आहे. जनतेच्या प्रतिसादामुळे मी इथपर्यंत आलो आहे. जर आम्ही आता माघार घेतली तर जनता मला माफ करणार नाही. त्यामुळे कोणत्याही पक्षाला विरोध न करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनेनुसार मी अपक्ष निवडणुक लढवणार आहे. आता ही लढाई जनतेच्या दरबारात आहे. जनतेने परिवर्तनासाठी साथ दिलीय म्हणून मी समाजसेवेचे व्रत घेऊन काम करणार आहे. जरी आम्हाला संधी मिळाली नाही तरी आमचे विकास कार्य सुरू राहील. पुढील पाच वर्षासाठी विकासाची ब्ल्यू प्रिंट तयार आहे. कोणी कितीही मोठा असू द्या, जनतेला विकत घेऊ शकत नाही, असे यावेळी स्पष्ट केले. यावेळी भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर, गुणवंतराव पाटील हंगरगेकर, शिवराज पाटील मसलगेकर, सुभाष काटे अशोक पाटील रावीकर सादिक तांबोळी, वाडीकर मामा, श्रीकांत काळे, डॉ.श्रीरामे, आदि उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



### मतदान व मतमोजणी कालावधीत मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद

छत्रपती संभाजीनगर, दि.२२(जिमाका):- विधानसभा निवडणूक २०२४ ची निवडणूक प्रक्रिया संपूर्ण जिल्ह्यात सुव्यवस्थित पार पडावी व कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी मतदान व मतमोजणी कालावधीत मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी निर्गमित केले आहेत. त्यानुसार संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मतदानाच्या अगोदरच्या आधीचा दिवस दि.१८ नोव्हेंबर सायंकाळी ६ वाजल्यापासून पुढे, मतदानाच्या आधीचा दिवस दि.१९ नोव्हेंबर संपूर्ण दिवस व मतदानाचा दिवस दि.२० नोव्हेंबर संपूर्ण दिवस तसेच मतमोजणीचा संपर्ण दिवस दि.२३ नोव्हेंबर रोजी कोरडा दिवस घोषीत करुन मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद राहतील,असे कळविण्यात आले आहे. या आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित अनुज्ञप्तीधारकाविरुद्ध महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम १९४९ तसेच लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ अंतर्गत कायदेशीर कारवाई केली जाईल असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### प्रतिबंधात्मक आदेश जारी

छत्रपती संभाजीनगर, दि.२२(जिमाका)- आगामी काळातील सण, उत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९७१ चे कलम ३७(१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी जारी केले आहेत. दि.२ नोव्हेंबर पर्यंत हे आदेश लागू असतील. या आदेशान्वये सार्वजनिक ठिकाणी शस्त्र वापरण्यास, दाहक स्फोटक पदार्थ बाळगण्यास, प्रक्स्होभक भाषणे, असभ्य वर्तन करण्यास, प्रतिमा, आकृत्या इ. चे प्रदर्शन करण्यास इ. कृत्य करण्यास तसेच पाच किंवा पाचापेक्षा अधिक व्यक्तिंना विनापरवानगी एकत्र येणास बंदी घालण्यात आली आहे. या आदेशातून कर्तव्यावर असलेले पोलीस अधिकारी व अन्य सक्षम अधिकारी यांना वगळण्यात आल्याचेही आदेशात नमूद आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

### वेतन देयके आज व उद्या कोषागारात सादर करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.२२(जिमाका):- आहरण संवितरण अधिकाऱ्यांनी आपापल्या अधिनस्त वेतन देयके ही बुधवार दि.२३ व गुरुवार दि.२४ रोजी कोषागारात सादर करावीत असे आवाहन उपसंचालक तथा वरिष्ठ कोषागार अधिकारी शेखर कुलकर्णी यांनी केले आहे. वेतन देयके व सण अग्रिमाची देयके या कालावधीत दाखल करावीत. दि.२६ ते २९ या कालावधीत कोषागाराची संगणकीय प्रणाली बंद राहणार असुन त्याआधी आपापल्या कार्यालयाची वेतन देयके कोषागारात जमा करावी असे उपसंचालक कुलकर्णी यांनी कळविले आहे.

### खट्याळ पिट्या...



## आदर्श आचारसंहिता पालनासाठी दक्ष रहावे-विकास मीना

छत्रपती संभाजीनगर, दि.२२(जिमाका):- निवडणूक कालावधीमध्ये आदर्श आचारसंहितापालनासाठी सर्व पथक प्रमुखांनी ,सर्व नोडल अधिकाऱ्यांनी दक्ष राहून कारवाई करावी,असे निर्देश आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी आज दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील आचारसंहिता कक्षामध्ये आज जिल्ह्यातील सर्व नऊ विधानसभा मतदार संघनिहाय आचारसंहिता नोडल अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, महानगरपालिका अपर आयुक्त रणजीत पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले, खनिकर्म अधिकारी किशोर घोडके, श्रीमती उपासे यांच्यासह जिल्ह्यातील नऊ मतदारसंघातील आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

यावेळी सुचना देण्यात आल्या की, आचार संहिता अंमलबजावणीसाठी नियुक्त भरारी पथके, स्थिर पथके, व्हिडीओ पथके यांनी बस स्थानक, रेल्वे स्थानक, सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या वाहनात रोख रक्कम वाहतूकीबाबत तपासणी करावी. त्याचप्रमाणे संशयास्पद ठिकाणी अचानक क्षेत्रभेट देऊन तपासणी करावी. तपासणीची व्हिडिओग्राफी ,लेखी नोंदी असणे आवश्यक आहे. तपासणी केल्यानंतर प्रत्येक दोन दिवसांनी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये भेटीचे नियोजन मतदारसंघनिहाय करावे. दिवाळी सणाच्या पार्श्वभुमीवर विविध ठिकाणी कपडे, भेटवस्तू किंवा इतर वस्तूचे वाटप करुन मतदारांना प्रलोभन दिले जाऊ शकते. याबाबतही योग्य ती खबरदारी या कक्षामार्फत नियुक्त अधिकारी कर्मचारी घ्यावी. विनापरवानगी पोस्टर, बॅनर याबाबत प्रचार होत असेल तर तात्काळ दखल घ्यावी. सी विजील या पवर येणाऱ्या तक्रारींचीही तात्काळ दखल घेण्यात यावी. योग्य ते पुरावे जतन करावे. आचारसंहिता पालन करत असताना योग्य ती खबरदारी नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांनी घ्यावी, विविध क्षेत्रातील भेटीचे नियोजन, रोख रक्कम आढळून आल्यास करावयाचे कार्यवाही बाबत मार्गदर्शन या बैठकीमध्ये करण्यात आले.

### उमेदवारांच्या प्रतिनिधींना नामनिर्देशन प्रक्रियेचे प्रशिक्षण

छत्रपती संभाजीनगर, दि.२२ : विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना नामनिर्देशन प्रक्रियेबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन करण्यात आले.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके यांनी यावेळी उपस्थित राजकीय पक्ष व उमेदवारांच्या प्रतिनिधींना नामनिर्देशनाबाबत माहिती दिली. नामनिर्देशन प्रक्रियेवेळी आवश्यक दाखले व कागदपत्रे, विविध प्रतिज्ञापत्रे, त्यांचे नमुने, नामनिर्देशन अर्ज भरतांना घ्यावयाची खबरदारी, प्रस्तावकांचे निकष, उमेदवारीचे निकष, राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी द्यावयाचे विविध प्रमाणपत्रे याबाबत माहिती देण्यात आली. तसेच अनामत रक्कम, ऑनलाईन सुविधा इ.बाबत मार्गदर्शन करण्यात आले. नामनिर्देशन पत्र भरतांना संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे एक सुविधा कक्ष असून त्या कक्षातही ही माहिती व माहिती पुस्तिका आदीबाबत माहिती उपलब्ध असेल असेही स्पष्ट करण्यात आले. उमेदवारी अर्ज भरतांना बँक खाते, मतदार यादीतील नाव व उमेदवार मतदार संघाबाहेरील मतदार असल्यास तेथील मतदार नोंदणी अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

### सायबर सुरक्षा व जागरुकताबाबत कार्यशाळा

वाळूज महानगर (प्रतिनिधी):- बजाजनगर येथील हायटेक कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड कम्प्युटर सायन्स या महाविद्यालयात सायबर सुरक्षा आणि सामान्य जागरूकता याबाबत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एम.के.सी.एल.) चे विभागीय समन्वयक श्री. निलेश झाल्टे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षितता आणि त्यासोबत घ्यावयाची काळजी याबाबत विशेष मार्गदर्शन करून संवाद साधला. या कार्यशाळेस संस्थेचे सहसचिव श्री. अमन जाधव , संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. बी. बी.जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. विजय शिराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिकषकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## हिरडपुरीचे ग्रा.पं सदस्य यांचा शिवसेनेत प्रवेश



तभा वृत्तवेध

पैठण दि २२ :- पैठण विधानसभा महायुतीचे संभाव्य उमेदवार विलास बाप्पू भुमरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मौजे हिरडपुरी येथील ग्रामपंचायत सदस्य भागवत ढोले , अर्जुन कचरे सह गावातील विविध पक्षातील सामाजिक कार्यकर्ते भिवराज भंडारे राम भंडारे ,राजेश लिंबोरे , हरी विठोरे ,अरुण कचरे ,समाधान कचरे ,मगन कचरे ,विक्रम भंडारे ,बाळचंद भंडारे ,बंडू गहिरे , करण भंडारे ,छगन कचरे ,भिवा कचरे , लखन भंडारे , अशोक कचरे , फिरोज शेख , सचिन भंडारे अश्या अनेकांनी शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी हिरडपुरी येथील विद्यमान ग्रामपंचायत सदस्य इस्लाम पटेल , सोसायटी सदस्य संचालक रघुनाथ ईच्छय्या ,गजानन ईच्छय्या सह अनेक गांवकरी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सचिवपदी आप्पासाहेब निर्मळ



तभा वृत्तसेवा

पैठण दि २२ : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रदेश सचिवपदी आप्पासाहेब बप्पासाहेब निर्मळ यांची निवड करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी त्यांना नियुक्तीपत्र दिले. आप्पासाहेब निर्मळ हे राष्ट्रवादी पक्ष स्थापनेपासून पक्षात सक्रिय आहेत. त्यांनी आतापर्यंत पैठण तालुकाध्यक्ष, छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्याध्यक्ष, मराठवाडा संघटक म्हणून काम पाहिले आहे. जलसंपदा विभागाच्या जायकवाडी प्रकल्पांतर्गत पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांना ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजनेचा लाभ मिळावा यासाठी त्यांनी वेळोवेळी लढा उभारला. त्यांच्या या लढ्यामुळे तालुक्यातील ६० गावातील शेतकऱ्यांना लाभ मिळाला आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी झटणारा नेता म्हणून ते परिचित आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्याकडे मोठी जबाबदारी सोपवली आहे. त्यांच्या निवडीबद्दल प्रदेश सरचिटणीस आ. शिवाजीराव गर्जे, मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आ. विक्रम काळे, राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार, माजी आ. कैलास पाटील, माजी आ. नितीन पाटील, महायुतीचे खा. संदीपान भुमरे, खासदार डॉ. कल्याण काळे, जेष्ठ उद्योगपती पद्माकर मुळे, जेष्ठ नेते हरिभाऊ डवाण, मनपाचे माजी गटनेते भाऊसाहेब जगताप, पैठण शहराध्यक्ष जितू शेठ परदेशी, तालुकाध्यक्ष विजय चव्हाण यांच्यासह हितचिंतकांनी शुभेच्छा दिल्या.

## सोयगाव शहरासह तालुक्यातील शेतकऱ्यांचा ओल्या दुष्काळ जाहीर करण्याची तहसील कार्यालय सोयगाव येथे निवेदन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव दि.२१ ऑक्टोबर

सोयगाव सह तालुक्यातील चारही मंडळात झालेल्या अतिवृष्टी व दहा दिवसापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने खरिप पिकांचे शंभर टक्के नुकसान झाले आहे त्यामुळे सोयगाव तालुका तातडीने ओला दुष्काळात समाविष्ट करावा व सोयगावला ओल्या दुष्काळ जाहीर करा अशा मागणी साठी सोमवारी सोयगाव तहसील कार्यालय वर सोयगाव शहर शेतकरी व गोंदेगाव,निंबोरा,तितुर या परिसरातील शेतकऱ्यांचे वेगवेगळे दोन सोयगाव तहसील कार्यालय वर धडकले सुनील माने यांच्या नेतृत्वाखाली गोंदेगाव,तितुर,निंभोरा येथील दीडशे शेतकऱ्यांचा दुपारी दोन वाजता तर सोयगाव शहरातील



शेतकऱ्यांचा दुपारी तीन वाजता सोयगाव तहसील वर मोर्चा धडकला सोयगाव सह तालुक्यात सलग तीन वेळा अतिवृष्टी तर दहा दिवसापासून सतत मुसळधार व कमी अधिक तीव्रतेने पाऊस सुरू आहे त्यामुळे कपाशी,मका,सोयाबीन,ज्वारी व बाजरी या सर्व पिकांचे शंभर टक्के नुकसान झाले आहे त्यामुळे हताश झालेल्या शेतकऱ्यांना आता आत्महत्या शिवाय पर्याय राहिलेला नाही त्यामुळे शासनाने तातडीने सोयगाव तालुका ओला दुष्काळ म्हणून जाहीर करावा व सोयगाव चा ओल्या दुष्काळात समाविष्ट करण्यात यावा अशा मागणीचे निवेदन तहसीलदार मनीषा मेने जोगदंड यांना दिले आहे

-----बनोटी मंडळात तीन वेळा झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले आहे पीकविमा कंपनीने या मंडळ साठी २५ टक्के ॲग्रिम मंजूर करून शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करा अशी स्वतंत्र मागणी या शेतकऱ्यांनी केली आहे. सोयगाव शहरातील शेतकऱ्यांच्या निवेदनात प्रभाकर कुळकर्णी, कृषीभूषण अरूण सोहणी,शिवाजी चौधरी,राजेंद्र जावळे, अनिल चौधरी,भरत काळे,प्रमोद पाटील,राजेश पाटील,जितू चौधरी, अमोल मापारी,युवराज आगे,भागवत गव्हांडे,शोभराज चौधरी यांच्या तर गोंदेगाव तितुर परिसरातील शेतकऱ्यांच्या निवेदनात सुनील माने,भगवान पालकर,अनिल वाणी,भिवंसंन चोपडे, भगवान चोपडे, भागवत कदम,दत्तू मेटे,विष्णू पाटील,नाना पाटील,देवराम सोनवणे,बापू चोपडे,विनोद माने,रवींद्र माने,संजय जाधव भावडू माने आदींचा समावेश होता.

### दि एआय धर्मा स्टोरी' २५ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार

छत्रपती संभाजीनगर- 'दि एआय धर्मा स्टोरी'मध्ये एक वडील आपल्या मुलीच्या जीवासाठी कसे लढा देतात, हे दाखवण्यात आले आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या वाढत्या तंत्रज्ञानाचे चांगले-वाईट परिणाम दाखवत हा चित्रपट एका भावनिक प्रवासाची गोष्ट सांगतो. पुष्करने या चित्रपटात मुख्य भूमिका साकारली असून स्मिता गोंदकर, दीप्ती लेले याही या चित्रपटात महत्वपूर्ण भूमिकेत झळकणार आहेत. बियु प्रोडक्शन निर्मित या चित्रपटाच्या तेजल पिंपळे निर्मात्या असून येत्या २५ ऑक्टोबर रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. पुष्कर सुरेखा जोग दिग्दर्शित 'दि एआय धर्मा स्टोरी' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. . हा एक थरारक चित्रपट असून आजच्या काळातील विदारक सत्य यात दाखवण्यात आले आहे. मराठीत हा विषय कधीच हाताळण्यात आलेला नसल्याने प्रेक्षकांना या चित्रपटाची विशेष उत्सुकता आहे. हा चित्रपट पुष्कर जोग काही कारणांनी स्वतःशी रिलेट करतो. याबाबतचा खुलासा त्याने स्वतः केला आहे. पुष्कर जोग म्हणतो, '' आज समाजात डीप फेकचे प्रमाण फोफावतेय. मी स्वतः एका मुलीचा वडील असल्याने माझ्याही मनात तिच्या सुरक्षेबाबतचा मुद्दा कायम असतो. माझ्यासाठी माझ्या मुलीचा जीव खूप महत्वाचा आहे. त्यामुळे या चित्रपटाची कथा मी स्वतःशी जोडू शकतो. चित्रपटात धर्माची व्यक्तिरेखा साकारताना, मी स्वतःच्या भावना त्यात ओतल्या आहेत. एक वडील आपल्या मुलीला वाचवण्यासाठी आणि तिचे रक्षण करण्यासाठी काय करू शकतो, हे या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. चित्रपटाची कथा एक थरारक अनुभव देईल, तसेच एक वडील मुलीची भावनिक नातेही या निमित्ताने अनुभवयाला मिळेल.''

## संत येती घरा तूच दिवाळी दसरा : अरुणनाथगिरीजी महाराज

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी : आसेगाव अखंड हरिनाम सप्ताह व. ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा. या साप्ताह दरम्यान पहिली किर्तन सेवा दि २० ऑक्टोंबर रोजी हा भ प स्वाधवी सोनाली दीदी करपे यांची सायंकाळी ८ते १० किर्तन सेवा. संपन्न झालीं

कैलासवासी ह भ प सहदेव महाराज. अण्णा असेगावकर ह भ प यादव महाराज काका असेगावकर गुरुवर्य महंत भास्करगिरीजी महाराज देवगड रामभाऊ महाराज राऊत विठ्ठल आश्रम गंगापूर गुरुवर्य प्रकाश नंदगिरीजी महाराज १०८ स्वामी शांतनंदगिरीजी महाराज शिवराई दुसऱ्या दिवशीची सेवा




गुरुवर्य अरुणात गिरीजी महाराज अडबंगनाथ संस्थान भामाठाण प्रमुख यांच्या कीर्तनाने सुरुवात करण्यात आली. यावेळी वेरूळ येथील नाथ आश्रम प्रमुख सद्गुरु अक्काताई महाराज यांची यादरम्यान प्रमुख उपस्थिती होती .

आपल्या मधुर वाणीतून अरुणा गिरीजी महाराज यांनी कथा श्रावण करणाऱ्या भक्तांना संत समजून घ्या ईश्वर प्राप्ती झाल्याशिवाय राहणार नाही तरुण वयात देव धरम करा आई-वडिलांनाची सेवा करा. वय वृद्ध ना. जीव लावा साधू संतांची संगत करा यातून निश्चित ईश्वर प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही असे आपल्या कीर्तनादरम्यान सेवेत भक्तांना सांगितले व कीर्तनाचे शेवट प्रभू रामचंद्रांचे जे जे कारणे करण्यात आली.

या साप्ताह गावातीलआयोजित कमिटी ने सुंदर अशा प्रकारे आयोजन केल्याबद्दल महाराजांनी सर्व कमिटीला मनापासून धन्यवाद दिले यावेळी या पंचक्रोशीतील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित

## कार्यकारी अभियंतापदी प्रसाद महातोले रुजू



छत्रपती संभाजीनगर : महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर शहर विभाग-१ येथे कार्यकारी अभियंतापदी श्री.प्रसाद महातोले नुकतेच रुजू झाले आहेत. महातोले यापूर्वी महावितरणच्या मुंबई येथील प्रकाशगड मुख्यालयात देयके आणि महसूल विभागात कार्यरत होते. त्यापूर्वी त्यांनी जिंतूर, परभणी, जळगाव येथे तसेच वीज वितरण क्षेत्रातील खाजगी कंपनी टोरंट पॉवरमध्ये आग्रा, भिवंडी येथे आणि क्रॉम्प्टन ग्रीव्हजमध्ये जळगाव येथे काम केलेले आहे. तत्पर ग्राहक सेवा आणि अखंडित वीजपुरवठा देण्यावर त्यांचा विशेष भर आहे.

महातोले हे विद्युत अभियांत्रिकीचे पदवीधर असून त्यांनी एनर्जी मॅनेजमेंटमध्ये एमबीए केलेले आहे. तसेच ते ब्युरो ऑफ एनर्जी एफिशिएंसीचे प्रमाणित एनर्जी ऑडिटर आहेत.

## महावितरणच्या तंत्रज्ञास धक्काबुक्की करून मोबाईल फोडणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर : वीजबिल थकबाकी न भरता महावितरणच्या तंत्रज्ञास धक्काबुक्की करून मोबाईल फोडणाऱ्या दोन जणांवर पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महावितरणच्या मुकुंदवाडी शाखेचे तंत्रज्ञ संतोष पोळ हे २१ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास त्यांच्या एन-४ येथील कार्यालयात काम करीत होते. त्यावेळी सोनू रमेश दहिहंडे (रा.मुकुंदवाडी) हा त्याच्या एका मित्रासोबत कार्यालयात आला. त्याच्या वडिलांच्या नावे असलेल्या विद्युत मीटरचे बिल इतके का आले असे विचारू लागला. पोळ यांनी त्याची सहायक अभियंता विजय काथार यांच्याशी भेट घालून दिली. त्यावेळी सदर ग्राहकास तुम्ही मागील दोन वर्षांपासून बिल भरले नसल्याने एवढे बिल आलेले आहे, असे समजावून सांगितले. सदर इसमाने पोळ यांना पैसे दिले अशा खोट्या मजकुराचा अर्ज दिला असता अर्जाची चौकशी करू असे काथार यांनी सांगितले. सदर इसम कार्यालयातून बाहेर आला व पोळ यांच्याकडे जाऊन तुम्हीच मुद्दामहून एवढे बिल दिले असे म्हणत जोराने धक्का दिला. धक्का का दिला असे विचारले असता त्याने पोळ यांना शिवीगाळ करत मारहाणीची धमकी दिली. आरोपीने पोळ यांच्या खिशातला मोबाईल काढून जोरात भिंतीला मारल्याने मोबाईलची बॉडी व डिस्प्ले फुटला. त्यानंतरही दहिहंडे व त्याच्या सोबत आलेल्या अनोळखी इसमाने जाताजाता 'बाहेर भेट, तुला पाहून घेतो' अशी धमकी दिली.

घटनेनंतर पोळ यांनी पोलिस ठाणे गाठून रीतसर फिर्याद दिली. पोळ यांना धक्काबुक्की, जिवे मारण्याची धमकी, खोटा तक्रार अर्ज देणे आणि मोबाईल फोडून २५ हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी सोनू रमेश दहिहंडे व अनोळखी इसम या दोघांवर पुंडलिकनगर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जिल्हा दूध संघाचे मा. उपाध्यक्ष तथा संचालक कचरू डिके पाटील यांची निवड



छत्रपती संभाजीनगर - जिल्हा दूध संघाचे मा.उपाध्यक्ष तथा विद्यमान संचालक मा.श्री कचरू डिके पाटील यांची आज भारतीय जनता पार्टी छत्रपती संभाजीनगर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली . ही निवड भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष मा.चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब तसेच छत्रपती संभाजी नगर दक्षिण चे जिल्हाध्यक्ष मा. संजयजी खंबायते व वैजापूर तालुका व छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी यांच्या आदेशाने करण्यात आली आहे

डिके अण्णा हे मागील ३५ वर्षापासून वैजापूरच्या सक्रिय राजकारणात व भारतीय जनता पार्टीत मागील आठ वर्षापासून संघटनेत काम करत आहेत तसेच ते पंचायत समिती वैजापूर व मागील २७ वर्षापासून जिल्हा दूध संघाच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्याभरात सहकार क्षेत्रात कार्यरत आहे या निवडीचा नक्कीच वैजापूर तालुक्यातील भारतीय जनता पार्टीला याआधी व भविष्यात नक्कीच संघटना वाढीसाठी मोलाचे कार्य करतील.

याचबरोबर जिल्हा सरचिटणीस पदी वैजापूरचे नगरसेवक मा. दशरथ बनकर , शहराध्यक्षपदी गोकुळ भुजबळ, व जिल्हा सचिव पदी गोरख घायवट यांच्या निवडीने नक्कीच वैजापूर तालुक्यात भारतीय जनता पार्टीला आणखीन संघटना वाढवण्यासाठी उभारी मिळेल .

यावेळी संभाजीनगर जिल्हा, वैजापूर तालुक्यातील सर्व भारतीय जनता पार्टीचे सर्व आघाडीचे प्रमुख तसेच भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या ...!



धूम
विधानसभा निवडणुकीचा 'मत'संग्राम
तरुण भारत
बुधवार, दि. २३ ऑक्टोबर २०२४




# अजित पवारांनी वाटले १७ उमेदवारांना एबी फॉर्म

## आधी फार्म नंतर यादी, अजितदादांचा अजब कारभार

**◆ मुंबई, २२ ऑक्टोबर**

महायुतीतील प्रमुख घटक पक्ष असलेल्या भाजपाने आपली पहिली यादी जाहीर केल्यानंतर घटकपक्षांची यादी जाहीर होईल, अशी अपेक्षा असताना अचानक यादी ऐवजी अजित पवारांनी थेट एबी फॉर्म वाटले. पवारांनी १७ उमेदवारांना थेट एबी फॉर्म दिल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

सोमवारी सकाळपासून अजित पवारांच्या देवगिरी बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची ये-जा सुरू होती. तिकिटांच्या मागणीसाठी अनेक लोकं मोर्चेबांधणी करीत असतात. त्यातला हा भाग असावा, असा क्यास लावला जात होता.

मात्र, बंगल्यावर येणारे नेते स्वतःहून आले नव्हते किंवा तिकिटाच्या मागणीसाठी ते आले नव्हते; तर त्यांचे तिकीट पक्केच होती. त्यांना एबी फॉर्म देण्यासाठी अजित पवारांनी बंगल्यावर बोलावले होते, हे नंतर स्पष्ट झाले.

अजित पवारांनी ज्या १७ उमेदवारांना एबी फॉर्म दिले त्यात, दिलीप वळसे पाटील, नरहरी झिरवळ, छगन भुजबळ, दत्तात्रय भरणे, संजय बनसोडे, चेतन तुपे, सुनील टिंगरे, दौलत दरोडा, राजेश पाटील, आशुतोष काळे, भरत गावित, बाबासाहेब पाटील, अतुल बेनके, नितीन पवार, इंद्रनील नाईक, बाळासाहेब आजबे आणि काँग्रेसचे आमदार हिरामण खोसकरांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे, नवाब मलिक आणि त्यांच्या मुलुला उमेदवारी दिली जाणार, हे निश्चित असताना, त्यांना एबी फॉर्म देण्यात आला की नाही, याबाबतची माहिती अद्याप पुढे आली नाही. महत्त्वाचे म्हणजे, या समोर आलेल्या नावांमध्ये अजित पवारांचे जवळचे मंत्रिमंडळातील सहकारी धनंजय मुडे, हसन मुश्रीफ, धर्मरावबाबा आत्राम, अदिती तटकरे, अनिल पाटील यांची नावे नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. यांना एबी फार्म देण्यात आले आहेत पण नाव पुढे आली नाहीत किंवा मग यांच्यासारख्या दिग्गजांना एबी फॉर्म का दिले गेले नसावे, यामागे काय राजकीय समिकरण असावे, ते येत्या काळात कळेलच. ◂(तभा वृत्तसेवा)

# आचारसंहितेचा भंग, राज्यात १४ कोटींवर मालमत्ता जप्त

**◆ मुंबई, २२ ऑक्टोबर**

राज्यात आचारसंहिता लागू झाल्यानंतर सी-व्हिजिल ॲपवर राज्यभरातून ५६७ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी ५६३ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या असून, १४ कोटी ९० लक्ष रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

निवडणूक काळातील गैरप्रकार रोखण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सी-व्हिजिल ॲपवर राज्यभरात १५ ते १९ ऑक्टोबरपर्यंत एकूण ५७६ तक्रारी प्राप्त झाल्या, अशी माहिती अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली.

राज्यातील शासकीय जागेतील २ लाख ४२ हजार ६३४, सार्वजनिक जागेतील २ लाख ७९ हजार तर, खाजगी जागेतील विनापरवाना १ लाख ८३ हजार जाहिराती काढून टाकण्यात आल्या आहेत. यात भिंतीवरील पेंटींग, पोस्टर, बॅनर, कटआऊट, फ्लेक्स इत्यादींचा समावेश आहे. विनापरवाना जाहिरातींवर कारवाई करणे सुरू असल्याचे डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले.

राज्य शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण १४ कोटी ९० लक्ष रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ◂(वृत्तसंस्था)

## इनकमिंग....आऊटगोईंग



**पहिल्या यादीत नाव न आल्याने बीड जिल्ह्यातील भाजपा नेते राजेंद्र म्हस्के यांनी पक्षाला रामराम ठोकत मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली.**

☞ अहल्यानगर जिल्ह्याच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अनुराधा नागवडे व प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी त्यांच्या पक्षाच्या सर्व पदांचा व सदस्यत्वाचा राजीनामा दिला. आता शरद पवार गट किंवा उद्धव ठाकरे गट यापैकी कोणत्या पक्षात जाणार, हे अद्याप जाहीर केलेले नाही.



**सावंतवाडी शिवसेनेचे माजी आमदार परशुराम उपरकर यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत पक्षात पुन्हा प्रवेश केला. दरम्यानच्या काळात ते मनसेमध्ये सक्रिय होते.**

# परिवर्तन महाशक्तीचे दहा उमेदवार जाहीर



**◆ मुंबई, २२ ऑक्टोबर**

विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर राज्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. महाविकास आघाडीत जागावाटपांचा तिढा आहे. दुसरीकडे, भाजपाने रविवारी ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करून आघाडी घेतली. सोमवारी परिवर्तन महाशक्तीच्या दहा उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. माजी मंत्री बच्चू कडू, माजी खासदार संभाजीराजे छत्रपती, माजी खासदार राजू शेट्टी यांनी पत्रपरिषदेत यादीची घोषणा केली.

यावेळी संभाजीराजे छत्रपती म्हणाले की, मागील १० ते १५ दिवसांत आम्हाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. विस्थापितमधील आमच्या संपर्कात आहेत. लवकरच त्यांची नावे जाहीर केली जातील. आमच्या इतर जागा टप्प्याटप्प्याने जाहीर केल्या जातील. रणनीतीचा भाग म्हणून आम्ही सर्व जागा एकावेळी जाहीर करणार नाही. ◂(वृत्तसंस्था)

**उमेदवारांची नावे**

| | |
|---|---|
| बच्चू बा. कडू (प्रहार जनशक्ती पक्ष) | (अचलपूर) |
| अनिल छबिलदास चौधरी (प्रहार जनशक्ती पक्ष) | (रावेर यावल) |
| गणेश रमेश निंबाळकर (प्रहार जनशक्तीपक्ष) | (चांदवड) |
| सुभाष साबणे (प्रहार जनशक्ती पक्ष) | (देगलूर बिलोली) |
| अंकुश सखाराम कदम (महाराष्ट्र स्वराज्य पक्ष) | (ऐरोली) |
| माधव देवसरकर (महाराष्ट्र स्वराज्य पक्ष) | (हदगाव हिमायतनगर) |
| गोविंदराव सयाजीराव भवर (महाराष्ट्र राज्य समिती) | (हिंगोली) |
| वामनराव चटप (स्वतंत्र भारत पक्ष) | (राजुरा) |

# दोन गुलाबरावांत 'काटे की टक्कर'



**◆ जळगाव, २२ ऑक्टोबर**

जळगाव ग्रामीणमध्ये पालकमंत्री गुलाबराव पाटील व माजी पालकमंत्री गुलाबराव देवकर या दोघांमध्ये लढत शक्य आहे. पाटलांविरोधात देवकर नेमके अजित पवार गटाकडून लढतात की तुतारीकडून, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गेल्या अडीच वर्षांत शिवसेनेचे दोन भाग झाल्यानंतर आमदार गुलाबराव पाटील हे शिवसेनेत सामील झाल्याने उबाठाच्या काही नेते व कार्यकर्त्यांची नाराजी ओढवली आहे. लोकसभा निवडणुकीत पालकमंत्री पाटील यांच्या नेतृत्वात भाजपाला मताधिक्य मिळाले. मात्र, तसेच विधानसभा निवडणुकीत होईल, असे नाही. शिवसेनेला भाजपाने प्रामाणिकपणे मदत केली, तर मताधिक्याचा फरक पडू शकतो. मात्र, गेल्या विधानसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवार चंद्रशेखर अत्तरदे हे अप्रत्यक्षपणे भाजपाचे उमेदवार होते. आजही ते आहेत, शिवाय दुसरीकडे उबाठा व शरद पवार गटाकडे जनतेची काही प्रमाणात सहानुभूती आहे. ◂(वृत्तसंस्था)

**२०१९ चे चित्र**

| | |
|---|---|
| गुलाबराव पाटील : | ,०५,३५० |
| चंद्रशेखर अत्तरदे : | ५९,००७ |
| मताधिक्य : | ४६,३४३ |

# मुलगा झाल्यास नाव एकनाथ!

## नेत्याच्या उमेदवारीसाठी गर्भवतीची पायी वारी

**◆ पुणे, २२ ऑक्टोबर**

महाराष्ट्रात विधानसभेची रणधुमाळी सुरू झाली आहे. भाजपाकडून ९९ उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. आता शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारीकडे लक्ष लागून आहे. अशातच पुण्यातील एका नेत्याच्या उमेदवारीसाठी शिवसैनिक मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेण्यासाठी पायी वारी करीत मुंबईला निघाले आहेत.



प्रमोद नाना भानगिरे असे त्या नेत्याचे नाव आहे. शिवसैनिकांपैकी एका गरोदर महिलेने मुख्यमंत्री शिंदे यांना साकडे घालत भानगिरे यांना हडपसरमधून उमेदवारी मिळावी, अशी विनंती केली. आमच्या विठ्ठलाने नानांना उमेदवारी दिली आणि मला मुलगा झाला तर, त्याचे नाव मी एकनाथ ठेवेल, अशी भावनिक साद तिने घातली आहे.

मी शिवसेना हडपसर महिला आघाडी अध्यक्ष आहे. आज आम्ही नानासाठी काम करीत आहोत. त्यांना हडपसर विधानसभेचे तिकीट मिळावे, यासाठी आम्ही आमचा विठ्ठल मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना साकडे घालण्यासाठी मुंबईला निघालो आहोत. ज्याप्रमाणे एकनाथ शिंदे महाराष्ट्राचा विकास करीत आहेत, त्याप्रमाणे नानाही हडपसरचा विकास करतील. त्यांनी एखाद्या वेळेस भाऊबीजेसाठी मला बोनस दिला नाही तरी चालेल. पण, आमच्या नानांना उमेदवारी द्यावी, ही विनंती आहे, मला मुलगा झाला तर, त्याच नाव नक्कीच एकनाथ ठेवले. म्हणजे त्यांनी उमेदवारी दिली, तर सर्व सार्थक झाल्यासारखे होईल, असे महिलेने सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# हेमंत झाले शिबू सोरेन यांचे राजकीय उत्तराधिकारी



**श्यामकांत जहागीरदार**

**◆ नवी दिल्ली, २२ ऑक्टोबर**

कोणत्याही घराणेशाहीच्या पक्षाचे जे होते, तेच झारखंड मुक्ती मोर्चाचे झाले आहे. शिबू सोरेन यांनी स्थापन केलेल्या या पक्षात सत्तेच्या वाटणीवरून फूट पडली.

झारखंडचे मुख्यमंत्रिपद तीन वेळेला अल्पकाळासाठी भूषवलेल्या शिबू सोरेन यांना तीन मुले आणि एक मुलगी आहे. मोठा मुलगा दुर्गा सोरेन यांचे निधन झाल्यामुळे सध्या दोन मुले आणि एक मुलगी आहे आणि सर्व जण राजकारणात आहेत. एवढेच नाही तर, दोन भावांच्या पत्नीही राजकारणात आहे.

दुर्गा सोरेन हा शिबू सोरेन यांचा मोठा मुलगा, तर वसंत लहान मुलगा. याशिवाय त्यांना अंजली नावाची मुलगी आहे. स्वतःला शिबू सोरेन यांचे राजकीय वारसदार मानणारे हेमंत सोरेन हे शिबू सोरेन यांचे दुसऱ्या क्रमाकांचे पुत्र. हेमंत सोरेन यांनीही झारखंडचे मुख्यमंत्रिपद आपल्या वडिलांप्रमाणे तीनदा सांभाळले.

सुरुवातीला दुर्गा सोरेनच शिबू सोरेन यांच्यासोबत काम करीत होते. अविभाजित बिहारच्या जामा मतदारसंघातून दुर्गा सोरेन १९९५ मध्ये पहिल्यांदा आमदार झाले. २००० मध्ये ते दुसऱ्यांदा बिहारमधूनच आमदार म्हणून निवडून आले. २००५ च्या झारखंड विधानसभेच्या पहिल्या निवडणुकीत जामा मतदारसंघात भाजपाचे सुनील सोरेन यांनी त्यांचा पराभव केला. गोड्डा लोकसभा मतदारसंघातील निवडणूक दुर्गा सोरेन झामुमोतर्फे लढले, पण त्यात भाजपाचे निशिकांत दुबे यांनी त्यांचा पराभव केला.

२००९ मध्ये बोकोरो येथील निवासस्थानी रात्री झोपेत असताना दुर्गा सोरेन यांचे निधन झाले. ब्रेन हॅमरेजने त्यांचे निधन झाले, असे सांगितले जात असले तरी, त्यांचा मृत्यू संशयास्पद मानला जातो. त्यामुळे आपल्या पतीच्या संशयास्पद मृत्यूची चौकशी करण्याची मागणी दुर्गा सोरेन यांच्या पत्नी सीता सोरेन यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतर केली होती.

दुर्गा सोरेन हयात असेपर्यंत शिबू सोरेन यांचे राजकीय वारस मानले जात होते. पण, दुर्गा सोरेन यांच्या निधनानंतर हेमंत सोरेन यांचा झामुमोच्या राजकारणातील प्रभाव वाढला. शिबू सोरेन यांचे राजकीय वारस ते मानले जाऊ लागले. हेमंत सोरेन यांचे लहान बंधू वसंत देखील दुमका मतादरसंघातील झामुमोचे आमदार होते. बहीण अंजली सोरेनही काही काळ राजकारणात होती. वसंत सोरेन तर चम्पई सोरेन यांच्या मंत्रिमंडळातही होते. ■

# वडाळ्यात ठाकरे गटाचे पोलिस कार्ड

**◆ मुंबई, २२ ऑक्टोबर**

राजकीय नेत्यांपाठोपाठ अनेक अधिकाऱ्यांना निवडणुकीची भुरळ पडली आहे. माजी पोलिस आयुक्त संजय पांडे यांच्या पाठोपाठ माजी सहाय्यक पोलिस आयुक्त संजय जगतापही निवडणुकीच्या रिंगणात उतरले. भाजपाचे कालिदास कोळंबकर यांच्या विरोधात वडाळ्यातून जगताप निवडणूक लढवणार आहेत. उद्धव ठाकरेंशी चर्चा करून ठाकरे गटात ते प्रवेश करणार आहेत.

वडाळा मतदारसंघात पोलिस कुटुंबीयांची संख्या जास्त आहे. वडाळ्याची जागा महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाला जाण्याची शक्यता आहे. या मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या तिकिटावर श्रद्धा जाधव इच्छुक आहेत. दुसरीकडे, संजय जगताप देखील इच्छुक आहेत. आता ठाकरे गटाकडून कोणाला तिकीट मिळते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. भाजपाकडून कालिदास कोळंबकर नवव्यांदा निवडणूक लढवणार आहेत. कोळंबकर यांनी सलग आठ वेळा विधानसभा निवडणूक लढवली आणि जिंकली आहे. संजय जगताप यांनी महाविकास आघाडीकडून या मतदारसंघात निवडणूक लढवली, तर ती अटीतटीची होण्याची शक्यता आहे. ◂(वृत्तसंस्था)

# राधानगरीच्या उमेदवारीसाठी मेहुण्या-पाहुण्यांचा मुंबईत तळ

**◆ राधानगरी, २२ ऑक्टोबर**

राधानगरी, भुदरगड, आजरा विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेची उमेदवारी निश्चित झाल्याने विद्यमान आमदार प्रकाश आबीटकर यांनी प्रचार दौरा सुरू केला. असे असताना महाविकास आघाडीच्या उमेदवारीची घोषणा अद्याप झालेली नाही. ही जागा उबाठा गटाकडे गेल्याने निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असणाऱ्या के. पी. पाटील व ए. वाय. पाटील या मेहुण्या, पाहुण्यांनी प्रमुख कार्यकर्त्यांसह मुंबईत तळ ठोकला आहे. त्यामुळे दोघांपैकी कुणाच्या हातात शिवबंधन असणार, याकडे नजरा लागल्या आहेत.



राधानगरी विधानसभा मतदारसंघात महायुतीतून आमदार आबीटकर रिंगणात आहेत. गेल्या महिनाभरापासून त्यांनी मतदारसंघ ढवळून काढला आहे. परंतु, विरोधात उमेदवार कोण, जागा कोणत्या पक्षाच्या वाट्याला, याबाबत अनिश्चितता होती. या मतदारसंघावर ठाकरे गटाने दावा केल्याने हा मतदारसंघ ठाकरेंकडेच जाणार असल्याने माजी आमदार के. पी. पाटील व जिल्हा बँकेचे संचालक ए. वाय. पाटील हे मेहुणे, पाहुणे शिवसेनेच्या उमेदवारीसाठी चंग बांधून आहेत. के. पी. पाटील यांनी शिवसेनेचे वरुण सरदेसाई यांच्याकडून तर, ए. वाय. पाटील यांनी शिवसेना नेते भास्कर जाधव यांच्याकडून जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. दोघांनाही उमेदवारी मिळण्याबाबत आत्मविश्वास आहे. हे दोघेही आपापल्या प्रमुख कार्यकर्त्यांसह मुंबईत तळ ठोकून आहेत.

दोघांपैकी एकाला उमेदवारी मिळणार असल्याने या ठिकाणी बंडखोरी निश्चितच मानली जाते. त्यामुळे एकास एक लढतीसाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांना राजकीय कस दाखवावा लागणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# सहकारी पक्षांच्या नेत्यांनी घेतली शरद पवारांची भेट

**◆ मुंबई, २२ ऑक्टोबर**

जागावाटपावरून महाविकास आघाडीत तणाव निर्माण झाला असताना, हा मुद्दा सोडवण्यासाठी उद्धव ठाकरे गट आणि काँग्रेसच्या नेत्यांनी सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची भेट घेतली.

एकमत झाल्यानंतर एक किंवा दोन दिवसांत जागावाटपाचे सूत्र जाहीर केले जाईल, असे महाविकास आघाडीच्या सूत्राने सांगितले. महाराष्ट्रात २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणूक होणार आहे. अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया २२ ऑक्टोबरपासून सुरू होईल. महाविकास आघाडीत काही जागांवरून मतभेद निर्माण झाले आहेत. नाना पटोले आणि संजय राऊत यांच्या वाक्युद्ध झाले. त्यामुळे तुटेपर्यंत ताणू नका, असे आवाहन उद्धव ठाकरे यांना करावे लागले. शरद पवार यांनी रविवारी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरवर मुक्काम केला. काँग्रेसचे नेते नसीम खान, उद्धव ठाकरे गटाचे आदित्य ठाकरे, संजय राऊत, अनिल परब आणि शरद पवार गटाचे अनिल देशमुख यांनी त्यांची भेट घेतली. महाराष्ट्र काँग्रेसचे वरिष्ठ नेते सध्या दिल्लीत केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीसाठी गेले आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली. कोणता पक्ष चांगला उमेदवार देऊ शकतो, यासाठी जवळपास १० ते १२ जागांवर लक्ष केंद्रित करून महाविकास आघाडीत चर्चा सुरू आहे. उर्वरित दहा टक्के जागांवर एकमत व्हावे, यावर चर्चा सुरू असल्याचे नसीम खान यांनी वृत्तसंस्थेला सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# मुख्यमंत्री होण्याची सीता सोरेन यांची इच्छा अपूर्ण

**◆ नवी दिल्ली, २१ ऑक्टोबर**

पती दुर्गा सोरेन यांच्या निधनानंतर सीता सोरेन राजकारणात सक्रिय झाल्या. जामा विधानसभा मतदारसंघातून त्या तीन वेळा आमदार झाल्या. राज्यसभा निवडणुकीत पैसे घेऊन मतदान केल्याचा आरोप त्यांच्यावर झाला. या प्रकरणात त्या सात महिने तुरुंगात होत्या. नंतर जामिनावर त्यांची सुटका झाली.

हेमंत सोरेन यांच्या मंत्रिमंडळात समावेश व्हावा, अशी सीता सोरेन यांची इच्छा होती; मात्र ती कधीच पूर्ण झाली नाही. त्यामुळे आपल्याला डावलले जाते, अशी भावना त्यांच्या मनात निर्माण झाली.

सासरच्या लोकांनी आपली उपेक्षा केल्याचा आरोप सीता सोरेन सातत्याने करीत असतात. हेमंत सोरेन यांना तुरुंगात जावे लागल्यावर झारखंडचा नवा मुख्यमंत्री कोण अशी चर्चा सुरू झाली असताना सीता सोरेन यांचे नावही पुढे आले. आपणच शिबू सोरेन यांचे वारसदार असल्याचा त्यांचा दावा होता. पण, सीता सोरेन यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या दावेदारीला घरातून विरोध झाला. हेमंत सोरेन यांच्या पत्नी कल्पना सोरेन यांनी सीता सोरेन यांना मुख्यमंत्री करण्यास तीव्र विरोध केला. या काळात सीता सोरेन आणि कल्पना सोरेन यांच्यात जोरदार शाब्दिक युद्ध आणि आरोप-प्रत्यारोप झाले. त्यामुळे सीता सोरेन यांचे नाव मागे पडले आणि चम्पई सोरेन यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडली. त्यांचे मुख्यमंत्रिपद सहा महिनेही टिकले नाही, हा भाग वेगळा.



झामुमोत एकाकी पडल्यानंतर सीता सोरेन यांनी झामुमोचा राजीनामा देत भाजपात प्रवेश केला. भाजपाने त्यांना दुमका लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली, पण त्यात त्यांचा पराभव झाला.

चारा घोटाळ्यात तुरुंगात जायची वेळ आल्यानंतर लालूप्रसाद यादव यांनी पत्नी राबडीदेवी यांना मुख्यमंत्री केले. तसाच प्रयत्न हेमंत सोरेन यांनीही केला. पण, तो सीता सोरेन आणि झामुमोतील अन्य आमदारांनी हाणून पाडला. त्यामुळे नाईलाज म्हणून चम्पई सोरेन यांचे नाव पुढे आले आणि ते पर्यायी मुख्यमंत्री ठरले.

चम्पई यांचे आडनाव सोरेन असले तरी, शिबू सोरेन परिवाराशी त्यांचा कोणताच नातेसंबध नाही. शिबू सोरेन यांचे विश्वासू सहकारी अशी त्यांची झामुमोत प्रतिमा होती. औटघटकेचे मुख्यमंत्रिपद सांभाळल्यानंतर हेमंत सोरेन यांचा मार्ग मोकळा करण्यासाठी चम्पई सोरेन यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यामुळे दुखावल्या गेलेले चम्पई सोरेन यांनीही नंतर भाजपात प्रवेश केला. ◂(तभा वृत्तसेवा)

# महाराष्ट्राला हवे महापरिवर्तन : खडगे

**◆ नवी दिल्ली, २१ ऑक्टोबर**

महायुती सरकारवर महाराष्ट्रातील शेतकरी नाराज आहेत. या सरकारकडून त्यांना न्याय मिळण्याची शक्यता अतिशय कमी असून, शेतकरी आणि राज्यातील सर्वसामान्य जनतेला आता महापरिवर्तन हवे आहे, असे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी सोमवारी सांगितले.

'एक्स' या समाजमाध्यमावर हिंदीत पोस्ट करीत खडगे यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या मुद्यावरून भाजपावर टीका केली. राज्याला दुष्काळमुक्त करण्याचे भाजपाचे दिलेले वचन हे केवळ एक जुमला होते, असा आरोप खडगे यांनी केला.

भाजपा शेतकऱ्यांचा सर्वांत मोठा शत्रू आहे. महायुती सरकारच्या काळात राज्यात २० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. कृषी क्षेत्राच्या निधीतही मोठी कपात करण्यात आली आहे. भाजपाने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे दिलेले वचनही फसवे निघाले. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे वचनही या पक्षाने पाळले नाही, असे खडगे यांनी 'एक्स'वर म्हटले आहे.

कांदा आणि सोयाबीन उत्पादकांवर निर्यात शुल्क लादून आणि आयातबंदीच्या माध्यमातून भाजपाने त्यांचा त्रास आणखी वाढविला आहे. महायुतीचे सरकार सत्तेबाहेर केल्याशिवाय आपल्या समस्या दूर होणार नाही, याची खात्री शेतकऱ्यांना झाली असून, यासाठी ते राज्यात महापरिवर्तन आणण्याच्या तयारीत आहेत, असा दावाही खडगे यांनी केला. ◂(वृत्तसंस्था)

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## यमगरवाडीत विद्यार्थ्यांना ब्लँकेटचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -**
अशोक संकलेचा आणि लॉयन्स क्लब ऑफ सोलापूरच्या पदाधिकाऱ्यांनी सकाळी १०:३० वाजता शाळेस भेट दिली. यावेळी त्यांना मगर यांनी शाळेत चालणारे सर्व विभाग दाखवले.



यामध्ये ग्रंथालय, भाषा गणित प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा व विज्ञान केंद्र, क्रीडा विभागातील मुलांनी अतिशय उत्तमप्रकारे माहिती सांगितली. वसतिगृहातील मुलींनी वंशी आणि नियुद्धचे प्रात्यक्षिक सादर केले.

सभागृहात छोटासा कार्यक्रम सादर करून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. फुलाजी ततिकुंडलावांर यांनी शाळेची पूर्ण माहिती सुरुवातीपासून सांगितली. मुलींनी सामूहिक पद्य सादर केले.

प्रमुख पाहुण्यांनी मुलांना मार्गदर्शन केले.सोलापूर येथील संगमेश्वर रघोजी यांनी त्यांच्या पिताश्रीच्या पुण्यतिथीनिमित्त ५० ब्लँकेट आणि मिठाई वाटप केली.

संगीता पाचांगे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मगर यांनी केले. कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



### होर्टी येथे ५ योजनांची मोफत नोंदणी

**जळकोट, दि.२२ ऑक्टोबर -**
तुळजापूर तालुक्यातील होर्टी येथे ग्राम पंचायत कार्यालयात टाटा एआयजी, बेंगलोर व धाराशिव येथील एनएमपी पल्स व दत्ता भोसले मित्र मंडळ, होर्टी यांच्या संयुक्त विद्यमाने आयुष्यमान भारत योजना, ई-श्रम योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना व प्रधानमंत्री सुरक्षा योजना अशा विविध योजनेची मोफत नोंदणी करण्यात आली. यावेळी ज्ञानेश्वर भोसले, प्रसाद भोसले, दत्ता भोसले, गणेश खराडे, संजय गुंजोटे, पद्माकर भोसले, अंकुश भोसले, चैतन्य सगर तसेच संस्थेचे समन्वयक आकाश नालेगावकर, अलिम शेख, महादेव ढगे, साजिदा शेख व दत्ता भोसले मित्र मंडळाचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. या शिबीरात तब्बल ४६७ गावकऱ्यांनी या योजनेचा मोफत लाभ घेतला. यावेळी दत्ता भोसले मित्र मंडळाच्यावतीने गावात जनजागृती करण्यात आली.

### राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभांगी नन्नवरे हिची निवड

**तुळजापूर, दि.२२ ऑक्टोबर -**
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर या ठिकाणी आयोजित केलेल्या विभागीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात मुलींमध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हायस्कूल ची विद्यार्थिनी शुभांगी लिंबराज नन्नवरे हिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. स्पर्धेत लातूर, नांदेड, धाराशिव या जिल्ह्यातून ७० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेसाठी तिला सॉफ्ट टेनिस मार्गदर्शक, विद्यालयाचे मुख्याध्यापक पर्यवेक्षक, शिक्षक शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### रुद्रवाडी शाळेत हात धुवा दिन उत्साहात साजरा

**लोहारा, दि.२२ ऑक्टोबर -**
जागतिक धुवा दिनाचे औचित्य साधून लोहारा तालुक्यातील रुद्रवाडी येथील जि.प.प्रा. शाळेत विद्यार्थ्यांच्या अंगी स्वच्छतेच्या सवयी लागाव्यात, विद्यार्थ्यांना आपल्या शरीराची समज व शरीर संवर्धनाचे महत्व आणि आरोग्याची काळजी घेण्यासाठी जागतिक हात धुवा दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना शारीरिक स्वच्छतेचे महत्त्व, आरोग्याच्या चांगल्या सवयी, ज्ञानेंद्रिया ओळख व आपल्या संपूर्ण शरीराविषयी सखोल माहिती शाळेचे मुख्याध्यापक गोविंद घारगे सरांनी माहिती दिली. हात धुण्याच्या विविध पद्धती विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आल्या. यावेळी एक बडबड गीत सादर करून विद्यार्थ्यांना मनोरंजनात्मक पद्धतीने हात धुवा व आपल्या आरोग्याच्या चांगल्या सवयी समजावून सांगण्यात आल्या. हात धुण्यासाठी वापरण्यात येणारे विविध साधने, पाणी यांचा उपयोग सांगण्यात आला. यावेळी गावातील अंगणवाडीताई, उमेदच्या कार्यकर्ती तसेच महिला वर्ग उपस्थित होता.

### कळंब काँग्रेस कमिटीची बैठक संपन्न

**कळंब, दि.२२ ऑक्टोबर -**
काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना महाविकास आघाडीचा जो उमेदवार असेल त्याच्यासाठी पुर्ण ताकतीने कामाला लागावे असे आवाहन काँग्रेसचे जिल्हा संघटक राजाभाऊ शेरखाने यांनी कळंब तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीच्या आयोजित बैठकीत केले आहे. हि बैठक शहरातील रंगीला चौक येथे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष पांडुरंग कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीसाठी जिल्हा संघटक राजभाऊ शेरखाने, तालुकाध्यक्ष पांडुरंग कुंभार, ज्योती सपाटे, रवींद्र ओझा, अक्षय निरफळ, अँड. दिलीपसिंह देशमुख, बाबुराव तवले, दौलतराव माने, हरीभाऊ कुंभार, कदम आदि उपस्थित होते.

## राज्यातील पहिल्या बसवश्रुष्टीचे नळदुर्ग येथे स्तंभ पुजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ ऑक्टोबर -**
नळदुर्ग येथे उभारण्यात येत असलेल्या भव्य, दिव्य अशा राज्यातील पहिल्या बसवश्रुष्टीच्या पहिल्या टप्प्याचा स्तंभ पुजनाचा कार्यक्रम दि.२२ ऑक्टोबर रोजी नळदुर्ग येथील गोलाई चौकात मोठ्या उत्साहात व शेकडो वीरशैव समाज बांधव व इतर नागरीकांच्या उपस्थितीत पार पडला.

आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या अथक प्रयत्नानंतर राज्य सरकारने नळदुर्ग येथे भव्य अशी बसवश्रुष्टी उभारण्यास मान्यता दिली आहे. यासाठी लागणारी जमीन व निधी राज्यसरकारकडुन उपलब्ध झाला आहे. या बसवसृष्टीमुळे ऐतिहासिक नळदुर्ग शहराच्या सौंदर्यात मोठी भर पडणार आहे. त्याचबरोबर याठिकाणी उभारण्यात येणारी भव्य, दिव्य बसवसृष्टी ही राज्यातील पहिली बसवसृष्टी आहे. त्यामुळे तालुक्यातील वीरशैव समाज बांधवानी समाधान व्यक्त केले आहे.

बसवसृष्टी उभारण्याच्या कामाचा पहिला टप्पा म्हणुन नळदुर्ग येथील गोलाई चौकात दि.२२ ऑक्टोबर रोजी स्तंभ पुजनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. प्रारंभी आ. पाटील यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यानंतर वीरशैव समाज बांधवांच्या हस्ते स्तंभ पुजन करण्यात आले.



कार्यक्रमास सुशांत भुमकर, संजय बताले, बसवराज धरणे, नय्यर जहागिरदार, शफीभाई शेख, दत्तात्रय कोरे, सुधीर हजारे, अँड. आशिष सोनटक्के, संजय जाधव यांच्यासह नळदुर्ग, लोहगाव, खुदावाडी, अणदुर, होर्टी, सिंदगाव, बोळेगाव, खानापुर यासह परीसरातील गावांतील नागरीक उपस्थित होते.

## उघड्या ट्रान्सफॉर्मरमुळे नागरिकांच्या जिवास धोका

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२२ ऑक्टोबर -**
वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील गावाला वीज पुरवठा करणाऱ्या ट्रान्सफॉर्मरची मोठी दुरवस्था झाली आहे. हा ट्रान्सफॉर्मर राष्ट्रीय महामार्ग सर्विसरोडच्या कडेला नागरीवस्तीमध्ये आहे. ट्रान्सफॉर्मरच्या सर्व वायर, तारा, फिउज उघड्या असल्यामुळे नागरिकांच्या जिवास धोका निर्माण झाला आहे. ट्रान्सफॉर्मर जवळ गवत तसेच झाडेझुडपे वाढली आहेत. यामुळे विद्युत धक्का बसून एकाद्याचा जीव जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच तेरखेडा गावात मुख्य रस्त्यावर काही ठिकाणी विद्युत तारा लोंबकळत असून गावातील



वीजपुरवठा खंडित झाल्यास अनेक तास गावकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे गावातील नागरिकांनी प्रचंड संताप व्यक्त केला आहे.

महावितरणचे संबंधित अधिकारी तसेच वायरमन यांच्याकडून फारसे याकडे लक्ष दिले जात नसल्याचे दिसून येते. गावात अनेक ट्रान्सफॉर्मर आहेत.

सर्वांची परिस्थिती सारखीच असल्याचे सांगितले जाते. यावरून महावितरणचा भोंगळ कारभार समोर आला आहे. महावितरण कंपनीकडून पावसाळा सुरू होण्यापूर्वी वीज पुरवठा खंडित होऊ नये, तसेच दुर्घटना घडूनये म्हणून दरवर्षी गावागावातील विद्युत खांब उभे करणे, तुटलेल्या तारा दुरुस्ती करणे, ट्रान्सफॉर्मर बदलणे अशी मेंटेनन्स ची कामे ठेकेदाराकडून केली जातात. परंतु अधिकाऱ्यांच्या आणि ठेकेदारांच्या संगनमताने ही कामे न करता कागदावरच कामे दावत बिल लाटले जात आहेत, असेच म्हणावे.

आणखी किती दिवस नागरिकांच्या जिवासोबत हा खेळ सुरू राहील असा प्रश्न गावकरी विचारत आहेत. मात्र कुंभकर्णी झोपेत असलेले संबंधित अधिकारी यांना कधी जाग येणार.

## महाराष्ट्र खो-खो असोसिएशनची सोमवारी निवड चाचणी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -**
सोमवारी निवड चाचणी स्पर्धा महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व द उस्मानाबाद जिल्हा खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२७ ते ३० ऑक्टोंबर दरम्यान जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थाच्या मैदानावर ५० वी कुमार, मुली राज्य अजिंक्यपद स्पर्धा व निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेतून महाराष्ट्राचा कुमार, मुलीचा संघ निवडण्यात येणार आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी धाराशिव जिल्हा संघ निवड चाचणी स्पर्धा सोमवार दि.२१ ऑक्टोबर रोजी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था येथे आयोजित करण्यात आली आहे. ज्या खेळाडूंची जन्मतारीख २१ नोव्हेंबर किंवा त्यानंतर जन्मलेलेआहेत असे खेळाडू या स्पर्धेत पात्र आहेत.

तरी या खेळाडूंनी दुपारी ४ वाजता वयाचा दाखला घेवून उपस्थित राहावे. निवड समिती सदस्य म्हणून प्रविण बागल, प्रभाकर काळे, सौ रोहिणी सातपुते (आवारे) काम पाहणार आहेत तरी.

जास्तीत जास्त खेळाडूंनी निवड चाचणीस उपस्थित रहावे, असे आवाहन सचिव प्रविण बागल यांनी केले.

## विभागस्तरीय सॉफ्ट बॉल स्पर्धेत आरळी (बु) प्रशालेच्या मुलींचा संघ उपविजेता



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२२ ऑक्टोबर -**
विभाग स्तरीय सॉफ्ट बॉल स्पर्धा गुरुगोविंद सिंग स्टेडियम, नांदेड येथे पार पडल्या. त्यामध्ये जिल्हा परिषद प्रशाला आरळी बुद्रुक येथील १७ वर्षे वयोगटातील विद्यार्थिनीच्या संघाने द्वितीय स्थान पटकावत आपला दबदबा कायम ठेवला आहे. १७ वर्षे वयोगटातील मुलींचा संघ अंतिम सामन्यात उपविजेता ठरला. याबद्दल सर्व स्तरातून प्रशाला आरळी बु. च्या विद्यार्थिनींचे अभिनंदन होत आहे.

या संघामध्ये उत्कर्षा गोविंद पारवे, आग्रजा बनसोडे, स्वप्नाली लक्ष्मण पारवे, पूर्वा भोसले, चैत्राली भोसले, संस्कृती लक्ष्मण पारवे, करिष्मा काशिनाथ मोरे, अनिशा अंगद मिसाळ, अंजली मुसळे, भाग्यश्री कांबळे, श्रूतिका विटकर, अर्पिता निचळ, प्रियंका गाडे, पुनम गाडे, सुप्रिया बंडगर, कृतिका दरेकर या मुलींनी क्रीडा स्पर्धेत भाग घेतला. या मुलींना क्रीडा शिक्षक प्रकाश स्वामी व मुख्याध्यापक गौतम राठोड व शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल तुळजापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी अमोल ताकभाते, गटशिक्षणाधिकारी इनामदार तसेच तालुका क्रीडा अधिकारी अक्षय बिरादार, इसाक पटेल, राजेश बिलकुले, अनिल धोत्रे, संदीप गंगणे, विष्णू दळवी यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे.

तसेच आरळी बुद्रुक गावचे सरपंच किरण दादा व्हरकट, उपसरपंच संजय पाटील तसेच सर्व ग्रा.पं. सदस्य, प्रशाला आरळी बु. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मकरंद बामणकर उपाध्यक्ष किरण गायकवाड आणि सर्व सदस्य, सर्व पालक आणि नागरिक यांनी या सर्व विजेत्या विद्यार्थिनींचे कौतुक केले आहे.

## तुळजाभवानी मातेच्या मंदिरात दर्शनार्थ भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ ऑक्टोबर -**
श्री तुळजाभवानी दर्शनार्थ मंगळवारी दि.२२ रोजी प्रचंड गर्दी झाली होती. आज लाखभर भाविकांनी दर्शन घेतले.

मंगळवार पहाटे एक वाजल्या चरणतिर्थ होवुन धर्म दर्शनार्थ प्रारंभ झाला. पहाटे पासुन भाविकांचे यवेच्श्रीया थवे मंदीरात येत होते. आज मंदिर भाविकांनी भरुन गेले होते.

देवि दर्शनानंतर भाविकांनी बाजार पेठेत गर्दी केल्याने बाजार पेठ भाविकांनी गजबजुन गेली होती.

आज दर्शन रांगा भाविकांनी भरभरुन



वाहिल्या रात्री मंदीर प्रांगणात छबिना काढण्यात आला.



आज शहरात सर्वत्र वाहातुक कोंडी निर्माण झाल्याने याचा त्रास भाविकांना बसला.

## जयप्रकाश विद्यालयाच्या दोन खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -**
जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील दोन खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

२० ऑक्टोबर रोजी विभागीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुलन, लातूर येथे विभागीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले होते. यात कुमारी केवटे गायत्री गुरुलिंग या खेळाडूची राज्यस्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १३ ऑक्टोबर रोजी विभागीय हँडबॉल




स्पर्धा महात्मा फुले विद्यालय, अहमदपूर या ठिकाणी संपन्न झाल्या होत्या. या स्पर्धेत सतरा वर्ष वयोगटात मुलीच्या संघाने सहभाग नोंदवला होता.

त्यामध्ये कोळगे प्रज्ञा नेमिनाथ या विद्यार्थिनीची राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. डॉ. आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते केवटे गायत्री व प्रज्ञा कोळगे या खेळाडूंचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या यशस्वी खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रा. प्रशांत कोळगे, अश्विनकुमार पवार यांनी केले.

याप्रसंगी प्राचार्य जयप्रकाश कोळगे, पर्यवेक्षक के.ए. डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपास्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. प्रशांत कोळगे यांनी मानले.

## ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ टप्पा दोनमध्ये जि.प. हायस्कूल जिल्ह्यात द्वितीय





विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गेल्या पाच वर्षापासून केलेल्या कामाचे हे फळ आहे. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, केंद्रप्रमुख शिला मुदगडे, विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके, गटशिक्षण अधिकारी शिवकुमार बिराजदार यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे यश मिळाले आहे. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे हे फळ आहे. यापुढेही आम्ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणार आहोत.

**- पद्माकर मोरे, मुख्याध्यापक**



शाळेचे मुख्याध्यापक व माझ्या शाळेतील सर्व मेहनती शिक्षक, विद्यार्थ्यांसाठी पायाभूत सुविधा, शासनाच्या विविध योजना, आणि शैक्षणिक संपादनुकीसाठी केलेल्या विशेष प्रयत्नाचे हे यश आहे यासाठी तालुक्याचे आमदार ज्ञानराज चौगुले, युवा नेते किरण गायकवाड शाळेचे माजी विद्यार्थी उमरगा शहरातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यामुळे उमरगा शहरात ३२ शाळा असून ही माझ्या शाळेचा पट १ ली ते १० वी साडेचारशे पेक्षा जास्त आहे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नाचे हे यश आहे. मिळालेले यशापेक्षा माझ्या शाळेतील शिक्षकांचे कष्ट खूपच मोठे आहेत.

**- शकुंतला मोरे, अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२२ ऑक्टोबर -**
उमरगा येथील आयएसओ मानांकित व टोबॅको फ्री जिल्हा परिषद हायस्कूल ला ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ अभियान टप्पा दोनमध्ये धाराशिव जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळाला आणि शाळेला पाच लाखाचे बक्षीस मिळाले शाळेने गेल्या वर्षी तालुक्यातील प्रथम क्रमांकाचे तीन लाखांचे बक्षीस मिळविले होते. पाच वर्षात केलेल्या शैक्षणिक प्रगतीमुळे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे यांचे मार्गदर्शन आणि सर्व शिक्षकांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याचे फळ मिळाले अशी प्रतिक्रिया मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी दिली.

विविध प्रकारचे चाकोरी बाहेरील शिक्षण. स्पर्धात्मक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक कृती निर्माण होऊन त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळावी व त्यांना खऱ्या अर्थाने बाहेरच्या जगाची ओळख व्हावी यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. शाळेने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांचे आरोग्य स्वच्छता पर्यावरण क्रीडा या विविध माध्यमातून शैक्षणिक संपादनुकीस महत्त्व दिलेले आहे. शाळेत विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्यासाठी पायाभूत सुविधा, सुसज्ज इमारत, अत्याधुनिक प्रयोगशाळा, भव्य क्रीडांगण, रनिंग ट्रॅक, अटल टिंगरिंग लब उच्च दर्जाच्या वर्ग खोल्या, शालेय ग्रंथालय, वाचन कोपरे, सुंदर कार्यालय, पाच हजार वृक्षाची लागवड करून तयार झालेले मियावाकी जंगल निर्मितीमुळे हिरवागार परिसर, इको क्लब निर्मिती, खेळाचे भव्य क्रीडांगण, आकर्षक इमारत व रंगरंगोटी, उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे, सेंद्रिय परसबाग निर्मिती, तंबाखू मुक्त शाळा, शासन स्तरावरील ध्येय धोरणांची अंमलबजावणी, गांडूळ खत निर्मिती प्रकल्प, जल पुनर्भरण प्रकल्प, विविध विद्यार्थी लाभाच्या शिष्यवृत्तीचा विद्यार्थ्यांना लाभ, अनेक समित्यांची प्रभावी अंमलबजावणी, दहा लाख रुपये लोकवाटा जमा माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य, समग्र प्रगती पुस्तक एचपीसीची प्रभावी अंमलबजावणी, साक्षरता कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी आदी उपक्रमांमध्ये या शाळेने उत्कृष्ट कार्य केलेले आहे.

मुलींची गळती थांबवण्यासाठी मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांची नाविन्यपूर्ण सायकल बँक, तीस अनाथ विद्यार्थी दत्तक पालक योजना, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी दानशूर पालकांनी चालू केलेला गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा लाटी-काटी राज्यस्तरीय स्पर्धेत व रंगोत्सव सेलिब्रेशन मुंबईतर्फे आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत १९ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल यामुळे ही शाळा अनेक नामांकित संस्थेच्या यादीत ही अग्रक्रमाने ओळखले जाते. शाळेच्या या यशात उमरगा-लोहारा तालुक्याचे आ. ज्ञानराज चौगुले, युवा नेते किरण गायकवाड, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, शिक्षणतज्ञ सदानंद शिंदे, अशोक पतगे, शंकर सुरवसे, अमर वरवटे, किसन खंडागळे, शाळेचे माजी विद्यार्थी, पालक व उमरगा शहरातील दानशूर व्यक्तींचे मोलाचे सहकार्य लाभले.

तंत्रस्नेही शिक्षक संजय रूपाजी, विद्यानंद सूत्रावे, धनराज तेलंग, बशीर शेख, सरिता उपासे, शिल्पा चंदनशिवे, ममता गायकवाड, सोनाली मुसळे, सदानंद कुंभार, सुनिता राठोड वनमाला वाले नारायण अंकुशे या सर्व शिक्षकांच्या परिश्रमामुळे हे यश प्राप्त झाले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कृष्णा वडजकरचे यश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ ऑक्टोबर**

राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेमध्ये १९ वर्षाखालील मुलाच्या कुस्ती स्पर्धेमध्ये कृष्णा मनोज वडजकर याने द्वितीय पारितोषिक जिंकून घवघवीत यश प्राप्त केले आहे.

राज्यस्तरीय शालेय स्पर्धांचे आयोजन अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी येथे करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेतील ग्रीको रोमन प्रकारामध्ये १९ वर्षीय वयोगटाच्या कुस्ती स्पर्धेमध्ये बरबडा येथील जवाहरलाल नेहरू विद्यालयाचा विद्यार्थी कृष्णा मनोज वडजकर याने ६७ किलो वजनी गटामध्ये द्वितीय पारितोषिक पटकावले आहे. कृष्णा वडजकर नांदेड येथील नावघाट परिसरातील समर्थ व्यायाम शाळा व महानगरपालिका संचलित स्व. भुजंगसिंघ गाडीवाले कुस्ती आखाडा येथे जगतसिंघ गाडीवाले व रविकिरण डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी बरबडेकर, उपाध्यक्ष सदाशिवराव धर्माधिकारी, सहसचिव सुदर्शन धर्माधिकारी, क्रीडा शिक्षक कैलास पवार, बारी पटेल खुरगावकर, यांनी कौतुक केले आहे. त्यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# आदमपूर परिसरात अवकाळी पाऊस

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. २२ ऑक्टोबर**

मौजे आदमपूर,(ता. बिलोली) परिसरात दि.२० ऑक्टोबर च्या मध्य रात्रीपासून विजेच्या कडकडाटसह जोरदार पावसाला सुरूवात झाली.त्यानंतर दिवसाही दुपारनंतर रिमझिम पाऊस कोसळत होता. रानाशिवारात मशागत,कचरा वेचणी कामाची धांदलही शेतकरीवर्गात सुरू होती. पावसामुळे काही काळ रात्री विजेचा लपंडाव सुरू होता. मग पाऊस आणि विजेमुळे पुन्हा वातावरणात प्रचंड उकाडा निर्माण झालेला होता. गर्जणारा कडकडाट आसमंतीचा आवाज भितीदायक असाच होता. दिवसाही लाईट गूल होत होती. परतीचा पाऊस जाता जाता विश्रांती घेऊन गेला खरा, मात्र अवकाळीचा चांगलाच परिसरात पाऊस बरसत होता. त्यामुळे परिसरातील बहरलेल्या तूर पिकास आणि आगामी हरभरा, रब्बी, करडी पेरणीस एकंदरीत हा पाऊस पोषक असाच ठरेल अशी शेतकरीवर्गात चर्चाही ऐकायला मिळत होती. काही ठिकाणी तुरळक शेतकरी रब्बी हंगामाची पेरणी केल्याचेही चित्र पहायला मिळाले. सायंकाळी या रिमझिम पावसाने वातावरणात पुन्हा गारवा निर्माण झाला होता. आदमपूर परिसरातल्या ओहोळात काही प्रमाणात सुसाट पाणी धावत होते.

# असंख्य युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ ऑक्टोबर**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या विचाराने प्रभावित होऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षात नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण व शहरी भागातील अनेक युवकांनी ग्रामीण युवक जिल्हाध्यक्ष धनंजय सूर्यवंशी यांच्या नेतृत्त्वाखाली व जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील कदम यांच्या अध्यक्षतेखाली पक्ष कार्यालयात संपन्न झालेल्या बैठकीत शेकडो कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला.

पक्ष कार्यालयात संपन्न झालेल्या पक्षप्रवेश सोहळा कार्यक्रमामध्ये पक्ष प्रवेश करणारे नांदेड उत्तर मधील पिंपरी म. ग्रामपंचायतचे सदस्य कमलेश पाटील कदम, मोहन पाटील शिंदे, अविनाश पाटील शिंदे, चांदोजी शेजुळे, राम कदम, संतोष सवराते, आनंदराव कदम, ज्ञानेश्वर कदम, सुनील धुमाळ, संकेत इंगोले, सोपान धुमाळ, तुकाराम धुमाळ, शरद कदम, माधव शिंदे, धुराजी कदम, दशरथ कदम, आत्माराम कदम, पवन कदम, करण कदम, गोविंद कदम यांच्यासह त्यांच्या असंख्य सहकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील कदम हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी युवक काँग्रेस ग्रामीण जिल्हाध्यक्ष धनंजय सूर्यवंशी, शहर जिल्हा सरचिटणीस गणेशअण्णा तादलापूरकर, प्रदेश सचिव रा.यू.काँ. दशरथ कदम, उत्तर विधानसभा कार्याध्यक्ष जयेंद्र पाटील, शहर जिल्हा चिटणीस शेख हाजी, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष दिगांबर गवळे, कृ.उ.बा.स. संचालक नानासाहेब पोहोरे, गंगाधर कदम, जिल्हा सरचिटणीस गणेश आरसुळे, जिल्हा संघटक सचिव तुकाराम सूर्यवंशी, जिल्हा सचिव कैलास कदम, जिल्हा उपाध्यक्ष संभाजी पाटील, विशाल पोफळे, उत्तर तालुकाध्यक्ष अंबादास जोगदंड, दक्षिण तालुकाध्यक्ष पांडुरंग क्षीरसागर, जिल्हा सचिव शेख फिरोज, भोकर विधानसभा कार्याध्यक्ष चक्रधर कळणे, अर्धापूर तालुका अध्यक्ष गजानन लढे, संदीप सूर्यवंशी, नितीन धुमाळ, कामन पाटील, ज्ञानेश्वर कदम, रवी पाटील, गजानन गोरख आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना डॉ. सुनील कदम व धनंजय सूर्यवंशी यांनी मार्गदर्शनपर भाषणे केली.

# दाक्षिणात्य अभिनेत्री शान्वी श्रीवास्तव मराठीत 'रानटी' चित्रपटात दिसणार मध्यवर्ती भूमिकेत

समित कक्कड दिग्दर्शित 'रानटी' या आगामी मराठी चित्रपटाची मागील काही दिवसांपासून जोरदार चर्चा सुरू आहे. या चित्रपटातून दाक्षिणात्य अभिनेत्री आणि मॉडेल शान्वी श्रीवास्तव मराठी रुपेरी पडद्यावर पदार्पण करते आहे. या चित्रपटातील तिच्या भूमिकेचं पोस्टर नुकतंच प्रदर्शित करण्यात आलं आहे. पुनीत बालन स्टुडिओ निर्मित आणि समित कक्कड दिग्दर्शित 'रानटी' हा मराठीतला सगळ्यात मोठा ॲक्शनपट २२ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

शान्वी श्रीवास्तव हिने दाक्षिणात्य चित्रपटांच्या दुनियेत चांगलंच नाव कमवलं आहे. शान्वीने २०१२ मध्ये तेलुगू चित्रपट लव्हली द्वारे रुपेरी पडद्यावर पदार्पण केले होते.'अड्डा','प्यार में पडीपोयने','भले जोडी','मुफ्ती','चंद्रलेखा' यासारख्या दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये ती झळकली आहे. 'रानटी' चित्रपटात मैथिली या महत्त्वाच्या भूमिकेत शान्वी दिसणार आहे. 'रानटी' या मराठी चित्रपटात काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल तिने आनंद व्यक्त केला. सोबतच दिग्दर्शक समित कक्कड सारख्या नावाजलेल्या दिग्दर्शकासोबत काम करण्याचा अनुभवही कमालीचा असल्याचा ती सांगते. या चित्रपटातून तगडी स्टारकास्ट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'रानटी' चित्रपटासाठी हृषिकेश कोळी यांचं लिखाण, अजित परब यांचं संगीत, अमर मोहिले यांचं पार्श्वसंगीत, एझाज गुलाब यांची साहस दृष्ये, सेतु श्रीराम यांचं छायाचित्रण, आशिष म्हात्रे यांचं संकलन अशी भक्कम तांत्रिक बाजू असलेली टीम चित्रपटाला लाभलेली आहे.

## योगेश पाटील यांचे निधन

**नांदेड**- देगलूर तालुक्यातील कुंमरपल्ली येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक योगेश पाटील यांचे निधन झाले. शाळा संमपऊन योगेश पाटील हे आपल्या मूळ दिनांक १७ तारखेला गावी गेले त्यावेळी होते ते अपगातात जखमी झाले होते. त्यांच्यावर बिदर येथील गुरुनानक इस्पितळात उपचार सुरू होते, उपचदरम्यान दि. २० ऑक्टोबर रोजी पहाटे वयाच्या ४८ व्या वर्षी त्यांची प्राणजोत मावळली.त्यांच्या मूळ गावी बादलगाव तालुका औराद जिल्हा बिदर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्याचा मित्र परिवार व आप्तेष्ट उपस्थित होते,त्यांच्या पश्चात पत्नी,मुलगा,मुलगी असा परिवार आहे,योगेश पाटील यांच्या अकाली निधनाने शिक्षक परिवारात शोक व्यक्त केली जातेय.पत्रकार कमलाकर बिरादार यांचे ते भावजी होत.

# किनवट विधानसभेसाठी मविआकडून राष्ट्रवादीचे (श.प.) प्रदीप नाईक यांना उमेदवारी घोषित

## फटाक्याची अतिषबाजी करत कार्यकर्त्यांचा जल्लोष, आता रंगणार केराम विरुद्ध नाईक अशी चुरशीची लढत

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २२ ऑक्टोबर**

:- कालपर्यंत महाविकास आघाडीकडून जागा वाटपात किनवट/माहूर विधानसभा मतदारसंघ आघाडीतील घटकपक्षापैकी नेमका कोणाच्या वाटेला जाणार म्हणून राजकीय वर्तुळात प्रचंड कयासासह उत्सुकता शिगेला पोहोचली होती.तिच गत तिकडे महायुतीकडे देखील होती.नावे घोषीत करण्यासाठी होत असलेल्या विलंबामुळे कहानी में कुछ तो टर्न,कुछ तो राऊंड जरुर है! और दोनो ओरसे तीसरा ट्विस्ट तो आयेगा आयेगा!असे डिकेक्टिव्ह ठोकताळे बांधले जात होते. परंतु,ना टर्न ना ट्विस्ट या सर्व शक्यता फोल ठरवत २० रोजी भाजपाकडून आ.भीमराव केराम तर आज किनवट विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श. प.) पक्षाकडून जाहीर करण्यात आलेल्या उमेदवारांच्या पहिल्या यादीत प्रदीप नाईक यांचे नाव जाहीर झाल्याने या दोघांचीही उमेदवारी बदलली जाणार या चर्चेला आज २१ रोजी अल्पविराम मिळाला असून,माहूर येथे महायुतीच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला. शेवटी निवडणुकीच्या निकालानंतचरच या मतदारसंघाचा जो जीता वही सीकंदर ठरणार आहे.

किनवट-८३ विधानसभा मतदार संघातून तब्बल पाचव्यांदा प्रदीप नाईक यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.प्रदीप नाईक यांनी सलग तीन टर्म अर्थातच १५ वर्ष या मतदार संघाचे प्रतिधित्व केले आहे.पक्षाचे सर्वेसर्वा खा.शरद पवार,प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पुन्हा एकदा मा.आ. प्रदीप नाईक यांच्यावर विश्वास दाखवून त्यांना उमेदवारी बहाल केली आहे.आज सोमवारी या बाबतची अधिकृत घोषणा होताच माहूर येथील डॉ.बाबा साहेब आंबेडकर चौकात कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष केला.

आता खरी चुरस निर्माण होणार असून, पारंपरिक नेहमीचे दोन तुल्यबळ आणि मातब्बर राजकीय प्रतिस्पर्धी किनवट विधानसभा निवडणुकीच्या मैदानात एकमेकांसोबत राजकीय लढाईत नशीब आजमावण्यासाठी रणांगणात उतरले असले तरी,शेवटी निवडणुकीच्या निकालानंतचरच या मतदारसंघाचा जनतेच्या मनातील राजा कोण ?यांचे उत्तर मिळणार आहे. अर्थात 'जो जीता वही सीकंदर' ठरणार आहे.

जल्लोष साजरा करण्यासाठी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष मेघराज जाधव, नगराध्यक्ष फिरोज दोसानी ,सभापती दत्तराव मोहिते,मनोज कीर्तने,अमित येवतिकर,भुसारे पाटील,सरपंच गणेश राठोड, सरपंच प्रफुल्ल भुसारे,रफिक सौदागर,इरफान सय्यद,आकाश कांबळे,सुमित खडसे,पवन चव्हाण, विनायकराव देशमुख,गुमान सिह चुंगडे,निसार कुरेशी,विक्रम राठोड, महेताब भाई,ऋषी खंदारे,राजू चव्हाण,नवनीत देवपुलवार,शिल्पकार वाठोरे,रतन जाधव,नबी सहाब यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# माजी सभापती बबन वाघमारे लढणार उत्तर मधून निवडणूक

## ओबीसी बहुजन आघाडी महायुतीसाठी ठरणार डोकेदुखी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ ऑक्टोबर**

नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातून ओबीसी बहुजन आघाडी च्या वतीने नांदेड पंचायत समितीचे माजी सभापती प्रतिनिधी बबन वाघमारे हे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. बबन वाघमारे यांची उमेदवारी महायुतीसाठी डोकेदुखी ठरणारे असल्याचे चर्चा सुरू आहे.

नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघांमध्ये उमेदवारीसाठी अनेक पक्षाकडून अनेक उमेदवार इच्छुक आहेत. महायुती कडून आ. बालाजीराव कल्याणकर यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे तर महाविकास आघाडी कडून अद्यापही उमेदवार निश्चित झाला नाही. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये सत्तेसाठी रस्सीखेच सुरू असतानाच येथे ओबीसी बहुजन आघाडीच्या वतीने माजी सभापती बबन वाघमारे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत . नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात जवळजवळ ७० हजार ओबीसी मतदार असून यात धनगर, लिंगायत, कोळी , बंजारा , हटकर आदी समाज बांधवांचा समावेश आहे . बबन वाघमारे यांना उमेदवारी मिळाल्यास निश्चितपणे येथे महायुती समोर मोठे आव्हान निर्माण होणार असून नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीचे चित्र बदलणार आहे. त्यामुळे शोषित, पीडित, वंचितांचे न्याय हक्कासाठी आणि ओबीसी समाजाला सत्तेच्या दिशेने नेण्यासाठी आपण निवडणुकीच्या रिंगणात उतरत आहोत अशी माहिती बबन वाघमारे प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे. महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही राजकीय गटबंधनाणे ओबीसी समाजाचा केवळ सत्तेसाठी वापर करून घेतला प्रत्यक्षात ओबीसी समाजाचे हित केले नाही असा आरोपही त्यांनी केला आहे.

# मतदारसंघात आगमन होताच आ. केराम यांचे ठिकठिकाणी जंगी स्वागत

## विकासकार्य आणि जनतेच्या आशीर्वादाने माझा विजय निश्चितः आ. भीमराव केराम यांचा आशावाद

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २२ ऑक्टोबर**

भाजपाकडून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आमदार भीमराव यांचे २० सप्टेंबर रोजी नांदेडहुन किनवट मतदारसंघात आगमन होताच इस्लापूर, जलदरा, धानोरा,गोकुंदा व किनवट शहरातील चौका चौकात भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते व शेकडो नागरिकांनी फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करत जंगी स्वागत केले यावेळी आ. केराम यांनी क्रांतीसुर्य बिरसा मुंडा, छत्रपती शिवाजी महाराज महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर या राष्ट्रपुरुषांना अभिवादन केले.

अपेक्षेप्रमाणे किनवट विधानसभा मतदारसंघासाठी भारतीय जनता पक्षाने विद्यमान आमदार भीमराव केराम यांना उमेदवारी जाहीर केली आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर २० ऑक्टोबर रोजी नांदेड येथून त्यांचे किनवट मतदार संघात आगमन होताच इस्लापूर, जलधारा, धानोरा बोधडी,गोकुंदा येथील स्व. बाळासाहेब ठाकरे चौक तसेच किनवट शहरातील प्रत्येक चौकात भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व शेकडो कार्यकर्त्यांनी फटाक्यांची जोरदार आतिशबाजी करत भीमराव केराम यांचे जंगी स्वागत केले.

यावेळी त्यांनी राष्ट्रमाता जिजाऊ,पछत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले, भगवान बिरसा मुंडा व डॉ बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांना अभिवादन केले.

पक्षश्रेष्ठींचा आशीर्वाद व विकास कार्यामुळे किनवट माहूर तालुक्यातील जनतेचे माझ्यावर अतोनात प्रेम आहे. आमदार म्हणून मी केलेल्या विकास कार्याच्या बळावर येथील जनता पुन्हा एकदा मला सेवा करण्याची संधी देतील याबद्दल माझ्या मनात तीळमात्र शंका नाही अशा भावना आ. केराम यांनी व्यक्त केल्या असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे यांच्यासह केंद्रीय नेत्यांचे त्यांनी आभार मानले आहेत.

# गंगापूर विधानसभा भाजपचे प्रशांत बंब एक लाख मताधिक्याने निवडून येणार

## जिल्हा महामंत्री ज्योती गायकवाड यांचा विश्वास



तभा वृत्तसेवा
गंगापूर दि.२२ ऑक्टोबर:

वाळूज येथील ग्रामोदय कार्यालयात ( दि.२१ ) राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयीन अनुलोम प्रकल्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सुजाता मराठे मराठवाडा उपविभागीय अधिकारी अजितकुमार मुळजे, जिल्हाप्रमुख सुरेशजीं इच्छे भाजपाचे जिल्हा महामंत्री ज्योती गायकवाड, स्थानमित्र अशोक जाधव, विधानसभा संयोजक सेवा प्रकोष्ठ अविनाश गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध योजनांचा व शासकीय कार्यप्रणाली चा आढावा घेण्यात आला श्रीमती सुजाता ताई मराठे यांच्या अध्यक्षतेखाली हि बैठक संपन्न झाली. अनुलोम चे श्रीकांत देसाई, अश्विनी शिंदे, आकाश राठोड, अजय पाटील, लक्ष्मण भरड पाटील, संदीप पाटील, श्रीराम बोचरे,कारभारी आरगडे,रमा सुरडकर, स्वाती पाटील, वाल्मिक पाटील, कृष्णा काथार,रावसाहेब भालेराव, सुवर्णा गायकवाड अलका उबाळे, जैतूनबी पठाण, शंमोबी शेख, सुनंदा सोनवणे, श्रीमती घोरपडे, ज्योती जाधव,आदींसह वस्तीमित्र, स्थानमित्र, प्रभाशाली नागरिक, जनसेवक, सामाजिक कार्यकर्ते, महिला समूह मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश गायकवाड यांनी केले तर सर्वांचे आभार श्रीकांत पाटील यांनी मानले.

## आमदार केराम यांना दुसऱ्यांदा भाजपाकडून उमेदवारी जाहीर

# केराम दुसऱ्यांदा निवडून आल्यास मंत्री पदाची शक्यताः महेंद्र वैष्णव

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २२ ऑक्टोबर**

: महाराष्ट्रात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाकडून आज रविवार २० ऑक्टोबर रोजी दुपारी आपल्या ९९ उमेदवारांची प्रथम यादी जाहीर करण्यात आली.त्यात किनवट/ माहूर विधानसभेसाठी महायुतीतील प्रमुख घटक पक्ष भाजपाच्या वतीने विद्यमान आ.भीमराव केराम यांना अपेक्षेप्रमाणे दुसऱ्यांदा उमेदवारी जाहीर झाली. ्भाजपाच्या राष्ट्रीय संघटनेकडून छत्तीसगड येथून प्रवासी प्रचारक म्हणून जबाबदारीवर आज माहूर येथे आलेले महेंद्र वैष्णव यांच्या प्रमुख उपस्थितीत माहूर भाजपातर्फे फटाक्यांची आतिषबाजी करत एकमेकांना पेढे भरवत कार्यकर्त्यांनी आनंद साजरा केला. राज्यात जास्तीत जास्त महायुतीचे उमेदवार निवडून आणून बहुमताने. सरकार स्थापन करण्यासाठी किननवट विधानसभा निवडणुकीत आ.केराम यांना दुसऱ्यांदा विजयी केल्यास त्यांना या आदिवासी बहुल मतदारसंघातून आदिवासी विकास मंत्री किंवा एखाद्या इतर खात्याचे मंत्री बनण्याची सुवर्ण संधी नक्कीच उपलब्ध होऊ शकेल!असे विश्वासपूर्ण सूचक वक्तव्य वैष्णव यांनी यावेळी बोलताना केले.

मतदारसंघात डझनावर इच्छुकांनी भारतीय जनता पक्षाकडे उमेदवारी मागितली होती.किनवट माहुर मतदारसंघात पक्षातर्फे करण्यात आलेल्या सर्वेक्षणात किनवट माहुर मतदारसंघातील मतदारांनी आमदार भीमराव केराम यांना प्रथम पसंती दिली, तसेच त्यांनी मतदारसंघात केलेल्या विकासकामांची दखल घेऊन त्यांना दुसऱ्यांदा विधानसभेची उमेदवारी जाहीर केली.त्याबदल् माहुर भाजपातर्फे तालुका अध्यक्ष श्रीकांत घोडेकर यांच्या नेतृत्वात तर छत्तीसगड येथील किनवट माहुर विधानसभा प्रवासी प्रचारक महेंद्र वैष्णव यांच्या प्रमुख उपस्थितीत फटाक्यांची आतिषबाजी करत पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला. केराम यांच्या उमेदवारीने मतदारसंघात नवचैतन्य निर्माण झाले असून,अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करुन विजयासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपा नेते अनिल वाघमारे, नगरसेवक गोपु महामुने,जेष्ठ कार्यकर्ते विजय आमले, नंदकुमार जोशी, ज्योतीराम राठोड, निळकंठ मस्के, महीला शहराध्यक्षा निर्मला जोशी, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष जीवन अग्रवाल,युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष विनायक मुसळे,नंदु कोलपवार, पत्रकार बजरंगसिंह हजारी,अनुदीप कोरटकर,संत सेवालाल तांडा वस्ती सूधार योजनेचे सदस्य मनिष राठोड, कैलास फड, रामकृष्ण केंद्रे , शामराव कुमरे, अशोक जोशी, मनोज पुरी,निलेश तायडे यांचेसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# १० जानेवारी पासून रंगणार मनोरंजन आणि संगीताचा एक अद्भुद संगम, संगीत मानापमान प्रेक्षकांच्या बेतीला

छत्रपती संभाजीनगर - जिओ स्टुडिओज आणि सुबोध भावे यांचा बहुप्रतिक्षित संगीतमय चित्रपट संगीत मानापमान १० जानेवारी २०२५ ला प्रदर्शित होणार असल्याची बातमी आज विजयादशमीचे औचित्य साधून जिओ स्टुडिओज् ने दिली आहे. सोशल मीडियावर चित्रपटाचे पोस्टर रिलीज करण्यात आले असून सुबोध भावे बरोबर सुमित राघवन आणि वैदेही परशुरामी ही त्रयी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. प्रेम, वीरता, शौर्य यांची गुंफण असलेले संगीत मानापमान नवीन वर्षात प्रेक्षकांसाठी एक मनोरंजनाची अविस्मरणीय भेट ठरणार आहे. चित्रपटा बद्दल बोलताना सुबोध भावे म्हणाले , संगीत मानापमान या मराठीतल्या एका अत्यंत अभिजात अशा नाट्यकृती वरती काम करायला मिळणं हे खरोखर भाग्याची गोष्ट आहे. बालगंधर्व चित्रपटात बालगंधर्वची भूमिका करत असताना मानापमान या नाटकाशी संबंध आला, पण कधी तरी आपण त्याच्यावरती सिनेमा करू असा वाटलं हि नव्हतं. पण मधल्या काळात कट्यार नंतर नवीन चित्रपटाची आखणी करताना सगळ्यात भावलं ते म्हणजे मानापमानची प्रेम कथा तसेच गोविंदराव टेंबेसारख्या दिग्गज अशा संगीतकाराने संगीतबद्ध केलेली गाणी ज्याची इतक्या वर्षानंतर ही गोडी तशीच आहे. बालगंधर्व असतील केशवराव भोसले असतील, दीनानाथ मंगेशकर असतील अशा दिग्गज नेत्यांचा स्पर्श, खडीलकरांची लेखनी असं एक वेग वेगळ्या अंगाने नटलेल्या नाटका वरती प्रेरित असा सिनेमा घडवताना तितक्याच तोलामोलाची मंडळी आजूबाजूला हवी होती.

या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि प्रमुख भूमिका सुबोध भावे करणार असून, 'कट्यार काळजात घुसली' तसंच 'आणि डॉ. काशिनाथ घाणेकर' या चित्रपटाची संपूर्ण तांत्रिक टीम ह्या चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकदा एकत्र येत आहे त्याचबरोबर मुख्य म्हणजे प्रसिध्द संगीतकार शंकर -एहसान - लॉय यांचे संगीत या चित्रपटासाठी असणार आहे.

जिओ स्टुडिओज प्रस्तुत, निर्माती ज्योती देशपांडे निर्मित, श्री गणेश मार्केटिंग निर्मित, सुबोध भावे दिग्दर्शित आणि अभिनित, संगीत मानापमान ह्या संगीतमय चित्रपटात वैदेही परशुरामी, सुमित राघवन सोबत आणखी काही दिग्गज कलाकार असणार आहेत.

# शिवसेना उपनेते तथा विधानपरिषद सदस्य हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली; माहूर तालुका युवासेना संवाद मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २२ ऑक्टोबर**

: विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली माहूर येथे तालुका युवासेना संघटनेची मजबुत बांधणी करण्यासाठी माहूर तालुका संवाद दौरा दिनांक १९ ऑक्टोबर रोजी शिवसेना उपनेते तथा विधानपरिषद सदस्य,अध्यक्ष (मंत्री दर्जा महाराष्ट्र राज्य) स्व.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन केंद्र व प्रशिक्षण केंद्र.ना.हेमंत पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडला.

यावेळी माहूर येथील युवा कार्यकर्ते युवकांचे आशास्थान पत्रकार विजयसिंह बजरंगसिंह हजारी यांनी शिवसेना उपनेते तथा विधानपरिषद सदस्य ना.हेमंत पाटील यांच्या उपस्थितीत शिवसेना (एशिं) पक्षात जाहीर प्रवेश केला.यावेळी विजयराणा यांची शिवसेनेचे माहूर युवासेना शहर प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली.या नियुक्तीचे ना.हेमंत पाटील यांच्यासह अनेक मान्यवर पदाधिकारी,कार्यकर्ते व मित्रमंडळींनी अभिनंदन करत पुढील राजकीय वाटचालीसाठी राणा यांना शुभेच्छा दिल्या आहेत. सायंकाळी ७ वाजता सुरू झालेला संवाद मेळावा मुसळधार पावसामुळे झालेल्या बत्तीगुल नंतरही झंझावाती जोशाने उशीरापर्यंत सुरू होता. यावेळी युवासेना जिल्हा प्रमुख संदेश पाटील हाडसणीकर,महीला आघाडी जिल्हा प्रमुख शितलताई भांगे पाटील, सचिन किसवे, डॉ.नाईक,शिवसेना तालुका प्रमुख सुदर्शन नाईक, शिवसेना शहर प्रमुख किनवट सुरज सातुरवार, जेष्ठ शिवसैनिक मनोज आन्ना तिरमनवार,शिवसेना शहर प्रमुख माहूर विकास कपाटे,शिवसेना महीला आघाडी विधानसभा संघटक भारतीताई पवार,शिवसेना महिला आघाडी तालूका प्रमुख ज्योतीताई टिपकर,शिवसेना विधानसभा संघटक हिरासिंग चव्हाण,शिवसेना विधानसभा संघटक संतोष दुबे, शिवसेना तालूका समनवयक संजय जोशी,शिवसेना तालूका संघटक विनोद सुर्यवंशी पाटील, शिवसेना उपशहर प्रमुख पवण शर्मा, जेष्ठ शिवसैनिक विलास टिपकर, अरविंद जयस्वाल,ऑटो युनियन कैलास जाधव,शिवसेना सोशल मिडीया प्रमुख सदानंद पुरी,युवासेना उपजिल्हा प्रमुख ज्ञानेश्वर गुजल्लवाड,युवासेना तालूका प्रमुख सोनु चौधरी,युवासेना उपतालूका प्रमुख समाधान जाधव, युवासेना उपतालूका प्रमुख आदर्श आडे, युवासेना तालूका संघटक लखन राठोड,युवासेना शहर प्रमुख विजयराना हजारी, युवासेना उपशहर प्रमुख यांच्या सह शिवसेनेचे युवासेनेचे सर्व पदाधिकारी व शिवसेना युवासेना सर्व शाखा प्रमुख उपशाखा प्रमुख,सर्कल प्रमुख,विभाग प्रमुख, व सर्व शिवसेना युवासेना कार्यकरते मोठ्या संखेने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी तालुका उपाध्यक्ष पत्रकार हजारी यांची भाजपमध्ये घरवापसी

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २२ ऑक्टोबर**

:- राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी माहूर तालुका उपाध्यक्ष तथा पत्रकार बजरंगसिंह रामसिंह हजारी यांची तब्बल २० वर्षांनंतर भारतीय जनता पक्षात अखेर घरवापसी झाली.

भाजपाच्या राष्ट्रीय संघटनेकडून छत्तीसगड भाजपचे महाराष्ट्राच्या नांदेड जिल्ह्यातील किनवट/माहूर विधानसभा निवडणुकीसाठी प्रवासी प्रचारक म्हणून नियुक्त करण्यात आलेले महेंद्र वैष्णव यांच्या हस्ते अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत दि.२० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता एकविरा धाम, माहूर येथे आयोजित भाजपाच्या पदाधिकारी संवाद बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 'सोडचिठ्ठी' देऊन हजारी यांनी 'जय श्रीराम' चा नारा देत भारतीय जनता पक्षात प्रवेश करत घरवापसी केली.. अंदाजे २० वर्षांपूर्वी माहूर भाजप कार्यकारिणीत शहर सरचिटणीस सोबतच काही अपरिहार्य कारणास्तव तत्कालीन तालुका अध्यक्ष समाधान जाधव यांचेसोबत अलिखित व अघोषित तालुका सरचिटणीसचे कामही बजरंगसिंह हजारी यांनी यशस्वीपणे सांभाळले होते. सन २००५ मध्ये त्यांच्या सौभाग्यवती दुर्गादेवी हजारी ह्या नगरपंचायत स्थापनेआधीच्या माहूर ग्रामपंचायतीच्या शेवटच्या निवडणुकीत निवडून येत सदस्या झाल्यानंतर तत्कालीन एकसंध राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत त्यांनी जाहीर प्रवेश केला होता.दरम्यान,२०११ साली त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस चे माहूर तालुका उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले.परंतु,'गरज सरो वैद्य मरो' या उक्तीचा अनुभव आल्यावर प्रदिर्घ कालावधी राजकारणापासून अलिप्त राहून, अखेर राजकारणात पुन्हा सक्रिय होण्याचा निर्णय घेतला. हजारी यांनी देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी तथा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सर्वसमावेशक आणि सहिष्णू नेतृत्वात किनवट/ माहूर विधानसभा मतदारसंघाचे भाजपाचे आमदार भीमराव केराम यांच्या विकसनशील नेतृत्त्वावर विश्वास ठेवून तब्बल २० वर्षांनंतर अखेर भाजपमध्ये प्रवेश करत घरवापसी केली.मागील पाच वर्षांपासून त्यांनी भाजपात घरवापसी करण्याचे संकेत दिले होते.भाजपाच्या वरीष्ठ पदाधिकाऱ्यांजवळ प्रवेश करण्याची तशी इच्छा त्यांनी अनेक वेळा व्यक्त केली होती.मात्र हा प्रवेश रखडला होता.अखेर २० ऑक्टोबर रोजी भाजपाचे नांदेड जिल्हा ज्येष्ठ नेते अनिल वाघमारे यांनी हजारी यांना फोनवरून संपर्क साधत एकविरा धाम येथे पक्षप्रवेश करून घेण्यासाठी निमंत्रीत केले.या प्रवेशाचे श्रेय ज्येष्ठ नेते अनिल वाघमारे यांच्यासह खरे सूत्रधार नगरसेवक सागर महामुने यांचे असून, तालुका अध्यक्ष कांतराव घोडेकर यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. बजरंगसिंह हजारी हे तालुक्यात अल्पसंख्यांक असलेल्या परंतु, नेतृत्व करण्याची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या एका क्षत्रिय समाजातून येतात.तालुक्यात पक्षाची विचारधारा, केलेली व करण्यात येत असलेली विकासकामांचे याविषयीची माहिती समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचवण्यासाठी व पक्षसंघटनवाढीसाठी आमदार भीमराव केराम यांच्या यांच्या कणखर नेतृत्व व मार्गदर्शनाखाली भाजपाचे कार्य करणार असल्याची ग्वाही पक्षप्रवेशानंतर बजरंगसिंह हजारी यांनी उपस्थित मान्यवर व पदाधिकाऱ्यांना धन्यवाद देताना दिली.